# संपादकाचें जीवनस्वप्न

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. ९४२
१८५२

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें
वि
क्रमां
नों. दि.
वाचनालय शाखा

द्वा. भ. कर्णिक

REFBK-0007767

किंमत ३ रुपये



# संपादकाचें जीवनस्वप्न

द्वा. भ. कर्णिक

# संपादकाचें जीवनस्वप्न

द्वा. म. कर्णिक

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
१०३३८
अनुक्रम
विभाग
नों. दि.
वाचनालय शाखा
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
७७६७
दा. क्र.
REFBK-0007767

किंमत ३ रुपये

★ सर्व हक्क प्रकाशकांच्या स्वाधीन.

प्रथमावृत्ति : सप्टेंबर १९५२

मुद्रक व प्रकाशक

किर्लोस्कर प्रेस, किर्लोस्करवाडी, द. सातारा.

## अ नु क्र म णि का


| | | |
|---|---|---|
| प्रकरण १ लें, | पहिलें पान ... ... | ३ |
| प्रकरण २ रें, | बातम्या आणि त्यांचें संपादन ... | १६ |
| प्रकरण ३ रें, | घात, अपघात, आत्मघात ... | ३१ |
| प्रकरण ४ थें, | अवलिया प्राणी – वार्ताहर ... | ४७ |
| प्रकरण ५ वें, | आधुनिक उमाजी नाईक ... | ६१ |
| प्रकरण ६ वें, | निरागस आनंद देणारीं सदरें ... | ७६ |
| प्रकरण ७ वें, | वाचकांचीं पत्रें ... ... | ९१ |
| प्रकरण ८ वें, | धक्के आणि बुक्के ... ... | १०२ |
| प्रकरण ९ वें, | संपादकीय मजकूर ... ... | १११ |
| प्रकरण १० वें, | संपादकाची बिदागी... ... | १२८ |

# संपादकाचें जीवनस्वप्न

# नि वे द न

वृत्तपत्रीय जीवनांतील सुखस्मृतींची ही उजळणीच खरी. त्या व्यवसायांत जे प्रत्यक्षपणें आहेत त्यांना कांहीं प्रमाणांत आपलें हृद्गत त्यांत प्रकट झालेलें दिसेल. आणि बऱ्याच दिवसांनी जुने मित्र भेटल्यानंतर सुखदुःखांच्या जशा आठवणी निघतात तसें या लहानशा पुस्तकाच्या वाचनाने तेहि आपले विविध अनुभव प्रकट करावयाला कदाचित् प्रवृत्त होतील. त्यांतूनच वृत्तपत्रीय जगाचें जें एक अज्ञात दालन आहे त्यावर प्रकाशकिरणें पडतील आणि पत्रकार पत्रकार म्हणतात तो कोण, त्याचें कार्य काय, या व्यवसायाचें स्वरूप काय, याची सुबुद्ध वाचकांना हळूहळू कल्पना येत जाईल.

व्यक्तिगत अनुभवांवर आधारलेलें हें पुस्तक आहे. अर्थातच ते अनुभव जसे मर्यादित असणार तशीच पुस्तकाची व्याप्तीहि मर्यादित राहणार. या पुस्तकाचें उद्दिष्ट तत्त्वबोध हें नव्हे. इतिहासप्रसिद्ध स्थळ पाहावयाला गेल्यानंतर नवख्या प्रवाशांना तेथील मार्गदर्शक जशी माहिती देतो, तशी दैनिकाच्या एकंदर व्यापाबद्दल मीं येथे माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे. मार्गदर्शक गोष्टीवेल्हाळ असला म्हणजे प्रवाशांना थोडी माहिती व थोडें मनोरंजन असा दोहोंचाहि लाभ होतो. या पुस्तकांतूनहि तसाच लाभ होईल अशी मला आशा आहे. जिज्ञासू त्या माहितीवर संतुष्ट होऊं शकत नाहीत. पण अधिक माहिती मिळविण्याला चालना देण्याइतपत जरी या पुस्तकाचा उपयोग झाला तरी पुष्कळ झालें.

*दिल्ली*, २४-५-५२ **द्वा. भ. कर्णिक**

प्रकरण १ लें

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि
दा. क्र.

# पहिलें पान

★

पहाटेचे चार वाजले होते. छापखान्यांतील मशीनवर फॉर्म केव्हाच जाऊन पडला होता. त्याचें प्रूफ पाहून मीं छपाईचा हुकूमहि दिला होता. आता खरें म्हटलें तर घरीं जावयाला हरकत नव्हती. कारण, रात्रपाळीच्या संपादकाचें माझें काम पुरें झालें होतें. पण मी एक पत्र लिहीत बसलों. पांचदहा मिनिटांत तें मीं पुरें केलें आणि घरीं जावयाला निघतांनिघतां सहज रूटरच्या मशीनकडे दृष्टि टाकली, तों काय आश्चर्य! रूटरच्या मशीनवर मला तीन ठळक अक्षरें दिसलीं— " फ्लॅश...फ्लॅश...फ्लॅश..." (अत्यंत महत्त्वाची बातमी येत असल्याची पूर्वसूचना) त्याखाली बातमी होती ती प्रे. रूझवेल्ट यांच्या आकस्मिक निधनाची.

क्षणार्धांत छापखान्यांतील सारें वातावरण बदललें. मशीन थांबविण्यांत आलें. झोपीं गेलेल्या कंपॉझिटरांना उठविण्यांत आलें. कारण वर्तमानपत्रें ज्या बातमीसाठी जीव टाकीत असतात ती बातमी आली होती. आणि ती अशा वेळीं आली होती, की ज्या वेळीं एखाद्या वर्तमानपत्राला इतर साऱ्या वर्तमानपत्रांवर कुरघोडी करतां येईल. दैनिक वर्तमानपत्रांतील रात्रपाळीचा संपादक ज्या संधीची वाट पाहात असतो ती ही संधि होती. मला ती संधि मिळाली आणि मीं तिचा पुरेपूर उपयोग करून घेतला.

लगेच त्या बातमीचें भाषांतर करून मीं तें कंपोजला दिलें. कंपोज होईपर्यंत पहिल्या पानावरील मुख्य मथळा मीं काढून टाकला होता. त्या जागीं प्रे. रूझवेल्ट यांच्या निधनाचा मथळा मीं दिला. त्याच्या खाली आणखीहि थोडी जागा करण्यासाठी दुसऱ्या कांही बातम्या काढून टाकल्या. आणि मजकूर कंपोज होतांच तो मजकूर व प्रे. रूझवेल्ट यांचें छायाचित्र घालून आणि खालीवर काळया रुळा घालून मीं पहिलें पान तयार केलें. दुसऱ्या दिवशीं मुंबईच्या सर्व वृत्तपत्रांत प्रे. रूझवेल्ट यांच्या मृत्यूची बातमी फक्त आमच्या " संग्राम " या वृत्तपत्राने दिलेली व तीहि मोठ्या ठळकपणाने दिलेली आढळून आली.

वृत्तपत्रीय जीवनांत असे महत्त्वाचे क्षण केव्हा येतील याचा नियम नसतो. म्हणूनच दैनिकाच्या संपादकाने प्रत्येक क्षणीं जागरूक राहणें आवश्यक असतें. बातमी हाच दैनिकाचा प्राण असतो. सुदैवाने आता बातम्या पुरविणाऱ्या अनेक वृत्तसंस्था अस्तित्वांत आहेत. त्यांच्याकडून क्षणोक्षणीं टेलेप्रिंटर मशीनवर बातम्या येत असतात. दैनिकाच्या कचेरींत जर तुम्हीं पाऊल टाकलेंत तर हें मशीन एका प्रमुख जागीं धडधडत असलेलें तुम्हांला आढळून येईल. जगाच्या पाठीवर कोठेहि ज्या घडामोडी होत असतात त्या कांही तासांच्या आंत या मशीनवर छापून येतात. आपण फक्त तारांचें तें भेंडोळें फाडून घ्यावयाचें आणि लगेच आपल्याला आवश्यक वाटणाऱ्या बातम्यांचें भाषांतर करावयाला लागावयाचें.

आजच्या काळांत वर्तमानपत्रांचें काम या वृत्तसंस्थांच्या सहकार्यामुळे बरेंच सुलभ झालें आहे. रूटरच्या मशीनवर ' फ्लॅश ' आला की संपादकाने लगेच आपलें सर्व लक्ष तेथेच केंद्रित केलें पाहिजे. कधीकधी बातमीचें महत्त्व जाणून दोनदोन, तीनतीन वेळां फ्लॅश देण्यांत येतो. १९४४ मध्ये महात्मा गांधींची तुरुंगांतून सुटका झाली तेव्हा सुमारे दोन तास आधी एक फ्लॅश देण्यांत आला होता व थोड्याच वेळांत कांहीतरी अत्यंत महत्त्वाची

घोषणा होणार आहे, अशी सर्व संपादकांना सूचना देण्यांत आली होती. अर्थातच ही घोषणा कशाची होणार याबद्दल कोणालाच संदेह नव्हता. म्हणून त्या दोन तासांत सर्व संपादकांनी महात्माजींच्या छायाचित्रांचे ब्लॉक्स, त्यांच्या अटकेची व अटकेच्या काळांतील सर्व घडामोडींची तारीखवार माहिती आणि इतरहि मालमसाला तयार करून ठेवला आणि प्रत्यक्ष बातमी आल्याबरोबर हीं सजविलेलीं पानें मशीनवर टाकून तासाभरांत त्यांनी आपले अंक बाहेर काढले.

परंतु संपादकांना नेहमीच अशी पूर्वसूचना मिळेल असें नव्हे. उलट, बहुतेक बातम्या आकस्मिकपणेंच येत असतात आणि त्या वेळीं रात्रपाळी करणाऱ्या उपसंपादकालाच आपल्या जबाबदारीवर आणि आपल्या अक्कल-हुषारीने या बातमीची योग्य ती व्यवस्था करावी लागते. दैनिक वर्तमानपत्रांत रात्रपाळीचा संपादक हाच वृत्तपत्राच्या यशापयशाचा खरा धनी मानावा लागतो. कारण सर्वसाधारण वाचकांच्या दृष्टीने पहिलें पान हेंच महत्त्वाचें पान असतें आणि त्या पानांत जितक्या खळबळ उडविणाऱ्या, लोकांच्या भावना हाल-विणाऱ्या बातम्या असतील व त्यांची सजावट जितकी आकर्षक असेल त्यावरच वर्तमानपत्राचा खरा खप अवलंबून असतो. त्या बातम्या न चुकवितां देणें आणि लोकांच्या डोळयांत भरतील अशा तऱ्हेने त्यांची सजावट करणें, हें रात्रपाळीच्या संपादकाचें काम असतें.

वर्तमानपत्राच्या आर्थिक परिस्थितीनुरूप रात्रपाळीला एक किंवा अधिक उपसंपादक असतात. पण अधिक असले तरी त्यांपैकी कोणीतरी एक जबाबदार मानला जातो. या संपादकाला अर्थातच अनेक गोष्टींकडे लक्ष ठेवावें लागतें. कोणतीहि महत्त्वाची बातमी अनवधानाने गळूं नये म्हणून त्याला सारखें रूटरच्या किंवा इतर वृत्तसंस्थांच्या यंत्रांकडे लक्ष द्यावें लागतें. त्यांतील बातम्या निवडून काढून त्यांची विल्हेवाट लावतांनाच त्याला सबंध पहिल्या पानाचें चित्र आपल्या डोळयांसमोर उभें करावें

लागतें. कारण, नुसतें बातम्या देऊन काम भागत नाही. त्यांचें कमीअधिक महत्त्व ध्यानीं घेऊन त्याप्रमाणे निरनिराळ्या टाइपांत त्या कंपोज करावयास द्याव्या लागतात. त्यांना आकर्षक मथळे द्यावे लागतात आणि हे मथळे देतांना पानाची सबंध रचना कशी होणार आहे तें ध्यानीं घेऊन योग्य त्या टाइपांचीहि त्याच वेळीं निवड करावी लागते. त्यानंतर कांही बातम्यांना दोन किंवा अधिक कॉलमी 'इंट्रो' ( बातमीचा गाभा किंवा थोडक्यांत सारांश ) लिहावे लागतात. पान आकर्षक दिसावें म्हणून एखादटुसरी बातमी बॉर्डर घालून सजवावी लागते. हें सर्व होईतों बातम्यांची भर पडतच असते आणि कोणता मजकूर नव्याने द्यावा व कोणता गाळावा या विचाराने त्याची मति कुंठित व्हावयाची वेळ येते. त्याच वेळीं त्याच्यासमोर प्रुफांचे भारे येऊन पडत असतात. तीं तपासून त्यांत योग्य त्या सुधारणा तो करीतच असतो. शिवाय, जसजसे घड्याळाचे काटे फिरत असतात तसतसें त्याच्यासमोर एकच प्रश्नचिन्ह उभें राहतें— आज मथळा कोणता द्यावयाचा ? आजची खरी बातमी कोणती ? लोकांच्या दृष्टीने, आपल्या पत्राच्या संपादकाच्या दृष्टीने व आपल्या समव्यवसायिकांच्या दृष्टीने कोणती ?

पहिल्या पानाकडे जरा काळजीपूर्वक तुम्हीं पाहिलेंत तर रात्रपाळीच्या संपादकाला तें सजवितांना किती त्रास, विवंचना पडत असेल, अखेरपर्यंत त्याच्या हृदयांत किती धडधड होत असेल याची तुम्हांला कल्पना करतां येईल. दैनिक वर्तमानपत्रांतील अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे पहिल्या पानावरील मथळा होय. हा मथळा सकाळीं वाचकांना मोठा आकर्षक दिसतो. त्या मथळ्यावरसुद्धा एके काळीं वर्तमानपत्रांचा खप होत असे. आजसुद्धा कित्येक गावीं वृत्तपत्र-विक्रेते पहिल्या पानावरील चुरचुरीत बातम्या व विशेषतः ही मथळ्याची बातमी ओरडत आपल्याजवळचीं वर्तमानपत्रें खपवीत असतात. पण ही मथळ्याची बातमी शोधून काढतांना व त्या बातमीचा चटकदार मथळा बनवितांना रात्रपाळीच्या संपादकाला

किती कष्ट पडत असतील याची किती लोकांना कल्पना असेल ? बातमी हुडकून काढण्यांत तर कौशल्य आहेच; पण आपल्या वर्तमानपत्राच्या धोरणाप्रमाणे तिला किती महत्त्व द्यावयाचें हेंहि संपादकाला ठरवावें लागतें. बरें, मथळा म्हटला म्हणजे थोडक्या शब्दांत त्या बातमीचा सारा आशय त्यांत आला पाहिजे, त्यांतील शब्द अर्थवाही आणि कधी लालित्यपूर्ण, तर कधी हृदयस्पर्शी असे असले पाहिजेत; आणि एकंदर अक्षरांची संख्या फार तर बावीस ते चोवीस, एवढीच. आता बावीस-चोवीस अक्षरांत एवढा अर्थ, एवढें लालित्य, कसें आणावयाचें ? रात्रपाळीच्या संपादकाची खरी कसोटी तीच असते.

पण या कसोटीला कोणी बिचकून जाण्याचें मात्र कारण नाही. रात्र-पाळीच्या संपादकाने आत्मविश्वासाने आणि कांहीसें बेछूटपणें काम केलें, तर शंभर हिश्श्याने तो या सामन्यांत यशस्वी झाल्याशिवाय राहणार नाही. रात्र-पाळीला येतांयेतांच त्याने मनाशीं आधी आपल्या अंकाची सजावट ठरविली पाहिजे. हें काम जसें सवयीने येतें तसाच कल्पकतेचाहि या यशांत वांटा असतो. दैनिक वर्तमानपत्राचे साधारणपणें सात किंवा आठ कॉलम असतात. आता सजावट करावयाची म्हटली तर तीनतीन कॉलम मथळ्याच्या दोन बातम्या ठळकपणें छापतां येतील आणि मध्ये दोन कॉलमांचें एखादें छाया-चित्र देऊन पानाचा आकर्षकपणा वाढवितां येईल. किंवा तशीच महत्त्वाची बातमी असेल तर मुख्य मथळ्याखाली सहा किंवा पांच किंवा चार कॉलमी मथळे देऊन एकाच बातमीवर वाचकांचें लक्ष केंद्रित करतां येईल. मग बाकीच्या कॉलमांची भर तीन कॉलमी किंवा दोन कॉलमी मथळ्यांनी करतां येईल. पानाच्या वरच्या भागाची अशा प्रकारें सजावट केल्यानंतर खालील भाग अगदीच भुंडा किंवा मोकळा ठेवणेंहि इष्ट नाही. मग वरील बातम्यांच्या खालोखाल अशा महत्त्वाच्या इतर बातम्या शोधून काढून त्यांना दोन कॉलमी किंवा तीन कॉलमी मथळे देऊन पानाचा खालचा भागहि

आकर्षक करतां येईल. त्यांतच दोन किंवा तीन कॉलमी छायाचित्रें, मजकुरांत एक कॉलमी किंवा अर्ध कॉलमी छायाचित्रें आणि एकदोन बॉर्डरीच्या बातम्या यांची भर टाकली की पहिलें पान अधिकच सुशोभित करतां येईल.

बहुशः छापखान्यांतील फोरमन व त्याच्या हाताखालील पानें भरणारे कंपॉझिटर ही सजावट करण्यांत कुशल असतात. कित्येक वेळां संपादकांपेक्षाहि अधिक चांगल्या रीतीने मथळ्यांची व मजकुराची ते रचना करीत असतात. पण रात्रपाळीच्या संपादकाने त्यांच्यावर अवलंबून राहणें इष्ट नसतें. त्याने स्वतःच एकंदर बातम्यांचा नूर बघून आपल्याला पाहिजे असेल त्याप्रमाणे सजावटीची आकृति काढून ठेवली पाहिजे. एकदा आकृति तयार असली म्हणजे बातम्यांच्या मथळ्यांचे टाइप आणि 'इंट्रो'चे टाइप यांचीहि संपादकाला निवड करतां येते. उदाहरणार्थ, दोन महत्त्वाच्या बातम्यांचे टाइप सारखे असणें हें पानाच्या शोभेच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक असतें. मथळे एकाच ओळीचे असावे की दोन ओळींचे असावे, इंट्रो कोणत्या टाइपांत असावा, छायाचित्रांची योजना कशी असावी– या व इतर गोष्टींचाहि पूर्ण विचार करूनच संपादकाने पान सजवावयाला पाहिजे. त्या बाबतींत एकदा निश्चय करून संपादकाने बातम्यांची जुळवाजुळव करावी आणि मग सहसा त्यांत फेरफार करूं नये. रात्रीच्या वेळीं संपादकाची व घड्याळाची स्पर्धा चालू असते. ठरलेल्या ठोक्याला फॉर्म देण्याची संपादकावर जबाबदारी असते. बातम्यांच्या बाबतींत व सजावटीच्या बाबतींत अनिश्चितपणा ठेवला तर छपाईची वेळ चुकून दैनिकाच्या विक्रीवर त्याचा अनिष्ट परिणाम होण्याचा संभव असतो. ही सजावट एकदा निश्चित केली की निश्चिंत मनाने संपादकाला मथळ्याच्या बातमीकडे लक्ष पुरवितां येतें व तो लिहिण्यासाठी आवश्यक असणारी स्वस्थताहि त्याला मिळूं शकते.

आजकाल पहिल्या पानाच्या सजावटीचें तंत्र बरेंच वाढत चाललें आहे. या बाबतींत एका टोकाला मद्रासचें "हिंदु" हें पत्र आहे, की ज्यांत

एक कॉलमी मथळा देणें हा धर्म मानला जातो. "हिंदू"मध्ये दोन कॉलमी मथळा येण्यासाठी हिंदुस्थानला स्वराज्य मिळावें लागलें असें त्या पत्राच्या सजावटीबद्दलच्या काटेकोर धोरणाबद्दल विनोदानें बोललें जातें. दुसऱ्या टोकाला मुंबईतील कांही गुजराती वृत्तपत्रें आहेत, की ज्यांत बातम्यांपेक्षा त्यांची सजावटच अधिक असते. मोठमोठे अनेक मथळे आणि बॉर्डरींची खैरात हेंच त्यांचें वैशिष्ट्य असतें. मराठी वृत्तपत्रें या दोहोंतील सुवर्णमध्य गाठतात. पहिल्या पानाची त्यांची सजावट डोळ्यांत भरण्यासारखी असते आणि त्याच वेळीं संयमपूर्णहि असते. म्हणजे केवळ समोरासमोर बॉर्डरी पाहिजेत किंवा काळ्याभोर हेडिंगांचा उठावदारपणा पाहिजे म्हणून वाटेल त्या बातमीला महत्त्व देण्याचा मोह तीं आवरूं शकतात. सर्वसाधारण मराठी वाचकवर्ग हा खरोखरच मोठा चोखंदळ आहे. त्याच्यांत रसिकता आहे, तशीच सारासार विवेकशक्ति आहे. ज्याला सनसनाटी म्हणून म्हणतां येईल अशी बातमी त्या वाचकाला नको असें नाही; पण खरोखरच ती बातमी त्या अर्थाची हवी एवढाच त्याचा आग्रह.

पहिल्या पानासाठीं ज्या रात्रपाळीच्या संपादकाला खळबळपूर्ण अशी बातमी मिळेल तो खरोखरच भाग्यवान होय. पण ती एकदा हातीं आली असतांना जो कल्पक अशा सजावटीने डौलदार मथळ्यांनी व त्याहीपेक्षा शैलीदार अशा लिखाणाने ती सजविणार नाही तो संपादक कर्मदरिद्रीच होय! 'लोकमान्य' दैनिकाचे संस्थापक व माजी संपादक श्री. दत्तोपंत सावरकर यांचा पहिलें पान सजविण्यांत हातखंडा असे. अर्थात् त्यांच्यामध्ये बातम्या हुडकून काढण्याचेंच नव्हे, तर प्रसंगीं त्यांना चालना देऊन त्या निर्माण करण्याचेंहि सामर्थ्य असे. वाचकांना काय हवें आणि तें कोणत्या पद्धतीने दिलें पाहिजे याची जाणीव त्यांच्याइतकी फारच थोड्या संपादकांत असेल. म्हणूनच प्रसंगीं वृत्तसंस्थांचें सहकार्य नसतां, इतर दृष्टीने प्रतिकूल परिस्थिति असतां, केवळ पहिल्या पानाच्या सजावटीवर श्री. सावरकरांनी 'लोकमान्या'चा खप एकेका प्रसंगीं हजाराहजारांनी वाढविला होता.

उदाहरणार्थ, त्या वेळीं उभ्या महाराष्ट्रांत खळबळ उडवून देणारी शांता आपटे यांच्याबद्दलची बातमी पाहा. एका संपादकाने त्यांच्याविषयी बदनामीकारक मजकूर आपल्या मासिकांत छापला म्हणून त्यांनी त्या संपादकाच्या कचेरींत जाऊन त्याला काठीचा प्रसाद दिला ही ती बातमी होय. मुंबईच्या कोणत्याहि वृत्तपत्राच्या आधी श्री. सावरकरांनी ती बातमी मिळविली हें तर त्यांचें कसब आहेच; पण त्या बातमीने त्यांनी आपलें पहिलें पान कसें सजविलें हें पाहिलें, तर त्यांच्या कल्पकतेचें अधिकच कौतुक वाटेल. त्या दिवशीं त्यांनी सात कॉलमी मथळा देऊन ही बातमी पहिल्या पानावर छापली. प्रत्यक्षपणें काय घडलें त्याची हकीकत चटकदार भाषेंत त्यांनी लिहिली होती. मधूनमधून प्रत्यक्ष संवादहि त्यांनी दिला होता आणि ज्या मजकुरामुळे ही घटना घडून आली त्या मजकुरांतील कांही भाग त्यांनी शांता आपटे यांच्याच तोंडीं घालून तोहि छापून काढला होता. आणि या सर्व हकीकतींत रंग भरण्यासाठी 'कुंकू' या बोलपटांतील नायिका नीरा– म्हणजे खुद्द शांता आपटे– या कादंबरींतील आपल्या मुलाला छडीने मारीत आहे या देखाव्याचें छायाचित्रहि त्यांनी या ठिकाणीं ठळकपणें छापलें होतें.

या बातमीला सावरकरांनी जें महत्त्व दिलें तें द्यावें किंवा नाही, हा वादाचा प्रश्न होऊं शकेल. पण अव्वल दर्जाची बातमी कशी द्यावी आणि वाचकांच्या मनाची पकड घेण्यासाठी त्यांत खुसखुशितपणा कसा आणावा याचें एक उदाहरण म्हणून सावरकरांच्या कल्पक संपादनाचा हा नमुना लक्षांत ठेवतां येईल.

आपल्या वर्तमानपत्रांच्या कचेऱ्या सुधारलेल्या देशांतील वर्तमानपत्रांप्रमाणे किंवा येथीलहि इंग्रजी वर्तमानपत्रांप्रमाणे सर्व प्रकारच्या सामग्रीने सुसज्जहि नसतात किंवा व्यवस्थितहि नसतात. एखादा ब्लॉक हवासा वाटला तरी हात काळे केल्याशिवाय तो सहसा मिळावयाचा नाही. पण म्हणूनच

अनुक्रम ९५३३
विभाग
क्रमांक
नों. दि.

कल्पकतेला येथे भरपूर वाव असतो. मला आठवतें, गेल्या महायुद्धांतील अखेरच्या दिवसांत हिटलर अक्षरशः कोंडींत पकडला जात होता. दुर्दैवाचे पाश त्याच्याभोवती आवळले जात होते. त्याच्या या दारुण अवस्थेचें चित्र रंगवितांना अेका व्यंगचित्रकाराने तो अेका स्मशानांतून चालला आहे आणि हाडांचे सापळे त्याचा लचका तोडूं पाहात आहेत, गिधाडांप्रमाणे त्याच्या-भोवती ते फिरत आहेत असें अेक व्यंगचित्र काढलें होतें. आता हिटलरच्या अखेरच्या दिवसांच्या बातम्या देतांना या व्यंगचित्राचा ब्लॉक छापला तर त्या बातम्यांना केवढी धार चढेल, नाही का ? अर्थात् मुख्य संपादकांनी हे व अशाच तऱ्हेचे ब्लॉक्स आधीच तयार करून ठेवलेले असले पाहिजेत यांत संशय नाही. दैनिकाच्या संपादकाचें कसब तर तेंच आहे. पण रात्रपाळीच्या संपादकाला बघतांबघतां या कल्पना सुचल्या पाहिजेत आणि हाताशीं असेल त्या साधनसामग्रीचा उपयोग करून घेऊन त्याने वेळ मारून नेली पाहिजे.

या बाबतींत अत्यंत आवश्यक गोष्ट जर कोणती असेल, तर रात्र-पाळीच्या संपादकाने आपल्या वर्तमानपत्राशीं तर समरस झालें पाहिजेच, पण प्रत्येक रात्रपाळी ही आपल्या कर्तृत्वाची निशाणीच होय असें समजून त्याने पहिल्या पानामध्ये आपल्या अंगचें सारें कसब ओतलें पाहिजे– निदान तसा प्रयत्न केला पाहिजे. “ आपल्याला काय करावयाचें आहे ? कसेंतरी पान भरलें की आपलें काम संपलें ! ” या वृत्तीने जो रात्रपाळी करील तो हाडाचा पत्रकारच नव्हे. पहिल्या पानासाठी बातम्या निवडतांना आपण लोकांना उत्कृष्ट बातम्या देत आहों किंवा नाही, हा तर प्रश्न आपण स्वतःच्या मनाला विचारलाच पाहिजे; पण आपल्याशीं स्पर्धा करणारीं वर्तमानपत्रें ही बातमी देतील का, दिली तरी कशी देतील, त्यांच्यापेक्षा अधिक सरसपणें आपण ती कशी देऊं शकूं, याचाहि आपल्या मनाशीं विचार केला पाहिजे. स्पर्धा ही जीवनांत ईर्ष्या निर्माण करणारी, अधिकाधिक यश मिळविण्यासाठी चैतन्य देणारी एक प्रबळ शक्ति होय. दुसऱ्या दिवशीं सकाळीं इतर

वर्तमानपत्रांचे अंक उघडून पाहात असतां त्यांच्या तुलनेंत आपण काकणभर वरचढ ठरलों तर केवढातरी हुरूप आपल्याला येऊं शकेल. कोण जाणे कदाचित् आपल्या एका मथळ्यानेसुद्धा आपल्या वर्तमानपत्राचा खप असा वाढलेला असेल, की आपली रात्रपाळी ही दैनिकाच्या जीवनांतील एक अपूर्व अशी घटनाहि झाली असेल. कोणीं सांगावें ? आणि आपण चुकलों असलों तर ? दैनिकाच्या नामुष्कीलाहि आपण कारणीभूत होऊं !

समजा, आपण बातम्यांचें भेंडोळें नीट वाचून पाहिलें नाही आणि पंडित मोतीलाल नेहरू यांच्या निधनाचीच बातमी आपल्याकडून गाळली गेली ! तर दुसऱ्या दिवशीं आपल्या वर्तमानपत्राचें हसेंच होणार नाही काय ? पुष्कळ वेळां साऱ्या वर्तमानपत्रांचे मथळे सरसहा अेकच असतात. आपला मथळा निराळा असला तर त्याचा अर्थ एवढाच असला पाहिजे, की आपल्याजवळ इतरांपेक्षा निराळी कांहीतरी खास बातमी आहे. कांही संपादक मोठ्या अभिमानाने सांगतात, की आपण दुसरीं वर्तमानपत्रें हातांत धरीत नाही. कांही स्वतःचींहि वर्तमानपत्रें वाचत नाहीत ! तसें असेल तर त्याचा अर्थ असा, की दैनिकाची खरी मख्खी त्यांना कळलेलीच नाही ! नव्हे, त्यांना दैनिकाबद्दल खरी आस्थाच नाही ! खरें म्हटलें तर रात्रपाळीच्या संपादकाने सकाळीं उठल्याबरोबर पहिली गोष्ट केली पाहिजे ती म्हणजे रात्रीचा दिवस करून आपण जी कारागिरी वा कलाकुसर केली असेल तिच्यावरून डोळे फिरवून आपल्या मनाशीं त्यांतील चुकांची छाननी करणें व तसेंच इतर वृत्तपत्रांचे अंक चाळून त्यांच्याशीं आपल्या कारागिरीची तुलना करणें ही होय. दैनिकाच्या संपादकानेंहि आपला स्वतःचा व इतरांचे अंक पाहून तांबड्यानिळ्या पेन्सिलीने ते चितारले पाहिजेत. तरच बातम्यांच्या बाबतींत कोणत्याहि वर्तमानपत्राला प्रगति करतां येईल.

पहिल्या पानावर कोणत्या प्रकारच्या बातम्या देण्यांत याव्या व त्यांचें प्रमाण काय असावें याबद्दल निश्चित कल्पना देणें कठीण आहे. वर्तमान-

पत्राचें धोरण काय असेल त्यावर तें अवलंबून राहील. पण सर्वसाधारणपणें अत्यंत महत्त्वाच्या बातम्यांची सुरवात पहिल्या पानावर करून त्या पुढे शेवटच्या पानावर चालवून घेण्याची प्रथा रूढ आहे. कितीहि खळबळ उडवून देणारी बातमी असली, तरी तिने पहिलें पान किंवा त्याचा बराचसा भाग भरून काढणें इष्ट नाही. पहिल्या पानावर दृष्टि फिरविल्याबरोबर देश-विदेशांतील ठळक घडामोडींची वाचकाला कल्पना झाली पाहिजे. हेंच पहिल्या पानाचें उद्दिष्ट असलें पाहिजे. त्या दृष्टीने, देशांत निवडणुकी चालू असतील तर त्यांचे ठळक निकाल, टेस्ट मॅच चालू असेल तर आधल्या दिवसाची धावांची संख्या, एखादी युद्धाची बातमी, दंगेधोपे, विमान-अपघात, भूकंप, थोरामोठ्यांच्या सचित्र हालचाली, परदेशांतून आलेल्या एखाद्या शिष्टमंडळाचें छायाचित्र, प्रमुख व्यक्तीचें निधन वा आजारीपण, आणि पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या दौऱ्याची बातमी वा त्यांचें एखादें भाषण, अशा अनेक बातम्या वाचकाला प्रामुख्याने दिसल्या पाहिजेत. जितकी बातम्यांची संख्या अधिक तितका पहिल्या पानाचा आकर्षकपणा वाढतो. त्यांतच आपल्या खास वार्ताहराकडून आलेली एखाद-दुसरी बातमी असली, तर वर्तमानपत्राचें वैशिष्ट्यहि प्रकट होतें आणि त्या दृष्टीने इतर वर्तमानपत्रांवर मात केल्याचाहि आनंद प्राप्त होऊं शकतो.

पण इतक्या सर्व बातम्या, खास वार्ताहरांनी खात्रीलायक बातम्यां-वरून तयार केलेले अंदाज आणि त्यांचीं आकितें पहिल्या पानांत कोंबावयाचीं म्हटलें, तर रात्रपाळीच्या संपादकाजवळ पानाची आकृति निःसंशय तयार पाहिजे. निदान मनांत तरी तिचा आराखडा तयार पाहिजे. नाहीतर बातम्या भरावयाच्या वेळीं प्रुफें हातांत घेऊन संपादक कंपॉझिटरजवळ उभा राहिला तर दोन कॉलम भरावयाचे असतांना तीन किंवा चार कॉलमी मथळा आणि तीन कॉलमी इंट्रो तयार झालेला त्याच्या दृष्टीस पडावयाचा. त्या वेळीं बदल करावयाचें म्हटलें तरी वेळेची

उंचाई असते. शिवाय दुसरी एक अडचण पहिल्या पानाच्या बाबतींतच नव्हे, तर सर्वच पानें भरतांना उपस्थित होते आणि ती म्हणजे जागा भरून काढण्याची. एखादी बातमी भरल्यानंतर दोनतीन इंच जागा रिकामी राहते. किंवा मध्येच एखादें दोन किंवा तीन कॉलमी हेडिंग आलें तरी थोडीशी जागा शिल्लक राहते. अशा वेळीं ही जागा भरून काढण्यासाठी लहानलहान बातम्या किंवा वृत्तसार संपादकाजवळ तयार पाहिजे. विशेषत: पहिल्या पानावर साधारणपणें मजकूर अगदी खच्चून भरावयाचा असल्या-कारणाने ही जागा लेडांनी भरून काढणें शक्य नसतें किंवा त्या जागीं एखादी छोटीशी जाहिरातहि टाकणें शक्य नसतें. रात्रपाळीच्या संपादकाला अनेक अडचणींची जी पूर्वतयारी करावी लागते त्यांपैकीच हीहि एक अडचण होय.

तथापि, मीं वर म्हटल्याप्रमाणे या अडचणींचा फारसा बागुलबुवा करण्याचें कारण नाही. चार देशी वा परदेशी वृत्तपत्रांची सजावट लक्षांत ठेवली तर नव्या नवलाईने पहिलें पान सजविणें कठीण नाही. मुख्य मथळा वा इतर मथळे आकर्षक असावे यांत शंका नाही. पण ते काव्य-मयच हवेत किंवा त्यांत अनुप्रास असलाच पाहिजे असें नाही. बातमीचा आशय शक्य तेवढ्या थोड्या, पण सुटसुटीत शब्दांत व्यक्त करण्याचें संपा-दकामध्ये कौशल्य असलें म्हणजे पुरें झालें. अलीकडे संपादकीय लिखाणा-प्रमाणेंच बातम्या सजविण्याच्या कामींहि भाषेचा फुलोरा फुलविण्याचा अट्टा-हासाने प्रयत्न केला जातो. म्हणून पहिल्या पानावरहि आर्द्र आणि आर्ष, अस्मिता आणि ऊर्जस्वल, आणि असेच शैलीदार परंतु सर्वसाधारण वाचकां-चेंच नव्हे, तर जाणत्या पत्रकारांचेंहि भाषाज्ञान तोकडें ठरविणारे शब्द विखु-रलेले आढळून येतात. त्यांचा वाचकांच्या मनावर काय इष्ट-अनिष्ट परि-णाम होत असेल तो होवो; पण त्या शैलीचें अनुकरण करण्याच्या भरीस पडून कांही रात्रपाळीच्या संपादकांची भाषा मात्र विनाकारण बोजड व्हावयास

लागली आहे आणि शैलीदार मथळे व इंट्रो लिहिण्याचा त्यांच्या मनावर इतका ताण पडूं लागला आहे, की रात्रपाळीचीच नव्हे, तर संपादकीय व्यवसायाचीच कांहीजण दहशत घेऊं लागले आहेत !

माझें त्यांना एवढेंच सांगणें आहे, की दैनिक पत्रव्यवसाय ही दहशत घेण्यासारखी चीज नव्हे. आणि पहिलें पान हा जो दैनिकाचा प्राण असतो तें सजविणें हा तर एक आल्हाददायक खेळच आहे. उत्कृष्ट बातम्या ऐकत आणि पाहात आणि त्यांचा आनंद हजारो वाचकांना देण्यासाठी आपली नैसर्गिक बुद्धि व शैली उपयोगांत आणीत आपण जे सहासात तास वृत्तपत्राच्या कचेरींत काढतों ही आल्हाददायक गोष्ट नव्हे तर काय ? हें पान तयार करीत असतांना मुसोलिनी पायांखाली तुडवला गेल्याची, हिटलरच्या आत्महत्त्येची, गांधीजींच्या दारुण वधाची, जिनांच्या निधनाची, सुभाषबाबूंचें विमान कोसळल्याची आणि जगांत होणाऱ्या असंख्य घात-अपघात–आत्महत्त्यांची बातमी तुमच्या कानांवर येईल. त्या वेळीं एखाद्या महात्म्यासाठी अश्रु ढाळण्याला, एखाद्या दुष्टाच्या पारिपत्याबद्दल सुटकेचा निःश्वास सोडण्याला किंवा एखाद्या धीरोदात्त पुरुषाच्या यशाबद्दल अभिनंदनपर उद्गार काढण्यालाहि तुम्हांला वेळ मिळणार नाही. पण तुमच्या अंतःकरणांत भावनांच्या ऊर्मि उसळतील त्या एवढ्याच, की भोवतालच्या साऱ्या निद्रित जगाला उद्या जेव्हा जाग येईल तेव्हा केवढी सनसनाटी बातमी आपण त्याला देऊं ? आणि ज्या स्वरूपांत आपण ती त्याच्यासमोर ठेवूं ती पाहून केवढी कौतुकाची भावना आपल्या वाचकांच्या मुद्रेवर उमटेल ? रात्रपाळीच्या संपादकाच्या यशाचें तेंच गमक होय.

★ ★ ★

प्रकरण २ रें

# बातम्या आणि त्यांचें संपादन

☆

दैनिक वर्तमानपत्राची कचेरी तुम्हीं पाहिलीत तर तेथे तुम्हांला काय आढळून येईल ? प्रत्येक टेबलावर वर्तमानपत्रें अस्ताव्यस्त पडलेलीं आहेत, लहानलहान कागदाच्या कपट्यांवर खूप ढोबळ अक्षरांनी संपादक झपाझप कांहीतरी खरडीत आहे, रूटरचें यंत्र धडाकून चाललेलें आहे आणि त्यांतून तारांचें भेंडोळें बाहेर पडत आहे. कोपऱ्यांत फोन खणखणत आहे, कंपॉझिटरांची ये-जा चाललेली आहे, आणि क्षणोक्षणीं कल्लोळ वाढत चाललेला आहे. अशा तऱ्हेचें कांहीतरी दृश्य तुमच्या नजरेस पडेल. वर्तमानपत्राची कचेरी म्हणजे बातम्यांचें आगर. वृत्तसंस्थांकडून येणाऱ्या बातम्या; वर्तमानपत्राच्या अधिकृत वार्ताहरांकडून फोनवरून वा तारेने वा पत्राने येणाऱ्या बातम्या, लोकांनी स्वयंस्फूर्तीने कळविलेल्या बातम्या आणि हरएक प्रकारें तेथे येऊन पोचणाऱ्या बातम्या यांचें आगर. बातम्यांच्या या जंजाळांतून संपादकाची कधीहि सुटका होत नाही. पण त्या येतात तशा च येतील तेवढ्या त्याला देतां येत नाहीत. त्यांचें संपादन करावें लागतें. म्हणजे आधी बातम्यांची निवड करावी लागते, मग त्यांवरून हात फिरवावा लागतो. म्हणजे त्यांत योग्य ती काटछाट, योग्य ते फेरफार व सुधारणा कराव्या लागतात. प्रसंगीं सारी बातमी सुबोध भाषेंत लिहून काढावी लागते.

मग त्या बातमीची सजावट आली. म्हणजे कोणत्या टाइपांत ती चालवावयाला द्यावयाची, तिच्या अवतीभोवती कांही आरास करावयाची किंवा काय, याचा त्याला विचार करावा लागतो. आणि अखेरीस त्यावर कोणतें हेडिंग द्यावयाचें व तें कोणत्या टाइपांत द्यावयाचें यासाठी त्याला डोकें खाजवावें लागतें.

बरें, हें काम निवांतपणें, स्वस्थपणें त्याला करतां येतें काय ? नाही. दैनिकाच्या कचेरींत निवांतपणाची अपेक्षा करणें म्हणजे गणपतिविसर्जनाच्या मिरवणुकींत शिष्टपणा व शिस्त यांची अपेक्षा करण्यासारखें आहे. रूटरच्या यंत्रावर बातमी येते, "नेताजी सुभाषचंद्र बोस यांचें विमान कोसळून ते मरण पावल्याचें अधिकृतपणें जाहीर करण्यांत आलें आहे." लगेच साऱ्या कचेरींत एकच गोंगाट उडतो, "अहो, ऐकलंत का ? नेताजी मरण पांवले!" असें एकानें म्हटलें, की–

"काय, म्हणतां काय ? कुठं ? अहो, तें शक्यच नाही !"

"खोटी आहे बातमी ! ब्रिटिशांचा प्रचार आहे तो !"

"अरेरे ! एक वीर पुरुष गेला !"

"दुर्दैव आहे या देशाचं ! तेवढाच एक आशातंतु होता !"

"सुभाषबाबूंना वीरमरण लाभलं." असे एक ना दोन अनेक उद्‌गार निघतात; पण लगेच प्रत्येकाच्या हृदयांतील संपादक जागा होतो आणि कोणी म्हणतो,

"संपादकांना फोन करून विचारा, खास अंक काढायचा की नाही तो."

"अहो बाळोबा, सुभाषबाबूंचे सगळे ब्लॉक्स काढा पाहूं. आणि ही घ्या बातमी. ग्रेटमधेच सगळी चालवा. आणि मिळतील ते ब्लॉक्स टाकून पान भरा."

“ अहो बापूसाहेब, तुम्ही एक छोटासा अग्रलेख लिहा पाहूं. हेंच होडिंग द्या त्याला– ‘ सुभाषबाबूंना वरिमरण लाभलं ! ’ ”

तेवढ्या वेळांत फोन खणखणूं लागतो. कोणीतरी त्याला उत्तर देतें, “ फोनवरून आम्ही जाहिरात घेत नाही. ”

“ कोण आहे हो ? ”

“ कुणाच्या तरी विवाहसमारंभाची जाहिरात आहे. ”

“ ठेवून द्या तो फोन. इकडे सुभाषबाबू गेले आणि यांच्या घरचं कार्य निघालं ! ”

याच वेळीं एका टेबलावर ब्लॉक्स येऊन पडतात. ते पाहून एक संपादक उठून म्हणतो, “ अहो, हीं प्रूफं जरा पाहाल का ? आणि हीं बातमीपत्रं आहेत ना त्यांना मथळे द्यायचे आहेत. मी जरा हे ब्लॉक्स पाहून कोणते घालायचे तें ठरवतों. ”

रूटरचें यंत्र धडधडतच असतें. त्यांतील तारा फाडीत एकजण म्हणतो, “ अपघाताची सविस्तर माहिती आली बरं का. अहो, या तारा फाडून घ्या सगळेजण. मी सुभाषबाबूंचं अल्प चरित्र तयार करतों यावरून.”

रूटरच्या यंत्रावर बातमी येते ती नेहमीच संगतवार असते असें नव्हे. ती जुळवून घ्यावी लागते. विशेषतः लांबलचक बातम्या असल्या म्हणजे जो भाग रूटरच्या कचेरींत आला असेल तो यंत्रावर दिला जातो. उदाहरणार्थ, या वेळीं सुभाषबाबूंच्या अपघाती निधनाची बातमी एकसारखी येतच असते. ती मुख्य बातमी. तिचे किती भाग असतील कोण जाणे ! प्रत्येक भागावर स्वतंत्र क्रमांक दिलेला असतो. ते क्रमांक जुळवून घ्यावे लागतात.

मग सुभाषबाबूंच्या निधनाबद्दलच्या प्रतिक्रिया सुरू होतात. संपादकाच्या दृष्टीने ती दुसरी बातमी. तिचेहि भाग किती येतील याचा नियम नसतो. देशांतील व परदेशांतील असंख्य पुढाऱ्यांचा दुखवटा

या वेळीं व्यक्त व्हावयाचा असतो. जसजसे हे संदेश वृत्तसंस्थेच्या हातीं येतात तसतसे ते यंत्रावर दिले जातात. त्यांच्याहि प्रत्येक भागावर स्वतंत्र क्रमांक दिलेला असतो. तेहि क्रमांक स्वतंत्रपणें जुळवून घ्यावे लागतात.

त्यानंतर सुभाषबाबूंचें जीवनचरित्रहि त्याच वेळीं दिलें जात असतें. संपादकाच्या दृष्टीने ती तिसरी बातमी. तिचेहि भाग अधूनमधून दिले जातात. त्यांनाहि स्वतंत्र क्रमांक असतात आणि तेहि जुळवून घ्यावे लागतात.

सुभाषबाबूंच्या निधनाच्या बातमीचे हे तीनहि भाग स्वतंत्रपणें जुळवून घेतले नाहीत तर भाषांतराच्या वेळीं संपादकाचा एकच गोंधळ उडून जाईल.

विशेषत: लोकसभेची बैठक चालू असतांना वृत्तसंस्थेकडून येणाऱ्या बातम्यांमुळे अनेक संपादकांचा गोंधळ उडून जातो. वर तीनच प्रकारच्या बातम्यांचे गट आपण पाहिले. पण या वेळीं नुसता अेकच गोलमाल होतो. लोकसभेच्या कामाची ज्या लोकांना थोडीशी तरी कल्पना असते त्यांची गोष्ट वेगळी. पण अगदीच अनभिज्ञ अशा संपादकापुढे जेव्हा तारांचें हें प्रचंड भेंडोळें पडतें तेव्हा त्याला काय आढळून येतें? या भेंडोळयांत खालील-प्रमाणे तारांचा क्रम लागलेला असतो–

## लोकसभेचें अधिवेशन

(१) अधिवेशनाची सुरवात. क्रमांक १. २.

(२) प्रश्न क्रमांक ३. क्रमांक १ व २ मागाहून येत आहेत.

(३) अधिवेशनाची सुरवात. क्रमांक ७, ८. क्रमांक ३, ४, ५, ६ मागाहून येत आहेत.

(४) प्रश्न क्रमांक ४, ५, ६.

(५) तहकुबीची सूचना क. १, २.

(६) जवाहरलाल नेहरू क्रमांक १, २, ८, ९, ११, १८. क्रमांक ........मागाहून येत आहेत.

(७) जवाहरलाल नेहरू इंट्रो क्रमांक १, २, ३.
(८) जवाहरलाल नेहरू भाषण. क्र. ८, ९, १०.
(९) चर्चा क्र. १, २, ३, ४.
(१०) तहकुबीची सूचना. क्र. ३, ४, ५.
(११) गोंधळ क्र. १, २.
(१२) सभात्याग क्र. १, २.
(१३) जवाहरलाल नेहरू क्र. १९, २०, २१, २२.
(१४) संध्याकाळचा इंट्रो १, २, ३.
(१५) चर्चा क्र. ५, ८, ९, ११.
(१६) प्रश्न क्र. ...........

आता सांगा, या अनर्थांतून कसा अर्थ काढावयाचा ? तुम्हांला चक्रव्यूहाचा भेद करण्याइतकेंच हें कठीण वाटेल. पण खरें सांगावयाचें तर यांत कठीण असें कांही नाही. शाळेमध्ये विद्यार्थ्यांना गोष्टींतील कांही प्रसंग देऊन गोष्ट पुरी करावयाला सांगतात, तसेंच हें आहे. ही एक कहाणी आहे. ती कहाणी थोडक्यांत अशी, की लोकसभेचें आधिवेशन सुरू झालें आणि त्याचें वर्णन वृत्तसंस्था देऊं लागली. तेव्हा आधिवेशनाची सुरवात हे क्रमांक ओळीने जमविले पाहिजेत. त्या आधिवेशनांत जे प्रश्न विचारण्यांत आले त्यांचीहि हकीकत वृत्तसंस्था हातीं येईल त्याप्रमाणे देऊं लागली. त्यानंतर आधिवेशनांत जी तहकुबीची सूचना आली तिचा परामर्श घेतला पाहिजे. नंतर जवाहरलाल नेहरूंचें भाषण. ती अत्यंत महत्त्वाची बातमी व ती बरीच लांबलचकहि असणार. तेव्हा जवाहरलाल नेहरू असें म्हणून जे क्रमांक आले असतील ते एकत्र घेतले पाहिजेत. या बाबतींत एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे, की वृत्तसंस्थेच्या हातीं संगतवार असा मजकूर येत नाही. कांही मजकूर तेथील संपादकांना परत लिहावा लागतो. कांही तारांचा अर्थ लावावा लागतो, कांही तारा अपूर्ण येतात. तेव्हा जो मजकूर पुरा झालेला असतो

तो ती वृत्तसंस्था लगेच पाठवून देते. आपलें कार्य म्हणजे पुढेमागे होणारे हे क्रमांक जुळवून घेणें हें होय. आता पुढे कहाणी चालू ठेवायची म्हणजे तह-कुबीच्या सूचनेच्या वेळीं म्हणा किंवा इतर वेळीं म्हणा लोकसभेंत गोंधळ उडतो. ती लोकसभेंतीलच पण स्वतंत्र महत्त्वाची अशी बातमी. तेव्हा त्या बातमीचे क्रमांक निराळेच असणार. या गोंधळांतून सभात्याग होतो. ती तर त्याहीपेक्षा महत्त्वाची बातमी. आणि तिचेहि साहजिकच निराळे क्रमांक येणार. तात्पर्य असें, की वृत्तसंस्थेने आपला गोंधळ उडूं नये म्हणून निर-निराळे मथळे देऊन ज्या बातम्या दिलेल्या असतात त्यांचे क्रमांक जुळविणें हाच संगतवार अशी एक बातमी तयार करण्याचा मार्ग होय.

'इंट्रो' म्हणजे बातमीचा गाभा होय. महत्त्वाच्या बातम्यांचा हा गाभा देण्याची प्रथा वृत्तसंस्थांनी सुरू केलेली आहे. लोकसभेच्या बैठकीच्या बाबतींत तर सारांशहि देण्यांत येतो आणि तेथील खळबळ उडविणाऱ्या किंवा विशेष लक्षांत ठेवण्यासारख्या ज्या घडामोडी घडलेल्या असतील त्यांचा स्वतंत्रपणें एक इंट्रो तयार करण्यांत येतो. या इंट्रोमुळे संपादकाचें काम पुष्कळच हलकें होतें. कारण या इंट्रोचें भाषांतर करून दिलें की मथ-ळ्यांच्या खाली कोणता मजकूर घालावयाचा त्याची संपादकाला पंचाईत पडत नाही. कांही संपादकांचा गोंधळ उडतो म्हणजे जे अनेक इंट्रो दिलेले असतात त्यांतील कोणता निवडावयाचा आणि कोणता गाळावयाचा या-बद्दल होय. या बाबतींत साधारणपणें एक तत्त्व लक्षांत ठेवलें पाहिजे, की संपादकाचें काम फोलकटें काढून टाकून त्यांत दडलेले दाणे बाजूला काढा-वयाचे, हें होय. जो संपादक बातम्यांवर काट मारूं शकतो तो संपादक दैनिकाच्या कामाला अत्यंत लायक म्हटला पाहिजे. जॉर्ज वॉशिंग्टनने ज्या बालसुलभ बेदरकारपणाने झाडांवर कुऱ्हाडी घातल्या असतील तितक्याच बेफिकीरपणाने संपादकाने बातम्यांची कत्तल उडविली पाहिजे. तसें केलें तरच त्याचा निभाव लागेल. नाहीतर बातम्या वाचतांवाचतांच त्याचा

सारा वेळ निघून जाईल आणि वर्तमानपत्राचें एखादें पान कोरें ठेवावयाची वेळ येईल. खुर्चीवर बसल्याबरोबर संपादकाने " मजकूर किती पाहिजे ? " हाच पहिला प्रश्न केला पाहिजे. त्या प्रश्नाचें जें उत्तर येईल त्या प्रमाणांत त्याचें काम कमीजास्त होईल. वर्तमानपत्राला सहसा मजकुराचा तुटवडा पडत नाही. निदान पडूं नये. बहुशः संपादकापुढे समस्या उभी राहते ती म्हणजे मजकूर गाळावयाचा कसा आणि कोणता ? ती समस्या किती कॉलम मजकूर पाहिजे हें ठरल्याबरोबर सुटते. मग लोकसभेची बैठक असो, चर्चिल वा नेहरू यांचें भाषण असो, युद्धाची रम्य कथा असो, नाहीतर एखादी अपघाताची बातमी असो– संपादकाने हातीं टाक घेऊन बातम्यांवर नुसते फराटे मारले पाहिजेत. वर्तमानपत्राच्या कचेरींत तुम्ही गेलांत तर तुम्हांला केव्हाहि ऐकूं येईल–

" अहो, फक्त दहा कॉलम मजकूर पाहिजे. इंट्रो सोडून द्या. लोकसभेचीं प्रश्नोत्तरं अगदी थोडक्यांत आटोपा. चर्चा रात्रीं करतां येईल."

" आणि पंडितजींचं भाषण ? " कोणीतरी विचारील.

" तें पहिल्या पानासाठी ठेवा. आणि गोंधळ, सभात्याग आणि बाकीच्या खळबळ उडविणाऱ्या बातम्याहि बाजूला ठेवा पहिल्या पानासाठी."

" हें बातमीपत्र किती देऊं ? "

" कुठलं आहे ? कऱ्हाडचं का ? मग खून असतील बहुधा. तें जरा सविस्तर द्या. बाकीचीं बातमीपत्रं राहूं द्या सध्या. "

या ठिकाणीं बातमीपत्रांची चर्चा केली पाहिजे. दैनिकाकडे ठिक-ठिकाणचीं जिल्ह्यांतील, तालुक्यांतील आणि कांही खेड्यांतीलहि बातमीपत्रें येत असतात. या बातमीपत्रांचें संपादन करणें हें एक किचकट काम असतें. बातमीदारांपैकी फारच थोड्या लोकांना सुवाच्य अक्षरांत, सुटसुटीत, सोप्या भाषेंत व मुद्देसूदपणें बातमीपत्र लिहितां येतें. त्यांत त्यांचा कांहीच दोष नसतो. त्यांना तसें शिक्षण देण्याचा प्रयत्नहि झालेला नाही. बहुशः

हीं बातमीपत्रें पाल्हाळिक असतात. अनेक वेळां स्थानिक हेव्यादाव्यांचेहि पडसाद त्यांतून निघतात. त्यांची भाषा अशुद्ध तरी असते किंवा अलीकडे शैलीदार लिखाणाचें जें व्यसन जडूं पाहात आहे त्याचीहि झळ त्यांना लागलेली दिसून येते. या बातमीपत्रांच्या बाबतींत खरी काळजी घ्यावी लागते ती म्हणजे त्यांत कांही बदनामीकारक मजकूर आहे किंवा काय हें पाहण्याची. दैनिक वृत्तपत्रांवर खुलासे करण्याची पाळी येते किंवा कांही वेळीं बदनामी केल्याबद्दलच्या तक्रारींना तोंड द्यावें लागतें, तें अनेक वेळां या बातमीपत्रांमुळेच होय. म्हणून वार्ताहर नेमतांना जो निखालस खोट्या बातम्या देणार नाही व स्थानिक राजकारणांत तो भाग घेत असला तर जाणूनबुजून कोणाला खाली पाडण्यासाठी खोडसाळ व कायद्याच्या कचाटींत येणाऱ्या बातम्या जो पाठविणार नाही अशा तऱ्हेचा इसम निवडण्याचीच संपादकाने खबरदारी घेतली पाहिजे–

जिल्ह्यांतील वार्ताहरांची पातळी वाढली तर संपादकाचें बरेंच काम हलकें होईल. आज मात्र एका महत्त्वाच्या संपादकाला बातमीपत्रांचें संपादन करण्यांत आपला सारा वेळ घालवावा लागतो. साधारणपणें जिल्ह्यांतील बातमीदार खालील प्रकारचे असतात–

(१) तज्ज्ञ बातमीदार. ते आपल्या विभागांतील साऱ्या घडामोडी प्रामाणिकपणें आणि कोठलाहि पूर्वग्रह न ठेवतां पाठवीत असतात. आणि हीं बातमीपत्रें चांगल्या भाषेंतहि त्यांनी लिहिलेलीं असतात. या बातमीपत्रांचें संपादन करावें लागत नाही. फक्त त्यांवर मथळा दिला म्हणजे झालें.

(२) भाषणांचे अहवाल पाठविणारे बातमीदार. या भाषणांना त्या भागांत किंवा सबंध प्रांतांत जें महत्त्व असेल त्याप्रमाणे या बातमीपत्रांचा उपयोग होतो. मजकुराचा तुटवडा पडेल तेव्हा वाङ्मयीन किंवा तात्त्विक अशा स्वरूपाच्या भाषणांचे हे अहवाल घालतां येतात.

(३) खळबळ उडविणाऱ्या बातम्या किंवा खटले देणारे बातमीदार. या बातम्या फोनवरून किंवा तारेने आल्या तर पहिल्या पानासाठी किंवा

निरनिराळ्या डाक आवृत्त्यांसाठी त्यांचा उपयोग होऊं शकतो. कोर्ट-खटल्या-मुळे त्या विभागांत वर्तमानपत्राचा खप वाढण्याचा बराच संभव असतो त्यामुळे या बातमीपत्रांना महत्त्व प्राप्त होतें.

(४) राजकीय पक्षांत कार्य करणारे बातमीदार. विशिष्ट पक्षाच्या प्रचाराकडेच त्यांचें लक्ष असतें. त्याच्या जोडीला विरोधी पक्षाला कमीपणा आणण्याकडेहि त्यांचा कल असतो. तेव्हा त्यांचीं बातमीपत्रें जरा काळजी-पूर्वक वाचलीं पाहिजेत.

(५) स्थानिक शाळामास्तर वा संस्थेचे कार्यकर्ते असलेले बातमीदार. यांच्या बातमीपत्राचें क्षेत्र अगदींच मर्यादित असतें. बहुशः कोणा लब्ध-प्रतिष्ठित माणसांच्या हालचाली, थोरामोठ्यांच्या घरचे समारंभ वा जन्ममृत्यु यांचीच नोंद त्यांच्या बातमीपत्रांत असावयाची. अर्थातच स्थानिक समाजांत त्या बातम्यांना कांही महत्त्व असतेंच.

या बातमीपत्रांचें संपादन करतांना कांही वेळां सारें बातमीपत्र पुन्हा लिहून काढावें लागतें, बराचसा मजकूर गाळावा लागतो व मथळे व पोट-मथळे द्यावे लागतात. मथळे देतांना पुष्कळ वेळां मोठी गंमत उडते. बातमीपत्रांत निरनिराळ्या बातम्या असतात. त्यांचे मथळे मात्र एकत्र येतात. उदाहरणार्थ, एका वर्तमानपत्रांत खालील दोन मथळे एकत्र आले होते.

## नागपूर येथील बलात्काराचा खटला
## सुप्रसिद्ध मजूर पुढारी श्री. रुईकर यांना शिक्षा

हे नुसते मथळे वाचले तर कोणाचाहि केवढा बरें गैरसमज होईल! पण या बातमीपत्रांत दोन बातम्या होत्या. एक नागपूर येथील एका बलात्काराच्या खटल्याची; आणि दुसरी श्री. रुईकर यांच्यावर चाललेल्या एका राजकीय खटल्याची. संपादकाने ज्या वेळीं या बातमीपत्रांवर मथळे दिले त्या वेळीं या दोन मथळ्यांच्या संयोगाने केवढा अनर्थकारक गैरसमज

होईल त्याची त्याला कल्पनाहि आली नसेल ! पण वर्तमानपत्र छापून आल्यानंतर मात्र त्याचे डोळेच फिरले असतील !

असाच एक अभावित विनोद दुसऱ्याहि एका वर्तमानपत्रांत झाला होता. त्या वर्तमानपत्रांत खालील दोन मथळे एकत्र आले होते–

**दे. भ. ××× यांचें सांगलींत आगमन**

**नदींत बुडून मृत्यु**

येथेहि दोन निरनिराळ्या बातम्या होत्या. एक दे. भ. अमुकअमुक यांच्या आगमनाची आणि दुसरी त्याच दिवशीं नदींत बुडून मेलेल्या एका माणसाची. पण दोन मथळयांचा संयोग झाल्यामुळे किती चमत्कारिक अर्थ निर्माण झाला होता !

तेव्हा बातमीपत्रांचें संपादन करतांना मथळयांकडेहि सर्व दृष्टींनी लक्ष पुरविणें आवश्यक असतें. तीच काळजी पोटमथळयांबद्दलहि घेतली पाहिजे. कारण वाचकाचें लक्ष मथळयावरून पोटमथळयावर जातें आणि त्यांनी त्याची पकड घेतली तरच तो मजकुराकडे वळतो. नाहीतर मथळया-वरून त्याचा जो ग्रह झालेला असेल तोच कायम राहून बराचसा गैरसमज निर्माण होऊं शकतो.

बातमीपत्रांचा वर्तमानपत्राला दोन दृष्टींनी उपयोग होत असतो. एक, आपला खप त्या भागांत वाढविण्यासाठी आणि दुसरा त्या भागांतील जे लोक, वर्तमानपत्र ज्या शहरांत निघतें त्या शहरांत राहावयास आले असतील, त्यांच्या गावांतील बातम्या छापून त्यांचीं मनें काबीज करण्यासाठी. त्या दृष्टीने देशविदेशांतील महत्त्वाच्या वार्तांना जें महत्त्व असतें तेंच जिल्हयांतील बातमीपत्रांनाहि असतें. ज्या वर्तमानपत्राचीं जिल्हा व तालुका वार्तापत्रें चांगलीं असतात त्यांचा खपहि चांगला असतो आणि त्यांचें वजनहि चांगलें असतें. स्थानिक चळवळींना चालना देण्याच्या दृष्टीनेहि या वर्तमानपत्रांचा

उपयोग होतो आणि लोकमत तयार व सुशिक्षित करण्याचेंहि कार्य हीं वर्तमानपत्रें करूं शकतात. शहरांतील वर्तमानपत्रांत जिल्हा, तालुका वा खेड्यांतील गाऱ्हाण्यांची नोंद झाली तर सरकारचेंहि त्यांच्याकडे लक्ष वेधलें जातें व तीं गाऱ्हाणीं मिटावयाचाहि संभव निर्माण होतो. जिल्हयांतील बातमीपत्रें हीं शहर व खेडीं यांच्यामधील एक दुवा होय. खेड्यापाड्यांतील लोकांचा त्यामधून आवाज उठतो इतकेंच नव्हे, तर तेथील चारित्र्यवान् वा कर्तबगार कार्यकर्त्यांची शहरांतील लोकांना ओळख पटते व दुश्चरित्र धनिक वा गावगुंड यांच्या अनाचारांच्या हकीकती त्यांच्यातर्फेंच व्यापक समाजापुढे येतात आणि त्यांच्या शासनाची मागणी सरकार-दरबारीं करणें अधिक सोयीचें होतें. म्हणून बातमीपत्रांचें संपादन करण्याचें कार्य अत्यंत जबाबदार अशा संपादकाच्या हातीं देणेंच इष्ट असतें. आणि त्यानेंहि ही उच्च दृष्टि ठेवूनच आपलें कार्य केलें पाहिजे.

अर्थात् आलेलीं बातमीपत्रें तपासून देणें एवढेंच या संपादनाचें स्वरूप असूं नये. आपल्या बातमीदारांच्या शिक्षणाकडे लक्ष पुरवून हीं बातमीपत्रें जात्याच कशीं आकर्षक व वरीलप्रमाणे उपयुक्त होतील हेंहि त्याने पाहिलें पाहिजे. संपादक व जिल्हयांतील बातमीदार यांच्यामध्ये शैक्षणिक दृष्टीने जशी तफावत असते तसाच बातम्यांकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोनहि वेगळा असण्याचाच संभव अधिक असतो. संपादकाने आपला मानसिक दृष्टिकोण बातमीदारांवर लादूं नये. उलट बातमीदारांच्या नैसर्गिक प्रवृत्ति काय आहेत याचा अभ्यास करून त्यांना फक्त योग्य तें वळण लावण्याचाच त्याने प्रयत्न करावा. शहरांतील सुशिक्षित वर्गाचा प्रतिनिधि असलेल्या संपादकाला जिल्हयांतील वा खेड्यांतील जीवन, तेथील लोकांच्या आशा-आकांक्षा-अपेक्षा, त्यांच्या आवडीनिवडी, त्यांचे हितसंबंध, यांच्याबद्दलची यथार्थ कल्पना असणें शक्य नसतें. तो आपल्या चष्म्यांतून तेथील जीवनाकडे पाहतो व त्यामुळे स्थानिक बातमीपत्रांची कसोटी त्याच निकषा-

वर घासून तो लावूं पाहतो. पण तसें करणें हें बातमीदारालाहि अन्यायाचें होईल आणि त्या विभागांत खप वाढविण्याचा उद्देशहि त्यामुळे सफल होणार नाही.

उदाहरणार्थ, गावचा पाटील व्यायामशाळा उघडतो, मामलेदारसाहेब सहकारी संस्थेच्या इमारतीचें उद्घाटन करतात, शाळामास्तर आरोग्य-सप्ताह सुरू करतो, स्थानिक सावकाराच्या घरीं मुलाचें कार्य होतें व त्या समारंभाला कलेक्टरसाहेब हजर राहतात, पोळयाच्या सणानिमित्त गावकऱ्यांची मोठी मिरवणूक निघते, दसरा-संमेलनानिमित्त कुस्त्यांचा फड पडतो, वाघजईच्या जत्रेंत छकड्यांची शर्यत लागते, विभागीय हुतूतूच्या सामन्यांत मिरजेच्या सुभाष आखाड्याला पदक मिळतें, खडांबें येथे होळीच्या दिवशीं पोवाडे-गायन होतें, वगैरे वगैरे बातम्यांबद्दल शहरांतील संपादकाला कदाचित् आस्था वाटणार नाही; पण गावकऱ्यांच्या दृष्टीनें त्या वेळीं तरी यांपैकी एखादी बातमी कोठल्याहि इतर महत्त्वाच्या बातम्यांइतकीच किंवा त्या-पेक्षा काकणभर आधिक महत्त्वाची ठरेल. अर्थात् अलीकडील काळांत वर्त-मानपत्राच्या संपादकांचा नूर व दृष्टिकोण बराच बदलत चालला आहे हें येथे नमूद करावेंच लागेल. 'लोकमान्या'चे आजचे संपादक श्रीयुत पां. वा. गाडगीळ यांनी मागे एकदा भाषण करतांना म्हटलें होतें, की जोंधळ्याचीं दाणेदार कणसें शिवारांत डुलत आहेत, असें वर्णन करणारीं बातमीपत्रें छापणें हें मला इतर कोणत्याहि बातम्या छापण्यापेक्षा अधिक अभिमानास्पद वाटेल. खेड्यांकडे व तेथील जीवनाकडे पाहण्याचा शहरी वर्तमानपत्रांचा दृष्टिकोण बदलत चालला आहे व खेड्यांतलि बहुरंगी जीवनाचें शब्दचित्र आपल्या वर्तमानपत्रांत उमटावें ही कळकळीची इच्छा आपल्या संपादकां-मध्ये निर्माण झाली आहे, होत आहे, हेंच श्री. गाडगीळ यांच्या या उद्गारां-वरून प्रकट होतें.

पण आपलीं वर्तमानपत्रें ग्रामीण जनतेच्या इतकेंच नव्हे, तर सर्व-साधारण लोकांच्या जीवनाशीं समरस होण्यासाठी आपल्या दृष्टिकोणांत आण-

खीहि एक महत्त्वाचा बदल होणें आवश्यक आहे असें मला वाटतें. बातमीदारांकडे दृष्टि टाकली तर बहुशः हे बातमीदार पांढरपेशा वर्गातील असलेलेच आपल्याला आढळून येतें. त्यांची दृष्टि साहजिकच आपल्या वर्गातील लोकांकडे व त्यांच्या चळवळीकडेच असते. म्हणून त्यांच्या बातमीपत्रांत भाषणेंहि पांढरपेशा व्यक्तींचीं, सामाजिक चळवळींच्या बातम्याहि त्याच वर्गातील लोकांच्या आणि सत्कार वा निरोपाचे समारंभ झाले तरी एखाद्या निवृत्त होणाऱ्या पांढरपेशा शिक्षणाधिकाऱ्याचे किंवा स्थानिक वकिलाचे किंवा महिला संघांतील एखाद्या पांढरपेशा स्त्रीचेच असतात. आपल्या वर्तमानपत्रांत दररोज छापून येणारीं नांवें तुम्ही सहज चाळून पाहा, नव्वद टक्के हीं नांवें तुम्हांला ब्राह्मण, प्रभु वा सारस्वत किंवा अशाच पांढरपेशा वर्गातील आढळतील. बातमीपत्रांतहि त्याच नांवांची गर्दी असते. हें खरें, की हे वर्ग आज समाजाचे पुढारी आहेत. सामाजिक व राजकीय चळवळींचीं सूत्रें त्यांच्याच हातीं आहेत. वाङ्मयीन क्षेत्रांतहि त्यांचेंच प्राबल्य आहे. म्हणून त्यांचीं नावें पुढे येणें क्रमप्राप्त आहे. परंतु खालच्या समाजांतील वा खालच्या थरांतील लोकांची शैक्षणिक व सांस्कृतिक पातळी वाढावयाची असेल तर त्यांना उत्तेजन देऊन पुढे आणावयाला नको काय ? त्यांच्या ज्या लहानलहान चळवळी असतात, त्यांच्या ज्या छोट्याच पण नमुनेदार संघटना असतात, त्यांचें भाबडें व मोडकेंतोडकेंहि म्हणा पण रसरशीत असें जें वाङ्मय बाहेर पडत असतें आणि त्यांच्यांपैकी जे लोक आयुष्यभर कष्ट करून मोठ्या मानाने गिरण्यांतून वा कारखान्यांतून निवृत्त होतात किंवा गावपंचायतींचा किंवा सहकारी संस्थांचा कारभार सचोटीने व कौशल्याने चालवून गावाची जे महनीय सेवा करतात त्यांना प्रसिद्धि देऊन त्यांचा गौरव करणें आवश्यक नाही काय ?

मला तर वाटतें, आपण नेहमीच्या चाकोरींतून जाऊन केवढ्या तरी खऱ्याखुऱ्या आणि हृदयस्पर्शी इतिहासाला मुकत असतों. जिल्ह्याचा पोलीस

सुपरिंटेंडेंट निवृत्त होतो तेव्हा आपला बातमीदार त्याच्या सत्कारसमारंभाचें वर्णन करतो, इतकेंच नव्हे, तर त्याची मुलाखतहि घेतो. पण त्याच वेळीं एखादा पोलीस जमादारहि तीस-पस्तीस वर्षें अविच्छिन्नपणें सेवा करून निवृत्त होत असतो, त्याच्याकडे कोणाचें लक्ष जात नाही. पण सातारा जिल्ह्यांत जिजावरील बलात्काराचा जो खटला गाजला होता व ज्या खटल्यांतील उलट तपासणीमुळे दादासाहेब करंदीकरांचें नांव महशूर झालें होतें त्या जिजाचा पहिला जबाब या जमादाराने घेतलेला असेल; कदाचित् लोकमान्य टिळकांना पकडण्यांत आलें त्या वेळीं हा जमादार गायकवाडवाड्यांत हजर असेल; किंवा महात्मा गांधींच्यावर ससून हॉस्पिटलमध्ये शस्त्रक्रिया झाली त्या वेळीं त्यांच्या खोलीवर पहारा करण्याचें काम त्याने केलेलें असेल. हा जमादार जेवढ्या आठवणी सांगूं शकेल आणि त्याच्या जीवनांतील अनुभव जेवढे हृदयंगम असतील तेवढ्या आठवणी व अनुभव किती लोकांना सांगतां येतील ? पण आपण थोरामोठ्यांच्या दिखाऊ एकसष्ट्या आणि रौप्यतुला, ख्यातनाम व्यक्तींचीं नीरस भाषणें, लफ्फेबाज शालू नेसून येणाऱ्या महिलांच्या एखाद्या सरस्वती समाजाचे वाढदिवस, " उद्योग, उत्साह, आत्मोन्नति " या सदरांत बसणाऱ्या प्रथितयश उद्योगपतींची समाजसेवा यांच्या बातम्या छापण्यांतच इतके गर्क असतों, की या गरीब पण ज्याच्या जीवनांत अनेक रोमहर्षक घटना घडलेल्या असतील अशा जमादाराकडे लक्ष द्यावयाला आपल्याला वेळहि मिळत नाही, किंवा या किंवा अशाच कित्येक अज्ञात लोकांच्या जीवनावर प्रकाशकिरणें टाकण्याची आपल्याला कधी कल्पनाहि सुचत नाही.

खरें पाहिलें तर आपला बहुसंख्य वाचकवर्ग हा बहुजनसमाजांतीलच असतो. लब्धप्रतिष्ठित पांढरपेशा वर्ग मराठी वर्तमानपत्रांची बहुशः उपेक्षाच करीत असतो. ज्या मामलेदाराच्या सत्काराची बातमी आपण छापतों तो मामलेदार मराठी वर्तमानपत्रांकडे नाकें मुरडीत म्हणत असतो, की

" टाइम्स वाचल्याशिवाय आपलं समाधान होत नाही बुवा ! " आणि गिरणींतील मजूर, कचेरींतील शिपाई, सलूनमधील नोकर, दाणेबाजारांतील हमाल, पुण्यांतील टांगेवाला, खेड्यांतील जागरूक कार्यकर्ता आणि चार बुकें शिकलेला शेतकरी हा मात्र गाडगीळ, पाध्ये, महाजनी यांच्या अग्र-लेखांचें मर्म समजावून घेण्याचा कसोशीनें प्रयत्न करीत असतो. पण आमचा हा आधारस्तंभ असलेल्या बहुजनसमाजाचें सामाजिक जीवन आमच्या वर्तमानपत्रांतून कितीसें प्रकट होत असतें ? बहुजनसमाजाचे पुढारी बनलेल्या लोकांचीं भाषणें आम्ही छापतों, त्यांच्या हालचालींनाहि आम्ही महत्त्व देतों. मराठी वर्तमानपत्रांच्या संपादकांना बहुजनसमाजाबद्दल अनास्था असते असें तर मुळीच नव्हे. फक्त एवढेंच, की आमचा दृष्टिकोण अद्यापहि पांढरपेशा राहिलेला आहे आणि तो बदलणें आवश्यक आहे. बहुजनसमाजांतील पुढाऱ्यांना प्रसिद्धि देऊन आम्ही त्यांनाहि पांढरपेशा वर्गांत समाविष्ट करून घेतों एवढेंच. बहुजनसमाज, त्याच्या हालचाली, त्या समाजांतील उपेक्षित पण उपेक्षणीय नसलेल्या लोकांचें जीवन हें मात्र अद्यापहि आमच्या प्रसिद्धीच्या कक्षेबाहेर राहिलेलें आहे. त्या जीवनावर प्रकाश न टाकून आपण बहुजनसमाजाची उपेक्षा करतों की काय हें ज्याचें त्यानें ठरवावें. पण आपल्या वर्तमानपत्रांत जिवंत, रसरशीत आणि हृदयंगम असा जो मजकूर आपण या मार्गानें देऊं शकूं तो न देऊन आपण आपलें स्वतःचेंच नुकसान करीत असतों एवढेंच मला म्हणावयाचें आहे. बातमीपत्रांचें स्वरूप या दृष्टीनें बदललें तर केवढा तरी वाचकवर्ग मराठी वर्तमानपत्रांना मिळूं शकेल आणि बहुजनसमाजाच्या उदार, भक्तीनें भरलेल्या हृदयांत त्यामुळे आपल्याला कायमचें स्थानहि मिळेल.

★ ★ ★

प्रकरण ३ रें

# घात, अपघात, आत्मघात

★

रात्रपाळीच्या वेळीं सुमारें बारा वाजतां फोन वाजूं लागला म्हणजे आम्ही म्हणायचे, "घात, अपघात, आत्मघात आले हो!" मग पेन्सिल व कागद सरसावीत आम्हीं फोन हातीं घेतला म्हणजे आवाज यावयाचा, "आज रात्रीं सुमारें ११ वाजून २० मिनिटांनी पायधुणी येथे एक बराच मोठा दंगा झाला. दोन मवाली गटांतील मारामारीनं या दंगलीला सुरवात झाली व त्यांत सुऱ्यांचा, सोडावॉटरच्या बाटल्यांचा व दगडविटांचा सर्रास उपयोग करण्यांत आला......"

आम्हीं मोठ्या उत्सुकतेने विचारायचे, "काय हो, जातीय दंगाच की काय हा?"

आमच्या वार्ताहराचा आवाज यावयाचा, "हो हो! पण आपल्याला तें देतां मात्र येणार नाही. तुम्ही आपलं मोघम लिहा, पायधुणींत दंगल पेटली म्हणून......" वगैरे वगैरे.

नंतर एखादे वेळीं फोन यावयाचा, "आज संध्याकाळीं ठाकुरद्वार येथील एका तिमजली इमारतीला आग लागली. फिल्मचं एक गुदाम त्या इमारतींत होतं व तेथूनच आगीला सुरवात झाली. आगीचे बंब लगेच येऊन

तीन तासपर्यंत सतत पाण्याचा वर्षाव केल्यानंतर ती आग आटोक्यांत आली. या आगीमुळं सुमारे एक लक्ष रुपयांचं नुकसान झालं असावं असा अंदाज आहे.... ''

'' कुणाला इजा तर झाली नाही ना ? '' आम्ही विचारायचे.

'' तीन इसमांना गंभीर दुखापती झाल्या आहेत. त्यांतील एक अत्यवस्थ आहे. मी आताच इस्पितळांत फोन करीत आहें. मेलाबिला तर मागाहून कळवीन. '' ते शांतपणें म्हणावयाचे.

एकदा त्यांचा फोन आला– '' आज मंगळदास मार्केटच्या समोर रात्रीं सुमारें दहा वाजतां नोटांचा पाऊस पडला ! ''

'' अहो काय ? ह्मणजे काय ? नोटांचा पाऊस ? '' मीं आश्चर्यानें विचारलें.

ते हसतहसत ह्मणाले, '' हो हो पाऊस ! ह्मणजे असं झालं... '' आणि मग तिसऱ्या मजल्यावरील एका इमारतींतील एका दलालाच्या पांच वर्षांच्या मुलाच्या हातांत सुमारें दहावीस हजारांच्या पांचपांच रुपयांच्या नोटा कशा आल्या व त्यानें त्या खिडकींतून फेकण्याचा सपाटा चालविल्यामुळे नोटांचा पाऊस पडतो आहे असें लोकांना कसें वाटलें व त्यानें बाजारांत कशी खळबळ उडाली याची त्यांनी साद्यंत बातमी दिली.

शहरांतील रात्रीचा वार्ताहर ह्मणजे वर्तमानपत्राच्या यशास्वितेला खरा हातभार लावणारा वर्तमानपत्रांतील एक महत्त्वाचा घटक होय. ज्या शहरांत वर्तमानपत्र निघतें तेथेच त्याचा जास्तींत जास्त खप असणार यांत काय संशय ? हा खप अर्थातच बऱ्याच अंशीं शहरांतील दैनंदिन घडामोडींच्या बातम्यांवर अवलंबून असतो. दैनंदिन घडामोडींत अनेक गोष्टींचा समावेश होतो. उदाहरणार्थ, सरकारी कचेऱ्यांतील बातम्या, थोर पुढाऱ्यांचें आगमन, त्यांचीं भाषणें, पत्रकारांना त्यांनी दिलेल्या सामुदायिक मुलाखती, शहरांत घडणारे समारंभ, संमेलनें, इतर व्याख्यानें,

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.



प्रदर्शनें, चित्रपटांचे वा नाटकांचे पहिले प्रयोग, करमणुकीचे इतर प्रयोग, खेळ, खेळाडूंचे सत्कार, परिषदा, उत्सव वगैरे वगैरे. या सर्व घडामोडींच्या बातम्या आणण्यासाठी नेहमीचे व खास वार्ताहर वर्तमानपत्रांजवळ असतात. पण त्या वार्ताहरांपेक्षा रात्रीच्या वार्ताहराचें काम वेगळें, स्वरूप वेगळें व महत्त्वहि वेगळें म्हणून या महत्त्वाच्या घटकाचा आधी विचार करूंया.

रात्रींचा वार्ताहर ही एक अजब चीज होय एवढेंच म्हटलें म्हणजे त्याची कांहीशी कल्पना करतां येईल. आमच्या मुंबईचे रात्रीचे वार्ताहर श्री. निमकर हे केव्हाहि आम्हांला भेटले की आम्ही त्यांना विचारायचे, " काय निमकर, कुठं निघालांत ? "

ते हसून आमच्याकडे पाहात आणि सिगरेटचा एक झुरका मारीत लगेच म्हणायचे, " आत्ताच कोर्टांतून आलों. किशोरीचा खटला आज होता ना ! काय, सविस्तर द्यायचा ना आपल्याला ? "

कोर्ट, पोलीसठाणीं, इस्पितळें, कॉरोनरचें कोर्ट, अपघाताचीं स्थळें आणि कधीमधीं स्मशानगृह हींच रात्रीच्या वार्ताहराचीं मुख्य संचारस्थळें. त्यांतल्या त्यांत पोलीस अधिकाऱ्यांशीं त्यांची घसट जास्त. कारण वरील सर्व ठिकाणांशीं पोलिसांचा प्रत्यक्ष वा अन्योन्यसंबंध असावयाचाच आणि पोलिसांकडूनच त्यांना येथे घडणाऱ्या बातम्यांची बहुशः चक्षुर्वै सत्यं हकीकत कळावयाची.

रात्रीचा वार्ताहर हा माझ्या दृष्टीने खरा आणि निर्भेळ बातमीदार होय. त्याचा संबंध फक्त बातमीशीं असतो. आणि ती मिळाली एवढेंच त्याच्या दृष्टीने महत्त्वाचें असतें. तात्काळ त्याची प्रतिक्रिया ही, की आपण ती आपल्या वर्तमानपत्राला कळविली पाहिजे. लगेच तो फोन हातीं घेतो आणि बातमीचा आशय आपल्या वर्तमानपत्राला कळवितो. ती बातमी लिहिण्याचें काम त्याचें नव्हे. संपादकाने ती कशी लिहिली असेल, कशी सजविली असेल त्याचीहि त्याला पर्वा नसते. इतर वार्ताहरांना बातमीबद्दल

आस्था असते. तशीच ती बातमी वाचकांसमोर योग्य रीतीने, चांगल्या भाषेंत, चांगल्या सजावटीने यावी याबद्दल त्याला त्याहीपेक्षा अधिक आस्था असते. त्या वार्ताहराने भाषण लिहून दिलें किंवा समारंभाचें वर्णन केलें तर त्याची विशिष्ट शैली त्यांत प्रकट होते. तसें रात्रीच्या वार्ताहराचें नाही. त्याचें काम सगळें तोंडीं असतें. फोनवरून तो जसा बातमी देतो तशीच प्रत्यक्षपणें कचेरींत आल्यानंतरहि तो बातमी तोंडींच देत असतो.

म्हणून रात्रपाळीच्या संपादकाला रात्रीच्या वार्ताहराने दिलेल्या बातमी-वर सर्व सोपस्कार करावे लागतात. म्हणजे प्रथमपासून शेवटपर्यंत ती लिहून काढावी लागते, ती आपल्या मगदुराप्रमाणे व कल्पनेप्रमाणे सजवावी लागते आणि तिचें स्थान ठरवून ती वाचकांना सादर करावी लागते. ही बातमी बहुधा अव्वल दर्जाचीच असते. आणि म्हणून त्या बातमीकडे अखेरपर्यंत डोळे लावूनच त्याने बसावयाला पाहिजे.

रात्रपाळीच्या संपादकाला रात्रीच्या वार्ताहराकडून नेहमीच हात मिळेल असें मात्र नव्हे. रात्रीचा वार्ताहरसुद्धा अहर्निश तपश्चर्या करीत असतो. कधीमधीच ती तपश्चर्या सफल होते. पण फलाची अपेक्षा करीत त्याला सदैव जागरूक राहावेंच लागतें. त्यासाठी त्याला किती तास काम करावें लागेल याचा नियम नाही. त्याचा मार्गहि निष्कंटक नसतो. अनेक अडचणींना तोंड देऊनच त्याला आपल्या वर्तमानपत्राला बातमी पुरविण्यांत यश येऊं शकतें आणि बऱ्याच हिकमतीने व कल्पकतेनेंच तो पुष्कळ वेळां या बातम्याहि पैदा करीत असतो.

१९४२ सालचीच गोष्ट पाहा. गांधीजींनी 'छोडो हिंदुस्थान'चा ठराव मांडल्यानंतर दुसऱ्याच दिवशीं पहाटे त्यांना व इतर काँग्रेस-पुढाऱ्यांना अटक झाली. रात्रभर सारे वार्ताहर त्यांच्या किंवा इतर पुढाऱ्यांच्या निवास-स्थानाभोवती घिरट्या घालीत होते. पोलिसांच्या हालचाली कमालीच्या गुप्तपणाने चाललेल्या होत्या. पण वार्ताहर हे चिकाटींत कोणालाहि हार

जाणारे नसतात. आणि बातम्या काढावयाच्या म्हटल्या म्हणजे ते कोठल्याहि हिकमती करावयाला मागेपुढे पाहणार नाहीत. त्यांनी गांधीजींच्या अटकेची बातमी मिळविली व लगेच फोन हातीं घेतला. पण त्या दिवशीं पोलिसांनी त्यांनाहि चकविलें. कारण पहाटे तीन वाजल्यापासून टेलिफोनचें दळणवळणच बंद करण्यांत आलें होतें. अर्थातच हातीं असेल तें किंवा मिळेल तें वाहन घेऊन रात्रीच्या वार्ताहरांना आपापल्या वर्तमानपत्रांच्या कचेरींत जावें लागलें.

रात्र असो, बेरात्र असो, दंगा असो किंवा कर्फ्यू ऑर्डर असो, वादळ असो किंवा पाऊस असो, रात्रीच्या वार्ताहराला बातमीच्या शोधार्थ बाहेर पडावेंच लागतें. संकटें हीं तर त्याच्या पांचवीला पुजलेलीं असतात आणि त्रास, कष्ट, जागरण करणें हा त्याचा दिनक्रम झालेला असतो. त्याला कोणतीं दृश्यें पाहावीं लागत नाहीत? दंग्याच्या काळांत तो पोलिसांच्या बरोबर किंवा स्वतंत्रपणें वाहनांतून किंवा पायीं हिंडत असतो. सुरीहल्ले झालेले पाहण्याचें त्याच्या नशिबीं येतें. इस्पितळांत मरणाच्या दारीं पडलेल्या माणसाचा जबाब घेतला जात असतांना तो हजर असतो. शवगृहांतील मुडदे पाहणें हा तर त्याचा नेहमीचा व्यवसाय असतो. अपघाताने छिन्नविच्छिन्न झालेलें प्रेत, खुनाच्या आरोपावरून देहांताची सजा झालेल्या आरोपीच्या डोळयांत डबडबलेले अश्रु, आगीमुळे धडाडून पेटलेल्या इमारती हीं आणि अशींच भयानक किंवा हृदयद्रावक दृश्यें तो पाहात असतो आणि निर्विकार मनाने परंतु आपण ‘बातमी’ देत आहोंत या ईर्षेने तो त्यांचें वर्णन करीत असतो.

खरोखर रात्रीचा वार्ताहर नसेल तर दैनिक वृत्तपत्रांतील बरेंचसें चैतन्य व चटकदारपणा नाहीसा होईल. कोर्टांतील खटले, दंगेधोपे, खून, आत्महत्त्या, आगी, अपघात, स्फोट यांच्या बातम्या हें दैनिक वर्तमानपत्राचें एक प्रमुख आकर्षण असतें. या बातम्यांची हेटाळणी करणारे कांही लोक असतात आणि कांही संपादकहि सोवळेपणाने ह्मणतात, “काय वाचकवर्गांच्या हीन आवडी झाल्या पाहा. खून, घटस्फोट, व्याभिचार, गुन्हे यांच्याच

बातम्या बेटे मिटक्या मारीत वाचीत असतात ! " असेलहि कदाचित तसें. पण वर्तमानपत्रांना या बातम्या छापण्याशिवाय तरणोपाय नाही हें मात्र कबूल केलेंच पाहिजे. वस्तुतः शांतपणें विचार केला तर या बातम्यांच्या बाबतींत सोवळेपणा ठेवण्याचें कांहीएक कारण नाही हें आपल्याला पटल्याशिवाय राहणार नाही. राजद्रोहाच्या खटल्यांत लोकांना जसें व जितकें कुतूहल असतें तितकेंच बावला खुनाच्या खटल्यांतहि असतें. मनुष्यस्वभावच आहे तो. युद्धाच्या वार्ता जर रम्य असतात तर दंगेधोपे, मारामाऱ्या यांच्या कां असूं नयेत ? थोरांचें निधन झालें म्हणजे आपण ती बातमी काळ्या चौकटींत देतों, आणि अंतकाळच्या व त्यानंतरच्या परिस्थितीचें हृदयस्पर्शी वर्णनहि आपण छापतों. मग एखाद्यानें आत्महत्त्या करून अनैसर्गिकपणें मृत्यु ओढवून घेतला तर त्याच्याबद्दल सर्वसाधारण वाचकाला वाटणारें कुतूहल आपण कां बरें पुरें करूं नये ? किंवा एखाद्यानें आपली पत्नी व प्रेयसी यांना मोटारींत घालून स्वतःसह ती मोटार जाळून सर्वांच्याच जीविताचा हृदयद्रावकपणें अंत केला तर त्या बातमीला कां बरें प्राधान्य देऊं नये ? बातमी म्हटली म्हणजे ती बातमीच होय. कोणाला एखाद्या बातमीबद्दल आस्था नसली तर त्यानें तीं वाचूं नये. पण इतर लोक वाचतात म्हणून त्यानें नाक मुरडण्याचें मात्र कारण नाही.

खरें सांगावयाचें तर कोणतीहि बातमी आपण कशी देतों, यावरूनच तिचें स्वरूप ठरत असतें. व्यभिचाराचा किंवा बलात्काराचा खटला ही असंस्कृत त्याचप्रमाणे सुसंस्कृत अशा दोघांच्याहि दृष्टीनें कुतूहलाची गोष्ट होय. सोवळेपणाचा आविर्भाव आणणारे लोक तर हे खटले अधिकच आवडीनें वाचतात; कदाचित् उघडपणानें ते वाचीत नसतील. खरा पत्रकार या खटल्यांकडे दुर्लक्ष करणार नाही; पण ते रंगवितांना त्यांत विकृत गोष्टींना किंवा ज्यांमुळे आपल्या वाचकवर्गाला किळस येईल अशा प्रसंगांना वाव मिळणार नाही याची तो खबरदारी घेईल. व्यभिचार आणि इतर गुन्हे

या जीवनांत घडणाऱ्या गोष्टी होत. कथाकादंबऱ्यांतून त्यांचें वर्णनहि होतें आणि सर्वजण तीं वर्णनें वाचतातहि. मग वर्तमानपत्रांनी मात्र सोवळेपणा दाखवून या गुन्ह्यांच्या बातम्यांवर बहिष्कार टाकावा असें कसें म्हणतां येईल ?

तात्पर्य असें, की रात्रीचा वार्ताहर ज्या बातम्या देत असतो त्या अत्यंत महत्त्वाच्या असतात व त्या बातम्यांचा एक फार मोठा वाचकवर्ग असतो हें समजून संपादकाने त्या बातम्यांची बूज राखली पाहिजे. या बातम्या देतांना कांही नियंत्रणें व कांही मर्यादा मात्र त्याने पाळणें आवश्यक आहे. नियंत्रणें कायदेशीर तशींच नैतिक असतात. आणि मर्यादा या सद्‌भिरुचीच्याच होत. कायदेशीर नियंत्रणें पाळलीं नाहीत तर अर्थातच वर्तमानपत्र गोत्यांत येईल. या बाबतींत रात्रपाळीच्या संपादकाने सर्वसाधारणपणें एक नियम करावा आणि तो हा, की कायदेशीरपणाबद्दल त्याच्या मनांत संदेह उत्पन्न झाला व कोणाचा सल्ला घेणें त्याला त्या वेळीं शक्य झालें नाही, तर या बातमीचा मोह टाळणें हाच सर्वोत्कृष्ट मार्ग होय. पुष्कळ वेळां या बातम्या न्यायप्रविष्ट असतात. तेव्हा त्या देणें हा कोर्टाचा अवमान होण्याचा संभव असतो. आणि त्यामुळे आरोपीवर अन्याय होणेंहि शक्य असतें. कायद्याचें एक मूलतत्त्व संपादकाने कधीहि विसरतां कामा नये आणि आणि तें हें, की न्यायालयांत प्रत्यक्षपणें आरोप सिद्ध होईपर्यंत प्रत्येक आरोपी हा निर्दोषीच समजला पाहिजे. खुद्द न्यायालयांत आरोपीने गुन्हा केला आहे हें स्पष्ट दिसत असतांनाहि जेथे आरोपीला संशयाचा फायदा मिळूं शकतो, तेथे एखाद्या आरोपाखाली नुसती अटक झालेल्या इसमाची बातमी देतांना संपादकाने त्याला गुन्हेगार ठरविणें किती बरें अन्यायाचें होईल ? म्हणून गुन्ह्याची कोणतीहि बातमी देतांना संपादकाने फार काळजीपूर्वक शब्दप्रयोग करणें आवश्यक आहे. खून केल्याबद्दल कोणाला अटक झाली तरी न्यायालयाने निर्णय दिल्यानंतरच तो खुनी होतो, तोंपर्यंत खुनाच्या आरोपाखाली त्याला अटक झालेली असते, हें लक्षांत ठेवणें जरूर आहे.

इंग्रजीमध्ये Alleged असा जो शब्दप्रयोग करण्यांत येतो त्याचें मर्म हेंच आहे. चोरीचा, खुनाचा किंवा इतर कोणत्याहि गुन्ह्याचा त्या इसमावर फक्त आरोप करण्यांत आलेला असतो. आणि बातमी देतांना तो आशय स्पष्ट होईल असे शब्द म्हणजे "खून केल्याबद्दल" नव्हे तर "खून केल्याच्या आरोपाखाली" पकडण्यांत आलें, असें म्हणणें आवश्यक आहे.

त्यानंतर न्यायालयांत चाललेल्या खटल्याबद्दल किंवा त्यांतील आरोपी-बद्दल मत प्रदर्शित करणारीं, न्यायाधिशाचें, ज्यूरीचें किंवा असेसरांचें मन ज्यामुळे कलुषित होईल अशा अर्थाची खटल्याशीं संबंधित अशी माहिती देणारी, किंवा न्यायाधिशाच्या वर्तनाबद्दल टीका करणारी अशीहि बातमी आपण देतां कामा नये. कोर्टाची बेअदबी वा अपमान हा एक अत्यंत गंभीर स्वरूपाचा गुन्हा आहे. या गुन्ह्याबद्दल काय शासन मिळेल याचा नियम नसतो आणि कांही वेळीं संपादक बिनशर्त माफी मागेपर्यंत त्याला अटकेंत ठेवण्याचाहि हुकूम कोर्ट बजावितें.

बातमी देतांना सरकारी वटहुकूम वा इतर कायदेकानू यांचीहि जाणीव संपादकाला ठेवावीच लागते. विशेषतः युद्धकाळांत संरक्षणाच्या हेतूने सरकारने बातम्यांच्या प्रसिद्धीकरणावर असंख्य नियंत्रणें घातलेलीं होतीं. त्यामुळे खात्रीलायकरीत्या एखादी महत्त्वाची बातमी कळली असली तरी एखाद्या वटहुकुमाचें उल्लंघन होतें म्हणून संपादकाला मूग गिळून स्वस्थ बसणें भाग पडत असे. एकदा मला आठवतें, आमच्या रात्रीच्या वार्ता-हराने चिंचपोकळी येथे एका इमारतीवर वीज पडून त्या इमारतीची एक भिंत कोसळल्याची बातमी दिली. त्या भिंतीखालीं कांही माणसेंहि चेंगरून मेलीं होतीं. पहिल्या पानाची मोठ्या मथळ्याची बातमी होती ती. मीं ती टिपून घेतली. त्या विभागाची माहिती व चाळीचें नांव विचारून घेतलें. मेलेल्या माणसांचीहि माहिती मिळविली. पण नंतर त्या वार्ताहराने मला हळूच सांगितलें,

" चाळीचं नांव किंवा विभागाचं नांव मात्र देऊं नका. "

" कां बरं ? " मीं आश्चर्यानें विचारलें.

" वटहुकुमाखाली आपल्याला ती माहिती देतां येत नाही. "

" म्हणजे विजेच्या संचारावरसुद्धा वटहुकुमाचं नियंत्रण आहे वाटतं ! " मीं जरा कडवटपणेंच विचारलें व पुढे म्हणालों, " वीज पडण्याचा युद्धाशीं संबंध काय ? "

" त्याचं असं आहे, " तो वार्ताहर मला समजावून देत म्हणाला, भूमार्गानं वा समुद्रमार्गानं वा आकाशमार्गानं जो हल्ला होईल त्यामुळं एखाद्या भागाचं नुकसान झालं तर त्या नुकसानीची माहिती किंवा त्या विभागाचं नांव व पत्ता प्रसिद्ध करण्यांत येऊं नये असं वटहुकुमांत म्हटलं आहे. "

" पण हा हल्ला आकाशमार्गानं झाला तरी शत्रूकडून नव्हे. " मी ठासून म्हणालों.

वार्ताहरानें लगेच आपलें प्रभावी अस्त्र काढलें. तो मला म्हणाला, " मी पोलीस स्टेशनमधूनच बोलत आहे. साहेब म्हणतात, की चाळीचं नांव किंवा चिंचपोकळी विभागाचं नांव देणं बेकायदा होईल. "

आता बोलणेंच खुंटलं ! कायदा व सुव्यवस्थेचा रखवालदार हा त्या काळीं तरी समाजजीवनाचा खरा नियंता असे. कायद्याचा त्यानें केलेला अर्थ आपल्या मतें अयोग्य असला तरी त्याच्या मनाविरुद्ध वागणें हें विषाची परीक्षा पाहण्यासारखेंच असे. कारण त्याच्या हातीं सत्ता मोठी, आणि त्या सत्तेचा त्यानें उपयोग करावयाचें ठरविलें तर आपला इवलासा जीव संपुष्टांत यावयाचा ! कायद्याचें या सत्तेवर नियंत्रण असलें तरी कायद्याचा कीस काढण्यासाठी आपण जिवंत तर राहिलें पाहिजे. म्हणून जेथे तत्त्वाचा प्रश्न नसेल तेथे संपादकानें बातमीच्या बाबतींत अवास्तव आग्रहीपणा न ठेवणेंच इष्ट.

अलिकडील काळांतसुद्धा सरकारी कायद्यांपेक्षा वेळोवेळीं निघणाऱ्या पोलिसी हुकुमांचीच किंवा सरकारी नियंत्रणांचीच वर्तमानपत्रांना अधिक कदर करावी लागते. जातीय दंग्यांचा उल्लेख न करणें किंवा या दंग्याचा विभाग कोणता हें स्पष्टपणें सूचित न करणें हें या नियंत्रणापैकीच एक होय. ह्मणून जातीय दंगा पेटला आहे हें माहीत असतांना आणि किती हिंदु वा मुसलमान मारले गेले याचे आकडे आपल्या हातीं असतांनासुद्धा वाचकांना बातमी पुरविण्याची आपली उत्सुकता संपादकाला दाबून ठेवावी लागते. रात्रीच्या वार्ताहराने या बाबतींत माहिती पुरविली तरी संपादक मोघमपणें एवढेंच म्हणतो, की शहराच्या उत्तर भागांत दंगल झाली व तींत अमुक अमुक माणसें ठार व अमुक जखमी झालीं. एक काळ असा होता, की दैनिक वृत्तपत्रांत दंगलीचीं रसभरित वर्णनें केलीं जात असत. एवढेंच नव्हे, तर क्रिकेटच्या स्कोअरप्रमाणे हिंदु व मुसलमान यांच्या मृत्यूचे आकडेहि ठळकपणें दिले जात असत. साहजिकच ज्या जमातीचे लोक अधिक प्रमाणांत बळी पडलेले असतील ती जमात दुसऱ्या दिवशीं आणखी कांही निरपराधी लोकांच्या रक्ताचा सडा शिंपून दुसऱ्या जमातीचा सूड घेत असे. या आकड्यांमुळें व वर्तमानपत्रांतील दंगलीच्या वर्णनांमुळे उभय जमातींतील गुंडांना आणि त्यांच्या पाठीराख्या धर्ममार्तंडांना दंगल, खून, जाळपोळ व असलींच हीन व समाजघातक कृत्यें करावयाला चालना मिळत असे यांत संशय नाही. कांही वर्तमानपत्रांचाहि या दंगलीमुळे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष फायदा होत असे. कारण त्या काळांत वर्तमानपत्रांचा खप तर वाढत असेच; पण समाजहिताचा अणुमात्रहि विचार न करतां जीं वृत्तपत्रें दंगलीचें भडक चित्र रंगवीत असत त्यांना इतर प्रतिस्पर्धी वर्तमानपत्रांवर मातहि करतां येत असे. वर्तमानपत्राच्या प्रसाराचीहि अशी गंमत आहे, की एकदा कोणत्याहि कारणाने वृत्तपत्राला चालना मिळाली म्हणजे वाचकांमध्ये तेंच वाचण्याची प्रथा पडते व वाचकवर्ग इतका एकनिष्ठ म्हणा

किंवा सुस्त म्हणा असा असतो, की सहसा तो वृत्तपत्र बदलावयाला तयार होत नाही. त्या दृष्टीने जातीय दंगली, राजकीय चळवळी, युद्ध आणि इतर रोमांचकारी घटना या हस्ताच्या पावसाप्रमाणे वर्तमानपत्रांना कस देणाऱ्या होतात. आणि म्हणूनच हस्ताच्या पावसाने जसें शेतकऱ्याला आनंदाचें भरतें येतें तसें जरी या घटनांमुळे संपादकाला भरतें आलें नाही तरी त्या त्याला सुसंधीप्रमाणे वाटतात हें खास.

तथापि या बातम्या रंगवितांना संपादकाने अविचारीपणाने जसें कायद्याच्या कक्षेंत जाऊं नये तसेंच सदसद्विवेकबुद्धि गुंडाळून ठेवूनहि त्याने कोठलीहि बातमी छापूं नये. बलात्कार वा स्त्रियांवर अत्याचार करणारा गुंड हा हिंदु, मुसलमान, ब्राह्मण, ब्राह्मणेतर नसतो. तो गुंड असतो. म्हणून ही बातमी छापतांना धर्मांचा वा जातीचा उल्लेख करणें हें खरोखर अनुचित होय. पण पुष्कळ वेळां आपण हा विवेक ठेवीत नाही व त्यामुळे जाती-जातींमध्ये वा भिन्न धर्मीय लोकांमध्ये अप्रीति निर्माण करण्याला मात्र आपण कारणीभूत होतों. लोकशिक्षणाचें कंकण हातीं बांधलेले आपण लोक नीति, सहिष्णुता, बंधुभाव यांचे संदेश क्षणोक्षणीं आपण समाजाला देत असतों. पण बातम्या देतांना आपणच वाहवत जाऊन सहिष्णुतेला फाटा दिला तर या तत्त्वांचा पुरस्कार करण्यांत तरी काय अर्थ ? एक उदाहरण मला आठवतें. बऱ्याच वर्षांपूर्वी पुण्यांतील अप्पा बळवंत चौकांत एका ब्राह्मण तरुणीवर एका ब्राह्मणेतराने हात टाकला. ही घटना खळबळ उडविणारी तर खरी आणि तिचा निषेध तर प्रत्येक सुसंस्कृत व्यक्तीने केलाच पाहिजे. पण ती बातमी छापतांना ब्राह्मण तरुणी आणि ब्राह्मणेतर अत्याचारी असा प्रामुख्याने, भडकपणें उल्लेख करावयाचें कांहीतरी कारण होतें काय ? पण पुण्यांतील कांही वर्तमानपत्रांनी तसा उल्लेख तर केलाच, पण अग्रलेखांतून जी आग पाखडावयाची, हाकाटी करावयाची, निष्कर्ष काढावयाचा, इशारा द्यावयाचा तो खुद्द बातमीमध्ये कोंबून विशिष्ट जातीविरुद्ध लोकमत प्रक्षुब्ध

करण्याचा प्रयत्न केला. कायद्याच्या दृष्टीने यांत कांही आक्षेपार्ह नसेल; पण वृत्तपत्रांनी जी विवेकबुद्धि ठेवावयाला पाहिजे तिच्याशीं हें वर्तन विसंगत होतें हें खास.

खळबळ उडविणाऱ्या बातम्या देतांना निर्विकारपणें व सहिष्णुतेने आणि समाजाच्या बाबतींत आपली जी जबाबदारी असते ती ओळखून संपादकाने त्या रंगविणें हें खरोखरच अत्यंत आवश्यक आहे. महात्मा गांधींचा मारेकरी ही गोडसे नांवाची एक व्यक्ति होती. ती ब्राह्मण निघाली हा ब्राह्मण समाजाच्या दृष्टीने एक दुर्दैवी योगायोग होय. मग ती बातमी छापतांना गोडसे हा ब्राह्मण होता यावर भर देण्यांत काय बरें अर्थ ?

गांधीवधानंतरच्या काळांत महाराष्ट्रांत जे प्रकार घडले त्यांच्या बातम्या देतांनाहि हाच विवेक ठेवणें आवश्यक होतें. त्या वेळीं जे प्रकार घडले ते अत्यंत गर्हणीय होत. पण गोडसेच्या खुनशी व क्रूर कर्माबद्दल ब्राह्मण जातीला बदनाम करणें हें जितकें असहिष्णुतेचें द्योतक होतें तितकेंच महाराष्ट्रांतील जाळपोळीबद्दल सबंध मराठा समाजावर शिंतोडे उडविणें हेंहि होतें.

शिवाय बातम्या प्रसिद्ध करतांना लोकांना चिथावणी देण्याची तर संपादकाची वृत्ति मुळीच असतां कामा नये. जातीय व धार्मिक विद्वेष आज कांही लोकांच्या इतका रोमरोमीं भरलेला आहे, की आपल्याच समाजावर दुसऱ्या समाजाने पाशवी अत्याचार केले तर लोकांचें रक्त उसळावें म्हणून त्या अत्याचारांचीं विकृत वर्णनेंहि ते छापावयाला मागेपुढे पाहात नाहीत. कांही वेळीं विशिष्ट संपादकांना या वर्णनांत विकृत आनंदाचाच आस्वाद मिळतो की काय असेंहि वाटण्याइतकी तीं बीभत्स असतात. मोपल्यांच्या बंडाच्या वेळीं जे अत्याचार झाले त्यांच्या कहाण्या रसभरित वर्णन करून सांगणारे धर्मवीर आपल्यामध्ये थोडेथोडके होऊन गेलेले नाहीत. आपल्या भगिनींची तेथे किंवा इतरत्र जी विटंबना झाली त्यांचें बीभत्स चित्र रंग-

विण्यांत या महाभागांनी कोणती धर्मसेवा केली असेल कोण जाणे ! आजसुद्धा कांही वर्तमानपत्रें पूर्व बंगालमधील भगिनी इला सेन यांच्यावर झालेल्या बलात्काराची नुसती बातमी देत नाहीत तर हा पाशवी अत्याचार वर्णनाच्या रूपाने आपल्या वाचकांसमोर प्रत्यक्ष उभा करण्यासाठी आपल्या लेखन-शैलीचें सारें कसब उपयोगांत आणीत आहेत. भगिनी इला सेन यांना हा वृत्तांत जर वाचावयाला मिळाला तर प्रत्यक्ष विटंबनेइतकेंच मरणप्राय दुःख त्यांना झाल्याशिवाय राहणार नाही. खरोखर दुःखाला वाचा फोडणें हीच ज़र या बातमीची प्रेरकशक्ति असेल तर बलात्कार म्हणजे काय हें न समज-ण्याइतका का वाचकवर्ग दुधखुळा आहे ? त्यासाठी बलात्काराचें प्रत्यक्ष वर्णन देण्याची आवश्यकता आहे काय ? यावरून दोन अपरिहार्य निष्कर्ष निघतात. एक, या स्वरूपांत बातमी देऊन हे संपादक लोकांच्या भावना तरी चेतवूं पाहात असावेत, किंवा त्या बातमींत त्यांना स्वतःलाच एक प्रकारचा विकृत आनंद होत असावा. दोन्ही गोष्टी अर्थातच अनिष्ट अतएव त्याज्य होत.

बातम्या देतांना सदभिरुचीच्या मर्यादा पाळणें हें कायद्याच्या मर्यादा पाळण्याइतकें किंवा त्याहीपेक्षा अधिक आवश्यक आहे हें जर आपण ध्यानीं घालगलें तर आपल्या सामाजिक जीवनांतील बराचसा कडवटपणा दूर होईल. पक्षोपपक्षांमध्ये जी असहिष्णुता आलेली आहे आणि विपर्यस्त बातम्या दिल्यामुळे जी वाढत चाललेली आहे तीहि नष्ट करण्याचा हाच एक मुख्य मार्ग होय. ठाण्याचे एक राजकीय कार्यकर्ते श्री. मारुतिकुमार यांचा निवडणुकीपूर्वी अमानुष रीतीने खून झाला. दुर्दैवाने समाजवादी पक्षांतील एका इसमाला या खुनाच्या प्रकरणीं अटक झाली. पण समाजवादी पक्षांतील एखाद्या माथेफिरूने हा अत्याचार केला असला तर त्या पक्षावर त्याची जबाबदारी टाकणें म्हणजे गोडसेने गांधीजींचा वध केला म्हणून उभ्या महा-राष्ट्राला जबाबदार धरण्यासारखेंच नाही काय ? ही बातमी छापतांना अर्था-

तच संपादकाने उगीच तर्कवितर्क करून एखाद्या पक्षाला अन्याय न होईल याची खबरदारी घेतली पाहिजे. येथे कायद्याचें कोणतें बंधन असणार ? " असें म्हणतात " या शद्बप्रयोगांत संपादकाला किंवा वार्ताहराला जें अनिर्बंध स्वातंत्र्य लाभलेलें असतें त्याचा उपयोग करून एखाद्या काँग्रेसवादी पत्राने खुशाल समाजवादी पक्षावर शिंतोडे उडविले तर त्या संपादकाची लेखणी कोण धरू शकेल ? पण नीतीचें, सदभिरुचीचें हें बंधन काँग्रेसवादी पत्राने पाळलें नाही तर उद्या समाजवादी पक्षाचें पत्र तितक्याच बेदरकारपणाने जाहीर करील, की आचार्य नरेंद्र देव यांचा पराभव करण्याकरिता काँग्रेसने मतदारांना पांचपांच रुपयांचें एकेक कुपन वांटलें. हे आरोप-प्रत्यारोप करणाऱ्या बातम्या छापून कोणत्याहि पक्षाचा फायदा तर होणार नाहीच; पण वर्तमानपत्राची मात्र पातळी खाली जाईल.

दुसऱ्या एका बाबतींतहि वर्तमानपत्राने काळजी घेतली पाहिजे आणि ती म्हणजे कोणत्याहि इसमाची ज्यामुळे बदनामी होईल अशा तऱ्हेची बातमी न छापणें ही होय. ही जशी कायदेशीर तशीच नैतिक जबाबदारीहि मानली पाहिजे. कारण न्यायालयातर्फे संपादकावर बदनामीचा आरोप सिद्ध करणें म्हणजे स्वतःची आणखी जाहीर बदनामी करून घेण्यासारखेंच असल्यामुळे सहसा कोणी संपादकाला न्यायालयापुढे खेचीत नाही. त्यामुळे संपादकवर्गामध्ये सर्वसाधारणपणें बदनामीकारक वा कोणाच्या इभ्रतीला धोका पोचवील असा मजकूर छापण्याबद्दल एक प्रकारें बेफिकिरीच आलेली असते. खरें सांगावयाचें तर विशिष्ट बातमीच्या खरेपणाबद्दल पूर्ण खात्री पटल्यानंतर आणि हा मजकूर छापणें सार्वजनिक हिताच्या दृष्टीने आवश्यक आहे अशी मनोमन ग्वाही मिळाल्यानंतरच एखाद्या व्यक्तीला आक्षेपार्ह वा बदनामीकारक वाटेल अशी बातमी संपादकाने छापावी. एखादी व्यक्ति आपला प्रतिपक्षी आहे म्हणून सूडबुद्धीने किंवा कांहीतरी खळबळजनक बातमी आपल्याला छापावयाला मिळत आहे म्हणून जर संपादक अशा तऱ्हेची बातमी छापू

लागलें तर वृत्तपत्रीय क्षेत्रांत अत्यंत अनिष्ट अशा परंपरा निर्माण होतील. कारण त्यामुळे कोणाचीहि इभ्रत सुरक्षित राहाणार नाही आणि आपलें सार्वजानिक जीवन डागळल्यासारखें होईल. कांही वेळीं सरकारी धोरणाचा निषेध करण्यासाठी कांही संपादक गुप्त सरकारी पत्रकें छापतात व ऑफिशियल सीक्रेट्स् अॅक्टचा भंग करतात. हा गुन्हा अधिकच गंभीर असून व्यक्तीची बदनामी केल्यानंतर माफी मागून मोकळे होण्याची संपादकाला जी संधि असते तीहि या बाबतींत मिळूं शकत नाही. सरकारी गुप्त पत्रक छापणें हासुद्धा कायदेशीर त्याचप्रमाणे नैतिक दृष्ट्याहि गुन्हा होऊं शकेल. कारण ज्या गुप्तपणावर सरकारचा कारभार आधारलेला असतो तो नाहीसा होणें ही एक अत्यंत अनिष्ट परंपरा होईल. कारण मग जो पक्ष अधिष्ठित सत्तेविरुद्ध या प्रकारची मोहीम चालवील त्याच्या हातीं उद्या सत्ता आली तर त्या सरकारवरहि तीच नामुष्कीची पाळी येईल.

ऑफिशियल सीक्रेट्स् अॅक्टचा एखाद्या संपादकाला सार्वजानिक हिताच्या दृष्टीने भंग करावयाचा असेल तर तो कांही अंशीं तात्त्विक प्रश्न होतो. परंतु तात्त्विक दृष्टीने आपली भूमिका न्याय्य आहे अशी मनोमन खात्री झाल्यानंतर आणि आपण ज्या गुप्त पत्रकाचा स्फोट करीत आहोंत तें खरें आहे, बनावट नव्हे, याची शहानिशा करून घेतल्यानंतरच त्याने हें साहस करावयाला प्रवृत्त व्हावें. अर्थातच त्या साहसाचे जे कांही परिणाम होतील ते भोगावयाची मात्र त्याची तयारी पाहिजे. कदाचित् हें साहस यशस्वी होऊन जनतेच्या आदराला त्याचें वर्तमानपत्र पात्र होईल किंवा सरकारी पोलादी चौकटीवर एकाकी डोकें आपटल्यामुळे त्याच्या वर्तमानपत्राच्या चिंधड्याहि उडतील.

साधारणपणें व्यवहारी संपादक "हतो वा प्राप्स्यसि स्वर्गम् जित्वा वा भोक्ष्यसे महीम्" अशा तऱ्हेने अटीतटीचा सामना देण्याचा मार्ग सहसा स्वीकारणार नाही. घात आणि अपघात यांच्या बातम्या देऊन सर्वसाधारण

वाचकवर्गाला संतुष्ट करण्याचाच तो प्रयत्न करील. कारण वरीलप्रमाणे तात्त्विक लढा देण्यामुळे किंवा खळबळ उडविणाऱ्या बातम्या छापून सत्ताधीशांचा वा लोकप्रिय नेत्यांचा रोष ओढवून घेण्यामुळे आत्मघात मात्र होण्याचा संभव आहे याची त्याला जाणीव असते. सावधपणा हेंच बातमी देण्यांतील धोरण खरोखर श्रेयस्कर आहे. ती खुसखुशीत व चटकदार केली की वाचकांचा कायमचा आश्रयहि वर्तमानपत्राला संपादन करतां येईल.

★ ★ ★

प्रकरण ४ थें

# अवलिया प्राणी – वार्ताहर

★

" आज तुम्ही कुठं जाणार आहांत ?" मीं नेहमीच्या पद्धतीनें एकेका वार्ताहराला प्रश्न विचारला.

" महिला परिषद आहे दुपारीं चार वाजतां. मग कलाकौशल्याचं प्रदर्शन आहे. संध्याकाळीं जयप्रकाश नारायण यांचं व्याख्यान आहे. रात्रीं आठ वाजतां साहित्य संघाची सभा आहे."

" आणि तुमचा काय कार्यक्रम ?" मीं दुसऱ्या वार्ताहराला विचारलें.

" दुपारीं कॉर्पोरेशन आहे. त्यानंतर डांगे यांची प्रेस कॉन्फरन्स आहे संध्याकाळीं सिव्हिल लिबर्टीज युनियनची वार्षिक सभा आहे आणि कामगार मैदानावर रॅली आहे."

" सेक्रेटरियटमधे कोण जाणार आहे ? आणि मोरारजी देसाई यांची आज साप्ताहिक बैठक आहे ना ?" मीं सर्वांनाच उद्देशून प्रश्न केला.

" हो, हो. मी तिकडेच जाणार आहें." एका वार्ताहरानें लगेच उत्तर दिलें, " आणि आज प्राथमिक शिक्षकांचं शिष्टमंडळ मुख्य प्रधानांना भेटणार आहे आणि वारली लोकांचा मोर्चाहि सेक्रेटरियटवर जाणार आहे."

" अहो, आणि आज शकुंतलाबाईंचं संततिनियमनावर व्याख्यान आहे ना ? तिकडे कोण जाणार आहे ?" मीं प्रश्न केला.

" मी जातों. मी जातों. " एका तरुण वार्ताहराने उत्साहाने म्हटलें.

" बच्चा आहेस तूं. संततिनियमनाचा विचार करायला तुला अद्याप वेळ आहे ! " दुसऱ्याने त्याला हटकलें. " तूं आपला कलापथकाच्या कार्यक्रमाला जा पाहूं. "

" तो आज महिला परिषदेला जाणार आहे. उद्या बहुधा सारा अंक काव्यमय वर्णनांनी भरून निघणार ! " मी हसतहसत म्हणालों.

" तुम्ही जागा कुठं देणार आहांत तेवढी ? एकदा तरी आमचा मजकूर जाऊं द्या मनासारखा. " तो तक्रारीच्या सुरांत म्हणाला.

" म्हणजे तुला इंप्रेशन मारतां येईल, नाही का ?" परवा कोणत्या रे मुलीची मुलाखत घेऊन आला होतास ? " एकाने सरळ हल्ला चढविला.

" होय का रे ? ती आपली......"

पण तेवढ्यांत संपादकांचीं पावलें वाजल्यामुळे हें रंग भरत चाललेलें संभाषण तेथेच आटोपलें.

वर्तमानपत्रांची कचेरी ही रुक्ष, गंभीर प्रकृतीच्या लोकांनी भरलेली असेल अशी सर्वसाधारण लोकांची अटकळ असते. बऱ्याच अंशीं ती खरीहि असते. पण सहारा वाळवंटांत ज्याप्रमाणे मधूनच एखादी हिरवळ दिसून येते आणि ती पाहून शिणलेल्या मनाला आल्हाद वाटतो तसेच वर्तमानपत्रांत असे कांही क्षण येतात की जेव्हा काव्यशास्त्रविनोदाने तेथील वातावरण भरून जातें आणि बातम्यांनी झोडपून काढलेल्या मनाला क्षण-काल अत्यंत आवश्यक असलेला असा विरंगुळा मिळतो.

दैनिक वृत्तपत्रांतील नेहमीचे वार्ताहर हे अवलिया प्राणी होत. सुप्र-सिद्ध संत गाडगे महाराज हे केव्हा कोठे कसे प्रकट होतील याचा नियम नसतो असें सांगतात. तें खरें खोटें कोण जाणे; पण दैनिकाचे वार्ताहर मात्र ऐन मोक्याच्या वेळीं दत्त म्हणून हजर असतातच. वर आपण जे कार्य-क्रम पाहिले ते त्यांच्या दिनक्रमांतील ठळक व महत्त्वाचे कार्यक्रम होत.

त्याशिवाय अनेक सभा-संमेलनें, नाटकांचे व चित्रपटांचे प्रयोग, चहापार्ट्या, निरनिराळ्या वाङ्मय मंडळांचीं संमेलनें, अनेक संस्थांनी घडवून आणलेलीं भाषणें, वादविवाद, अभिरूप लोकसभा, कवितागायनें, नृत्य, संगीत-प्रयोग आणि सहस्रावधि इतर कार्यक्रमांना त्यांना हजर राहावें लागतें. शिवाय, कॉर्पोरेशन, कायदेमंडळें, विश्वविद्यालयाचें सीनेट वा सिंडिकेट यांच्या नेहमी वा प्रासंगिक चालू असलेल्या सभा तर आहेतच. त्यांतच खेळ आणि खेळांचे सामने, परिक्षांचा निकाल, रेस वगैरे गोष्टींचीहि भर पडते. आणि हे सर्व कार्यक्रम निरनिराळ्या ठिकाणीं होत असतात. दोन कार्यक्रमांच्या ठिकाणांत अंतरहि भरपूर असतें व मध्यंतरीं वेळहि थोडा असतो. बरें, वार्ताहरांना सोनापुरापासून गव्हर्नराच्या बंगल्यावर कोठेहि जावें लागतें. आणि "क्वचिद्वीणावाद्यं क्वचिदपिच हाहेति रुदितम्" या परिस्थितीचा अनुभव तर ते हरघडीं घेत असतात. मग वेळाचा प्रश्न ते कसा सोडवितात, दोन कार्यक्रमांतील अंतर कसें तोडतात, निरनिराळे बरे-वाईट प्रसंग कसे साजरे करतात?

वार्ताहरांना काल, परिस्थिति व अंतर यांवर मात करतां येते त्याचें मुख्य कारण म्हणजे वर्तमानपत्र ही जी एक प्रबल शक्ति आधुनिक जगांत तयार झालेली आहे त्या शक्तीचे ते प्रतीक असतात हेंच होय. निरनिराळ्या वर्तमानपत्रांच्या लहानमोठेपणावर निरनिराळ्या वार्ताहरांना कमीजास्त मान मिळत असतो हें खरें आहे. पण एकंदरीनें वृत्तपत्रव्यवसायाची इभ्रत व शक्ति साऱ्याच वार्ताहरांमागे उभी असते यांत संशय नाही. ही इभ्रत लोकांच्या प्रेमावर वा भक्तीवर उभी राहिलेली असेल असें नव्हे. पुष्कळ वेळां वर्तमानपत्राचा जो दबदबा असतो त्यामुळेच वार्ताहरांना कोणत्याच प्रकारची आडकाठी होत नाही आणि खुशाल आपलें वर्चस्व ते लोकांवर लादूं शकतात. या भीतीच्या भावनेंतूनच वार्ताहरांना बातमीहि मिळूं शकते आणि ही बातमी मिळविण्यासाठी आवश्यक असलेलीं साधनेंहि त्यांना उप-

लब्ध होऊं शकतात. सर्वसाधारण लोक वृत्तपत्रकारांना शब्दसृष्टीचे प्रतिईश्वर मानीत असल्याकारणाने ते वार्ताहरांकडे एक प्रकारें भक्तिभावनेनेच पाहतात. त्यामुळे सभा, संमेलनें वा इतर समारंभांची बातमी या लोकांकडून वार्ताहरांना फारसे प्रयास न घेतां व वेळीं बसल्या जागींहि मिळूं शकते. थोर लोकांना वर्तमानपत्रांची कांहीशी भीतीहि वाटत असते आणि प्रसिद्धीच्या दृष्टीने त्यांची गरजहि भासते. तेव्हा लोकांमध्ये दरारा असलेले मंत्री असोत की लोकप्रियतेच्या लाटेवर आरूढ झालेले लोकनेते असोत, वार्ताहरांना त्यांचीं दालनें नेहमीच खुलीं असतात. धनिक वर्ग प्रत्येक गोष्टीकडे धंदेवाईक दृष्टीनेच पाहात असतो आणि वार्ताहरांना खूष करून वृत्तपत्रांचे स्तंभ जर आपल्या स्तुतीसाठी त्यांना मिळवितां आले तर त्यासाठी कधीमधी पेट्रोलचा खर्च करावयाला ते कां मागेपुढे पाहतील? म्हणून वार्ताहर जर हिकमती आणि धडाडीचा असेल तर बातम्यांची तर शिकार त्याला साधतां येईलच; पण या शिकारीसाठी आवश्यक असलेलीं साधनेंहि त्याला आपल्या पायाशीं उभीं करतां येतील.

पण त्यासाठी वार्ताहराच्या अंगीं सर्वांचीं मनें मिळविण्याचें कसबहि पाहिजे आणि मिळेल त्या संधीचा उपयोग करून घेण्यासाठी त्याने नेहमी सज्जहि असलें पाहिजे. विवाहयोग्य वराने ज्याप्रमाणे कधीहि गबाळेपणाने राहूं नये त्याप्रमाणे वार्ताहराने पोषाखांत तर गबाळ असूं नयेच; पण वृत्तींतहि कधीच शिथिलपणा ठेवूं नये. कारण वधू प्राप्त होण्याची वराला केव्हा कशी संधि येईल याचा जसा नियम नसतो त्याचप्रमाणे बातमी केव्हा कशी चालून येईल याचाहि नियम नसतो. कदाचित् कोण जाणे सकाळीं सहज तुम्ही फिरत असतांना सरदार पटेल समोरून येतांना दिसतील. कितीहि थोर व्यक्ति असली तरी धडाकून तिच्याशीं बोलण्याचा वार्ताहराला एकमेव अधिकार असतो. पण आपण दाढी केलेली नाही, आपले कपडे मळके आहेत, ही तुमच्यामध्येच जर जाणीव असेल तर तुम्ही

त्या थोर व्यक्तीला स्वतःच भेटावयाचें टाळाल. पण तें न्यून तुमच्यामध्ये नसेल तर सरदारांच्यामध्ये आणि तुमच्यामध्ये कोणता अडथळा आहे ? फार-फार तर सरदार बोलणार नाहीत. त्यांत काय बिघडलें ? वार्ताहराला मानापमानाच्या कल्पना आणि निराशा हीं गुंडाळूनच ठेवावीं लागतात. पण समजा, सरदार बोलले– तर त्रिभुवन जिंकल्याचा तुम्हांला आनंद होईल.

शिवाय वार्ताहरामध्ये सुताने स्वर्ग गाठण्याची कर्तबगारी असते. तेव्हा एखादा शब्द जरी थोर व्यक्तीने उच्चारला तरी त्यावर वार्ताहराला केवढेतरी बातम्यांचे इमले उठवितां येतात. आपण घेतलेली मुलाखत म्हणजे मुलाखत घेण्यांत आलेल्या व्यक्तीच्या तोंडांतून बाहेर पडणारे शब्द नव्हेत. ते शब्द महत्त्वाचे खरे; पण वार्ताहराला त्यांतून त्याहीपेक्षा मोठा आशय काढतां येईल. या मुलाखतीचें जें शब्दचित्र तो रंगवील आणि त्यांतून त्या थोर व्यक्तीचें जें दर्शन तो समाजाला घडवून आणील तें त्या शब्दांपेक्षा कितीतरी पटींनी श्रेष्ठ असा संदेश जगाला देऊं शकेल.

वार्ताहराने जसें प्रसंगावधानी तसेंच कल्पकहि असलें पाहिजे. गांधीजी बोलले नाहीत; पण त्यांच्या सभोवतालचें वातावरण, सहकाऱ्यांशीं बोलतांबोलतां फुटून निघालेलें त्यांचें निर्दोष हास्य, सरोजिनी नायडू यांच्याशीं हास्यविनोद करतांकरतां त्यांनी त्यांच्या पाठीवर मारलेली थाप आणि सरोजिनीदेवींनी व्यक्त केलेला कृतक कोप हीं दृश्यें तर तुम्हीं डोळे भरून पाहिलींत ना ? तीच तर खरी बातमी. सारा वाचकवर्ग ज्या बातमीसाठी आपला जीव ओवाळून टाकील अशी बातमी. गांधीजी तर नेहमीच बोलत आहेत, त्यांचा संदेश साऱ्या देशांत घुमत आहे. पण त्यांच्या व्यक्तिजीवनांतील हीं किंवा अशींच हृदयस्पर्शी दृश्यें आपल्या वाचकांना कधी पाहावयाला मिळणार ? तुम्ही त्यांचें जें शब्दचित्र रेखाटाल तेंच ते आपल्या हृदयसंपुटांत साठवून ठेवतील. मग गांधीजींनी मुलाखत दिली नाही म्हणून तुम्ही इतके निराश कां होतां ?

दा. क. ७७६५

युद्धकाळांत चर्चिल यांची मुलाखत घेणें कोणत्याहि वार्ताहराला मुष्किलच असणार. आपल्यापरीने वार्ताहरांनी प्रयत्न मात्र चालविलाच पाहिजे. पण ती मिळाली नाही, चर्चिल यांच्या तोंडून एकहि शब्द बाहेर पडला नाही म्हणून वार्ताहरांनी निराश व्हावयाचें मात्र कारण नाही. ते बोलले नसतील; पण त्यांनी हाताच्या बोटांनी "व्ही" ही विजयदर्शक खूण केली असेल आणि ती करतांच तेथे जमलेल्या हजारो नागरिकांनी आणि सैनिकांनी उन्मादाने जयघोष केला असेल. त्या उन्मादाचें वर्णन जर वार्ताहरांनी आपल्या प्रभावी लेखणीने केलें तर दूरदूरच्या देशांतील असंख्य लोकांच्या हृदयांत त्या उन्मादाचे पडसाद उठणार नाहीत काय? चर्चिल यांच्या शाब्दिक बोलपेक्षा हा संदेश हृदयाचा खात्रीने अधिक ठाव घेईल.

खरें सांगावयाचें तर खरा वार्ताहर साध्याहि विषयांतून मोठा आशय काढील; नव्हे; शून्यांतूनसुद्धा सृष्टि निर्माण करील. त्याच्या दृष्टीने कांहीहि घडलें तरी ती बातमीच. फक्त त्याने कान आणि डोळे उघडे ठेवले पाहिजेत, आपल्या कल्पक बुद्धींतून कांही नावीन्य शोधलें पाहिजे आणि मग आपल्या प्रतिभेला मुक्त वाव देऊन ती बातमी लिहिली पाहिजे. रात्रीच्या वार्ताहराप्रमाणे या वार्ताहराला नुसती बातमी सांगावयाची नसते; ती लिहावयाची असते. म्हणून बातमी मिळविण्याच्या गुणाबरोबरच त्याच्यामध्ये वाङ्मयीन गुणहि आवश्यक असतात. आपल्याकडे अद्याप वार्ताहर हा उपसंपादकच असतो. म्हणजे तो जें लिहितो तोच मजकूर बहुशः छपाईसाठी जात असतो. 'न्यूज एडिटर' म्हणा किंवा इतर कोणताहि संपादक म्हणा त्याचें लिखाण वाचून पाहतो, त्यांत सुधारणाहि करतो. पण मुळांत हा मजकूर वार्ताहराचाच असतो. मजकूर देण्याची पद्धति, भाषाशैली यांच्या बाबतींत जें बरेंवाईट श्रेय कोणाचें असेल तर तें वार्ताहराचेंच असतें, म्हणून वार्ताहरामध्ये इतर उपसंपादकांपेक्षाहि अधिक

भाषाप्रभुत्व पाहिजे, नव्हे भाषाशैलीहि आवश्यक आहे. इतर उपसंपादक बातम्यांचीं भाषांतरें करीत असतात. तेथे बातमीला महत्त्व असतें; बातमी कशी लिहिली आहे याला नसतें. पण वार्ताहर हा स्वतंत्रपणें लेखन करीत असतो. तो बातमी कोणत्या रीतीने देतो, घडत असलेल्या प्रसंगांचें तो वर्णन कसें करतो आणि या वर्णनाच्या साहाय्याने वाचकांसमोर तो प्रत्यक्ष चित्र कसें उभें करतो याला महत्त्व असतें. एका दृष्टीने वार्ताहराचें लिखाण हें प्रासंगिक स्वरूपाचें वाङ्मयच होय. आणि कांही वेळीं तो वर्णन करीत असलेल्या घटनाच इतक्या महत्त्वाच्या असतात, की त्या घटनांचें त्याने केलेलें वर्णन हें चिरकालीन स्वरूपाचें वाङ्मयहि होऊं शकेल.

उदाहरणार्थ, गांधीजींच्या अंतिम महायात्रेचें वर्णन हें लोकांच्या दृष्टीने तात्पुरतें महत्त्वाचें नाही तर त्याला चिरकालीन महत्त्व आहे. लेनिनच्या प्रेतयात्रेचें वर्णन वाचतांना आजहि कित्येकांचे डोळे ओलावतात. तेव्हा अशा प्रसंगीं वार्ताहर जें लिहीत असतो त्याला वाङ्मयांतहि अढळ स्थान मिळूं शकतें. म्हणूनच वार्ताहराने आपल्या लेखनशैलीचें सारें कसब या वेळीं प्रकट करणें आवश्यक आहे.

इतर प्रसंगींहि वार्ताहराने आपलें वैशिष्ट्य प्रकट केलेंच पाहिजे. मग ती पंडित जवाहरलाल नेहरू यांची विराट् सभा असो, साहित्य संमेलनाचा तो सोहळा असो, किंवा एखादी महिला परिषद असो. नभोवाणीवरून क्रिकेटच्या सामन्यांचें वर्णन करणारा निवेदक जसा श्रोत्यांना अदृश्य असलेला सामना त्यांच्यासमोर प्रत्यक्षपणें उभा करतो तसाच वार्ताहरहि दूर कोठेतरी घडणाऱ्या घटनांचें प्रत्यक्ष शब्दचित्र वाचकांपुढे काढतो. मग त्या वार्ताहराजवळ आपल्या भावना व्यक्त करणारें भाषासौष्ठव नसेल, वाचकांच्या मनाला आल्हाद देणारी शैली नसेल तर त्याचें लिखाण वाचकांच्या मनाचा ठाव कसा घेईल ? अर्थात् नुसतें भाषाप्रभुत्व व शैली असून भागणार नाही हें खरें. पण वार्ताहराच्या यशांतील पहिला वांटा त्याच्यामधील वाङ्मयीन गुणांनाच द्यावा लागेल हें मात्र विसरून चालणार नाही.

त्यानंतर दुसरी गोष्ट म्हणजे ज्या ठिकाणीं हा वार्ताहर जात असेल त्या ठिकाणीं घडून येणाऱ्या गोष्टींबद्दल वार्ताहराला योग्य व पुरेशी माहिती असणें आवश्यक आहे. तुम्ही म्हणाल, म्हणजे वार्ताहराला सर्वज्ञ झालें पाहिजे. एका अर्थीं तें खरें आहे. पण ही सर्वज्ञता म्हणजे कोणत्याहि विषयाचें सखोल ज्ञान नव्हे. ज्याला इंग्रजींत " जॅक ऑफ ऑल ट्रेड्स्, मास्टर ऑफ नन् " म्हणतात तें वार्ताहराचें यथार्थ वर्णन होय. अलीकडे बऱ्याचशा राजकीय स्वरूपाच्या घडामोडींशींच वार्ताहराचा संबंध येतो. तेव्हा राजकारणांतील पक्षोपपक्ष, निरनिराळे विचारप्रवाह यांचें उडतें ज्ञान तरी वार्ताहराला हवेंच. नाहीतर पंडित नेहरू किंवा अशोक मेहता यांनी कोणाला शालजोडींतील दिले आहेत हें त्याला क्षणार्धांत कसें कळेल ? आणि मग त्यांच्या भाषणांतील वा मुलाखतींतील खरी मख्खी ते कशी वर्णन करूं शकतील ? पण कित्येक वेळा वार्ताहराला एखाद्या वाङ्मयीन सभेला, एखाद्या सांस्कृतिक कार्यक्रमाला, एखाद्या शास्त्रीय व्याख्यानाला जावें लागतें. कोठेहि गेलें तरी आपण अगदींच अनभिज्ञ आहोंत असें त्याला वाटतां कामा नये. वाचकवर्गाची पातळी व पात्रता लक्षांत घेऊनच एकंदरीने त्याला मजकूर लिहावयाचा असतो. त्यामुळे चारदोन मुद्दयांचा आपल्या मजकुरांत त्याला परामर्श घेतां आला तरी पुष्कळ झालें. त्यासाठी सर्वसाधारण माहिती काढून घेण्याचा मात्र त्याने प्रयत्न केला पाहिजे; आणि तेवढी माहिती असली तर कोणताहि कठीण प्रसंग त्याला साजरा करावयाला अडचण पडणार नाही. खरें सांगावयाचें तर थोडेंसें ज्ञान आणि बराचसा आत्मविश्वास हीच वार्ताहराची खरी शिदोरी होय. एकंदरीने पत्रव्यवसायाचें स्वरूपच आपल्याकडे तशा प्रकारचें आहे. अर्थशास्त्रविषयक कांहीहि माहिती नसलेला उपसंपादक जर अंदाजपत्रकाचा समाचार घेऊं शकतो तर वार्ताहराला एखाद्या तत्त्वज्ञांच्या परिषदेची माहिती द्यावयाला काय हरकत आहे ? तेव्हा कोणत्याहि ठिकाणीं जातांना वार्ताहराने कचरून जाण्याचें कारण नाही.

अनुक्रम
विभाग
क्रमांक

फक्त त्याची दृष्टि शिकण्याची पाहिजे. मग वृत्तपत्रांत काम करीत असतांना त्याला ज्या संधि व अनुभव मिळत जातील त्यांच्या योगानें हळूहळू त्याची प्रगति होईल. शिक्षणाची दृष्टि त्याने ठेवली तर इतर वार्ताहर बातम्या कशा देतात, मुलाखती कशा घेतात, समारंभांचीं वर्णनें कशीं करतात, भाषणांचे अहवाल कसे देतात वगैरे गोष्टी पाहून त्याला स्वतःलाहि नवनव्या कल्पना सुचतील. उदाहरणार्थ, मागे मुंबईत एक प्रचंड वादळ झालें. अर्थात् सर्वच वार्ताहरांनी त्या वादळाचें वर्णन केलें, त्याने घडवून आणलेल्या अनर्थाचें त्यांनी चित्रहि काढलें. पण एखादा कल्पक वार्ताहर त्याच वेळीं वेधशाळेशीं संधान बांधतो आणि दुसऱ्या दिवशीं, वादळ होण्याचीं कारणें, त्याचा उगम कोठे झाला, त्याची दिशा कोणती होती, तें पुढे कोठे गेलें, त्याचा वेग किती होता वगैरे वगैरे कांहीशी शास्त्रीय स्वरूपाची पण अत्यंत मनोरंजक अशी माहिती आपल्या वर्तमानपत्रांत देतो. साहजिकच इतर कोणाहीपेक्षा त्याचें वार्तापत्र अधिक उठावदार होतें. कारण वाचकांना त्यांत नावीन्य आढळतें.

वार्ताहराला ही कल्पकता इतर कोणत्याहि वेळीं दाखवितां येईल. कित्येक वर्षांपूर्वी पुण्यांतील फर्ग्युसन कॉलेजमध्ये त्या वेळचे गृहमंत्रि मि. हॉटसन हे गेले असतां एका विद्यार्थ्यानें त्यांच्यावर गोळ्या झाडल्या. आता या घटनेचें वर्णन निरनिराळ्या वार्ताहरांनी निरनिराळ्या तऱ्हेने केलें. पण एका वार्ताहराने त्या वेळीं वाचनालयांत वाचत बसलेल्या एका विद्यार्थिनीची मुलाखत घेतली व तिच्या भावना, तिच्या प्रतिक्रिया, तिने प्रत्यक्ष पाहिलेला प्रसंग यांचें वर्णन करून त्याने ती बातमी सजविली. मला आठवतें, दुसऱ्या दिवशीं त्या वार्ताहराचें वर्तमानपत्र कोणाहीपेक्षा अधिक उठून दिसलें.

अर्थात् नेहमीच्या रामरगाड्यांत वार्ताहराला ही कल्पकता दाखवावयाला आणि नावीन्य आणावयाला वेळहि नसतो. पण असे कांही प्रसंग त्याच्या अंगचें कसब प्रकट करण्याची त्याला संधि देतात आणि त्या

संधीचा त्यानेहि पुरेपूर उपयोग करून घेतला पाहिजे. बाकीच्या वेळीं आपलें लिखाण सोपें, सुटसुटीत आणि परिस्थितीचें वास्तव व खरें दिग्दर्शन व वर्णन करणारें असें आहे एवढें त्याने पाहिलें म्हणजे झालें. वार्ताहरालासुद्धा विशिष्ट मतें असतात, त्याचे स्वतःचे कांही पूर्वग्रह असतात, त्याच्या आवडी-निवडी असतात. त्याच्या लिखाणांत त्यांच्या छटा न पडल्या तरच नवल. पण त्यामुळे त्याच्या बातमीला वैगुण्य प्राप्त होतें, वाचकांना यथार्थ दर्शन घडविण्याच्या कामीं तो अपुरा पडतो. अर्थातच खऱ्या वार्ताहराने पक्षनिरपेक्ष अशी दृष्टि तर ठेवली पाहिजेच; पण कोणावरहि कसल्याहि बाबतींत अन्याय होणार नाही याचीहि त्याने काळजी घेतली पाहिजे. त्याचे आवडते लेखक खांडेकर असतील तर त्यांच्या भाषणाचा वृत्तान्त जरा विस्तृत व जरा सरसहि त्याने लिहावा, नव्हे तसें होणें साहजिकहि आहे. पण म्हणून खांडेकरांच्या टीकाकारांच्या भाषणांचे वृत्तान्त देतांना त्याने विपर्यास मात्र करतां कामा नये. कॉर्पोरेशनमध्ये किंवा कायदेमंडळामध्ये तो गेला तर समाजवादी पक्षाकडे त्याचा कल असल्यामुळे अशोक मेहता किंवा पुरुषोत्तम त्रिकम-दास यांचीं भाषणें तो जरा विशेष खुलवून देणें शक्य आहे; पण स. का. पाटील यांच्या भाषणाला त्याने अगदीच कात्री लावून मात्र चालणार नाही.

खराखुरा व वास्तव असा वृत्तान्त देण्याचा एकदा त्याने पायंडा पाडला म्हणजे त्याचें काम पुष्कळच सोपें होतें. मग नुसता तपशील बाकी राहतो. हा तपशील म्हणजे त्याने आपला दैनंदिन कार्यक्रम कसा आखावा, कॉप्या कशा तयार कराव्या, कचेरीशीं संबंध कसा ठेवावा, इतरांशीं संबंध कसे जोडावे, हा होय. वार्ताहराने शक्य तोंवर आपलें असें कार्यक्षेत्र निवडलें पाहिजे. उदाहरणार्थ, कांही वार्ताहरांना सभा-संमेलनांचे वृत्तान्त देणेंच अधिक जमतें. कांहींना कॉर्पोरेशन, कायदे मंडळें, विश्वविद्यालयाचें सीनेट वगैरे गोष्टींबद्दल अधिक आस्था असते. कांही वार्ताहर सेक्रेटरिएट व इतर सरकारी कचेऱ्या यांतील बातम्या हुडकून काढण्यांत दर्दी असतात.

कांही भाषणांचे वृत्तान्त उत्कृष्टपणें देऊं शकतात. कांहींना राजकारणांत गोडी असल्यामुळे पुढाऱ्यांचीं भाषणें, पत्रकारांना त्यांनी दिलल्या मुलाखती आणि इतर आनुषंगिक कार्यक्रम यांच्यामध्ये गर्क राहणें आवडतें. कांही कामगार चळवळीचे अभ्यासु असतात. अर्थात् वर्तमानपत्रांमध्ये त्यांना आपल्या आवडीचें काम करावयाला संधि मिळेलच असें नाही. ती गोष्ट कांही अंशीं संपादकावर व पुष्कळ अंशीं वृत्तपत्राच्या आर्थिक परिस्थितीवर अवलंबून असते. पण शक्य तोंवर संपादकाने आपल्या वार्ताहराच्या आवडीनिवडी लक्षांत घेऊन त्याला योग्य तें कार्यक्षेत्र देणें बरें.

हें एकदा कार्यक्षेत्र निवडलें म्हणजे वार्ताहर त्याप्रमाणे आपलें जाळें पसरूं लागतो. खास बातम्या मिळविण्यासाठी मोक्याच्या जागीं असलेल्या लोकांच्या ओळखी आवश्यक असतात. या ओळखी करून घ्याव्या लागतात आणि मग त्याच्याशीं संघटन वाढवावें लागतें. वार्ताहर एखादी बातमी आणतो; पण त्यासाठी कित्येक दिवस नव्हे महिनेसुद्धा त्याने खटपट केलेली असते. वार्ताहराचें काम नेहमीच चालू असतें; तें कधीच संपत नाही. कारण फावल्या वेळांत तो चकाट्या पिटीत बसलेला असेल त्या वेळींसुद्धा पुढे निर्माण होणाऱ्या बातमीसाठी तो पेरून ठेवीतच असतो. बरें, वार्ताहराला थोरामोठ्यांशींच संबंध प्रस्थापित करावे लागतात असें नव्हे. कदाचित् सेक्रेटरियटमधील पट्टेवाल्याची ओळख त्याला अधिक फलप्रद होऊं शकेल. मंत्र्यापासून पट्टेवाल्यापर्यंत प्रत्येकाशीं वार्ताहराचें संघटन हवें. त्यासाठी कित्येकांच्या त्याला या ना त्या मार्गाने उपयोगीहि पडावें लागतें आणि छोट्यामोठ्या पेगपासून चहा, चिवडा, चिरूट आणि प्रसंगीं तंबाखू यांचासुद्धा त्याला आस्वाद घ्यावा लागतो. वार्ताहर हा कोणत्याहि वातावरणाशीं समरस होऊं शकला पाहिजे आणि एखादा हेर जसें जाळें पसरतो तसें जाळें पसरून त्याने बातम्या मिळविल्या पाहिजेत.

ओळखीदेखीच्या रूपाने बातम्या मिळविण्याची एकदा सोय केल्या-नंतर वार्ताहराने विशिष्ट कार्यक्षेत्रांतील संस्थांचा वा प्रश्नांचा अभ्यास केला पाहिजे व त्या संस्थांत होणाऱ्या दैनंदिन घडामोडींवर त्याने डोळयांत तेल घालून लक्ष दिलें पाहिजे. उदाहरणार्थ, स्कूलबोर्ड किंवा प्राथमिक शिक्षकांचा प्रश्न, किंवा पोस्टांतील कामगारांचा प्रश्न, किंवा विश्वविद्यालय किंवा इतर कोणताहि प्रश्न वा संघटना यांचा विचार करावयाचें त्याने ठरविलें म्हणजे संबंधित लोकांशीं त्याने अहोरात्र संबंध ठेवला पाहिजे व बारीकसारीक हाल-चालींकडेहि त्याने दुर्लक्ष करतां कामा नये. अशा रीतीने पद्धतशीरपणें आणि खंड पडूं न देतां त्याने काम केलें तरच त्याला यशस्वी होतां येईल.

एकदा ही पूर्वतयारी झाल्यानंतर प्रत्यक्ष लिखाण करणें त्याला जड जाणार नाही. शक्य तोंवर दैनंदिन लिखाण त्याने जागच्याजागींच करणें श्रेयस्कर आहे. म्हणजे त्याच्यावर कामाचा ताण जास्त पडणार नाही व त्याचा बराचसा वेळहि वांचेल. सभेच्या ठिकाणाहून किंवा कोणत्याहि समा-रंभांतून बाहेर पडतांना वार्ताहराचा बराचसा मजकूर छपाईसाठी तयार पाहिजे. कचेरींतून बाहेर पडतांनाच त्याने किती मजकूर हवा याची कल्पना करून घेतली पाहिजे. म्हणजे कार्यक्रम पार पडत असतांनाच त्याला संगत-वार असा लहानमोठा वृत्तान्त तयार करतां येईल. हें संपादनाचें कार्य करण्यासाठी आवश्यक असलेली एकाग्रता त्याला सवयीने संपादन करतां येईल. पण ती एकदा त्याने संपादन केली म्हणजे त्याचें काम पुष्कळच हलकें होईल. कारण मग कचेरींत गेल्याबरोबर इंट्रो व हेडिंगें देऊन आणि संपादकाच्या आज्ञेप्रमाणे मजकुरांत काटछाट करून त्याला लगेच बाहेर पडतां येईल. दैनंदिन कार्यक्रमांचे वृत्तान्त लिहितांना वार्ताहराला फारसें कष्ट-पूर्वक लिहिण्याची जरुरी नसते. आणि अशा वेळींहि त्याने प्रथम टाचणें घेऊन नंतर कचेरींत जाऊन मजकूर लिहिण्याची प्रथा पाडली तर त्याचें काम मध्यरात्रीपर्यंतहि आटोक्यांत येणार नाही.

आपल्या वर्तमानपत्राच्या कचेरीशींहि वार्ताहराने सारखा संबंध ठेवणें इष्ट आहे. मधूनमधून टेलिफोनवरून छोट्याछोट्या बातम्या देणें, आपल्या मजकुराचें महत्त्व संपादकाला सांगून ठराविक जागा आपल्या मजकुरासाठी राखून ठेवण्याची विनंती करणें, संपादकाकडून कांही सूचना घेणें हीं सर्व कामें त्याला या संबंधामुळे करतां येतात. नाहीतर एकदा वार्ताहर बाहेर पडला म्हणजे संपादकाचें व त्याचें दर्शनसुद्धा दुर्लभ होतें व विशिष्ट ठिकाणीं तो आहे हें माहीत असूनहि संपादकाला त्याला सूचना देतां येत नाहीत. म्हणून वार्ताहराने शक्य तेवढ्या आधिक वेळां संपादकाला फोन करून आपल्या हालचालींची माहिती दिली पाहिजे व संपादकाकडून वेळोवेळीं सूचनाहि घेतल्या पाहिजेत.

संपादकानेंहि वार्ताहर हा एक स्वायत्त घटक मानून त्याला वाऱ्यावर सोडतां कामा नये. वार्ताहराला दिशा दाखविण्याचें कार्य त्याचें असतें. कोणतीहि घडामोड झाली म्हणजे आपल्याला कोणत्या स्वरूपाचा मजकूर पाहिजे आहे, त्या घडामोडीकडे आपण कोणत्या दृष्टीने पाहतों आहों व विशिष्ट स्वरूपाचा मजकूर आणण्यासाठी वार्ताहराने कायकाय केलें पाहिजे याची स्पष्ट कल्पना संपादकाने वार्ताहराला दिली पाहिजे. तसें झालें म्हणजे वार्ताहर स्वयंप्रेरणेने किंवा स्वतःच्या समजुतीने जें कांही करील त्यापेक्षा अधिक चांगल्या रीतीने त्याला काम करतां येईल. वार्ताहर आणि संपादक यांच्यामध्ये जितकें संघटन जास्त तितकी वृत्तपत्राची बातम्यांची बाजू अधिक बळकट होते आणि त्या बातम्यांची सजावटहि आकर्षक होऊं शकते.

" आज काय बातमी आहे महाशय ? " हाच संपादकाचा वार्ताहराला पहिला प्रश्न पाहिजे. त्याचें उत्तर आलें की संपादकाच्या सूचना लगेच बाहेर पडल्या पाहिजेत आणि वार्ताहराने आपल्या मोहिमेवर निघालें पाहिजे; मग त्यांत यश मिळणें न मिळणें हें वार्ताहराच्या कर्तबगारीवर व कल्पकतेवर अवलंबून राहील. वार्ताहर अगदीच सांगकाम्या असला तर तें

संपादकाचें नशीब व वाचकांचेंहि कमनशीब ! अशा प्रकारच्या एका वार्ताहराची मीं एक गोष्ट कोठेतरी वाचलेली मला आठवते. एका शिक्षण-संस्थेच्या विद्यार्थ्यांची एक सफर बोटीने जावयाची होती. संपादकाने त्या वार्ताहराला त्या सफरीची माहिती काढून त्याचा वृत्तान्त लिहिण्याची आज्ञा केली. वार्ताहर आपल्या कामाला निघून गेला. संध्याकाळीं तो कचेरींत आला व स्वस्थ आपल्या खुर्चीवर जाऊन बसला. त्याला तसें बसलेलें पाहतांच संपादकाने विचारलें, "सफरीचा वृत्तान्त कुठं आहे ?"

त्याने गंभीरपणें उत्तर दिलें, "वृत्तांत देण्यासारखं कांही घडलंच नाही."

"कां बरं ?" संपादकाने प्रश्न केला.

"सफर झालीच नाही !"

"असं ? कां ?"

"ज्या बोटींतून हीं मुलं चाललीं होतीं तिला आग लागली !"

"आणि...आणि मुलांचं काय झालं ?" संपादकाने उतावीळ होऊन प्रश्न केला.

"तीं सारीं बोटीबरोबर नाहीशीं झालीं." वार्ताहराने तितक्याच शांतपणें म्हटलें.

संपादकाने आपल्या कपाळावर हात मारला !

असा वार्ताहर मिळाला तर कोणताहि संपादक दुसरें काय करील बरें ?

★ ★ ★

# आधुनिक उमाजी नाईक

ड्र्यू पिअर्सन हें नांव तुम्हीं ऐकलें आहेत काय ? हा अमेरिकेंतील एक विख्यात पत्रकार आहे. आणि सर्वश्रेष्ठ सत्ताधारी लोकांना व मुत्सद्द्यांना अणुबॉंबइतकी त्याची दहशत वाटते. ही दहशत वाटण्याचें कारण काय ? त्याचें कारण म्हणजे तो प्रसिद्ध करीत असलेल्या अंतर्भेदी बातम्या होय. या बातम्या अमेरिकेलाच नव्हे तर साऱ्या जगाला हादरून सोडतात. त्या वाचल्यानंतर सरकारी अधिकाऱ्यांच्या तोंडचें पाणी पळतें, मुत्सद्द्यांना भूमाता आपल्याला पदरांत घेईल तर बरें असें वाटूं लागतें आणि सर्वसाधारण वाचकवर्ग चकित होऊन उद्गारतो, " याला या बातम्या मिळतात तरी कोठून ? "

गेल्या महायुद्धांतील गोष्ट. अमेरिकेचे अध्यक्ष रूझवेल्ट यांनी प्रथमच आपले व्यक्तिगत वकील म्हणून मि. फिलिप यांना हिंदुस्थानांत रवाना केलें. हिंदुस्थानांतील परिस्थिति पाहून त्या परिस्थितीबद्दल रूझवेल्ट यांना अहवाल सादर करणें हेंच त्यांच्याकडे काम सोपविण्यांत आलें होतें. युद्धाबद्दल हिंदी पुढाऱ्यांच्या भावना काय आहेत व युद्धांत हिंदुस्थानचें सहकार्य मिळविण्यासाठी काय केलें पाहिजे, हेंहि बहुधा प्रे. रूझवेल्ट यांना समजा-

वून घ्यावयाचें असावें. फिलिप यांनी हिंदुस्थानांत राहून, सरकारी अधिकाऱ्यांच्या व हिंदी पुढाऱ्यांच्या भेटीगाठी घेऊन आणि एकंदर परिस्थितीचें बारकाईने निरीक्षण करून रूझवेल्ट यांना एक अहवाल सादर केला. हा अहवाल अर्थातच गुप्त होता. तो सादर करण्यांत आला आहे हेंहि कोणाला कळूं द्यावयाचें नव्हतें. पण एके दिवशीं ही अत्यंत गुप्त अशी बातमी बाहेर आली आणि ती ड्रयू पिअर्सन यांनी फोडली. फिलिप यांनी अहवाल सादर केल्याची तर त्यांनी बातमी छापलीच; पण त्यांच्या अहवालांत त्यांनी काय म्हटलें आहे याचीहि रूपरेखा त्यांनी प्रसिद्ध केली. हिंदुस्थानला स्वातंत्र्याचे अधिकार देणें हाच युद्धप्रयत्नांना हिंदुस्थानचा पाठिंबा मिळविण्याचा एकमेव मार्ग आहे, हा निष्कर्ष फिलिप यांनी अहवालांत काढला होता व तो प्रसिद्ध करून ड्रयू पिअर्सन यांनी ब्रिटिश सरकारला पेचांत टाकलें होतें.

ड्रयू पिअर्सन यांनी वेळोवेळीं अशाच अंतर्भेदी बातम्या प्रसिद्ध केल्या आहेत. ज्याला इंग्रजींत 'स्कूप' म्हणतात त्या या बातम्या. इतर वर्तमानपत्रांच्या आधी एखादी बातमी फोडणें हा 'स्कूप' या शब्दाचा अर्थ आहे. साहजिकच यांत बातमी खणून काढण्याचा, गुप्त रीतीने मिळविण्याचा, अंतर्भेद करण्याचा आशय येतो. इतर वर्तमानपत्रांवर मात करावयाला मिळाली तर कोणाला आवडणार नाही? साहजिकच प्रत्येक वर्तमानपत्र आपापल्यापरीने या बातम्या मिळविण्यासाठी तळमळत असतें. त्यासाठी शक्य तेवढी खटपट करीत असतें.

ही बातमी एखादें राजकीय वा सरकारी गुपितच असावें असें नाही. कोणत्याहि प्रकारचें गुपित फोडण्याचा वर्तमानपत्रांना जो स्वयंसिद्ध हक्क असतो त्या हक्कानुसार समाजांत घडणाऱ्या प्रत्येक घटनेबद्दल वर्तमानपत्रांना ही पूर्वप्रसिद्धि देतां येईल. उदाहरणार्थ, एखादा भयंकर दरोडा पडला व त्याबद्दल चौकशी चालू असतांना एखाद्या वृत्तपत्राच्या हातीं त्याविषयी खात्रीलायक धागेदोरे आले, तर त्यांना प्रसिद्धि देण्यामुळे वर्तमानपत्राला

केवढें तरी यश संपादन करतां येईल. किंवा समजा, दारूबंदीच्या धोरणाबद्दल मध्यवर्ति सरकारांत कांहीतरी विचारविनिमय चालू आहे आणि तेथे विशिष्ट निर्णय घेतला गेल्याची जर एखाद्या वर्तमानपत्राला बातमी कळली तर खुशाल त्याने ती पहिल्या पानावर भडकपणें छापावयास हरकत नाही. हीं उदाहरणें सबंध समाजांत खळबळ उडवून देणाऱ्या बातम्यांबद्दलचीं आहेत. कांही बातम्या अगदीच स्थानिक स्वरूपाच्या असूं शकतात. किंवा मर्यादित लोकांनाच त्यांबद्दल आस्था वाटण्यासारखी असते. उदाहरणार्थ, एखाद्या कॉलेजांतील प्राध्यापकाला काढून टाकलें किंवा विश्वविद्यालयाच्या परिक्षेच्या प्रश्नपत्रिका फोडण्याबद्दल एखाद्या शिक्षकाला परीक्षकपदावरून काढून टाकलें तर विशिष्ट समाजांत त्या बातम्यांना बरेंच महत्त्व असतें व जें वर्तमानपत्र प्रथम ही बातमी छापतें त्याचें त्या समाजांतील स्थान साहजिकच उंच होतें. तेव्हा प्रत्येक प्रकारच्या बातमीकडे संपादकाने लक्ष ठेवलें पाहिजे व ती मिळविण्याचा कसोशीने प्रयत्न केला पाहिजे.

या बातम्या खणून काढणें हें खचितच सोपें काम नव्हे. किंवा चार-दोन दिवसांच्या परिश्रमानेहि या बातम्या हस्तगत करतां येत नाहीत. वर्तमानपत्राला त्यासाठी वर्षानुवर्षे अहर्निश मेहनत घ्यावी लागते. या काळांत सरकारचे मंत्री, वरिष्ठ सरकारी अधिकारी, प्रख्यात कायदेपंडित, कायदेमंडळाचे सभासद, न्यायमूर्ति, विश्वविद्यालयांचे अधिकारी, पक्षोपपक्षांचे नेते वगैरेवगैरे निरनिराळ्या क्षेत्रांतील थोर लोकांशीं संपादकाचे संबंध प्रस्थापित केले पाहिजेत. हें एकदा वळण बसलें म्हणजे या बातम्या मिळविण्याचा एक मार्ग उपलब्ध होतो. अर्थात् वर्तमानपत्राचें जें स्थान व लोकप्रियता असते त्यावरच हें वळण बसणें न बसणें शक्य होतें. समाजांत वर्तमानपत्राला महत्त्वाचें स्थान नसेल तर वरील थोर लोक सहसा त्याच्याकडे ढुंकूनहि पाहणार नाहीत; आणि तें स्थान असेल तर आपोआपहि हे लोक वर्तमानपत्राकडे चालून येतील. परंतु संपादकाने आपल्या मनः-

प्रवृत्तीनुसार एक अड्डा तयार केलाच पाहिजे. त्या अड्ड्यांत प्रत्यक्षपणें जरी हे थोर लोक सामील झाले नाहीत तरी त्यांच्याशीं संबंध असणारी इतर दुय्यम मंडळी तेथे जमूं शकतात. पुष्कळ वेळां सहजगत्या त्यांच्या तोंडून जी माहिती बाहेर पडते तिच्यावरूनहि संपादकाला एखाद्या बातमीचें मूळ सापडूं शकतें. आता हा अड्डा जमविण्यासाठी वा आपलें जाळें सर्वत्र पसरविण्यासाठीं संपादकाने प्रत्यक्षपणें काय केलें पाहिजे, कोणतीं आमिषें दाखविलीं पाहिजेत, कोणती सेवा केली पाहिजे, हा तपशीलाचा प्रश्न आहे. तो ज्याने त्याने आपल्या मनोवृत्तींना अनुसरून सोडवावा. पण कोणत्याहि वर्तमानपत्राच्या यशस्वितेसाठी हा अड्डा आवश्यक असतो हें मात्र विसरून चालणार नाही. कांही संपादक या वेळीं नाक मुरडून म्हणतील, " आमचं तें काम नव्हे. आमचं काम अग्रलेख लिहिण्याचं. आम्हांला वेळ तरी कुठं आहे या अड्ड्यांत चकाट्या पिटायला ? " कदाचित् व्यक्तिशः त्यांच्या दृष्टीने तें खरें असेल; पण त्याचा अर्थ एवढाच असतो, की हें काम त्यांच्यासाठी दुसरें कोणीतरी करीत असतें.

परदेशांतील वृत्तपत्रांच्या कचेरींतहि हे अड्डे असतात. आणि निरनिराळ्या रूपाने आपल्या देशांतहि हे अड्डे आहेत. एक काळ असा होता, की इंग्लंडमधील कॉफी-हाऊसमध्ये राजकारण घडविलें जात असे. तेथे मोठमोठे मुत्सद्दी एकत्र येत, त्यांचा खल होई व मग पक्षोपपक्षांच्या भवितव्याला कलाटणी मिळत असे. आपल्याकडे कांहीकांही ठिकाणें अशीं आहेत, की जेथून राजकारणाचीं सूत्रें हालत असतात आणि त्या ठिकाणीं ज्यांना प्रवेश असतो त्यांना भेटण्याचीं ठिकाणें हीं बातम्यांचीं केंद्रें बनत असतात. दिल्लीमध्ये एके काळीं " हॉटेल इंपीरियल " हें सरकारी गोटांतील बातम्या मिळविण्याचें ठिकाण असे. आजहि बादशाही हॉटेलांत मंत्री आणि मुत्सद्दी आणि अर्थातच मान्यवर संपादक यांची वर्दळ असते. त्या अड्ड्यांत ज्यांना प्रवेश मिळाला त्यांना वाटेल त्या गुप्त बातम्या मिळण्याची पंचाईत पडत

नाही. आणि मग पुढेपुढे अशी वेळ येते, की विशिष्ट वृत्तपत्रांतून सरकार-दरबारीं शिजत असलेल्या बातम्यांचा स्फोट होतो. कांही वृत्तपत्रांना राज-कारणांतील प्रमुख मुत्सद्द्यांचा उघड पाठिंबाहि असतो व आपली कांही महत्त्वाची घोषणा ते याच वृत्तपत्रांतून प्रसिद्ध करीत असतात.

उदाहरणच द्यावयाचें झालें तर दिल्ली येथील बिर्लांच्या 'हिंदुस्थान टाइम्स'चें देतां येईल. सरदार पटेल हयात असतांना कॉंग्रेसच्या वा सर-कारी गोटांतील महत्त्वाची बातमी या वृत्तपत्रांतून प्रसिद्ध होत असे. एकी-कडे बिर्ला व सरदार यांचा स्नेहसंबंध व दुसरीकडे त्या पत्राचे संपादक श्री. देवदास गांधी असल्यामुळे खुद्द महात्मा गांधी व त्यांचे व्याही चक्रवर्ति राज-गोपालाचारियर यांच्याशीं वळण या दुहेरी नात्यामुळे 'हिंदुस्थान टाइम्स'ला बातम्यांचें बहुशः घबाड मिळत असे. आणि मग त्या पत्रांत विशिष्ट बातमी प्रसिद्ध झाली किंवा त्या पत्राच्या लिखाणांत विशिष्ट सूर निघाला म्हणजे लोक त्याचें लोण थेट सरदारांपर्यंत नेऊन पोंचवीत असत.

सर्वच वर्तमानपत्रांना हें भाग्य प्राप्त होणें शक्य नसतें. पण त्यांनी आपले हे अनाधिकृत परंतु हुकमी बातमीदार सर्वत्र पेरून ठेवले पाहिजेत. ते आपल्याला भेटूं शकले नाहीत तर संपादकाने त्यांच्या दारीं गेलें पाहिजे. त्यांच्याकडून नेहमीच बातम्यांची अपेक्षा करणें चुकीचें आहे; पण एखादे वेळींच ते अशी बातमी देतील की जिच्यामुळे वर्तमान-पत्राचा चोहोमुखीं बोलबाला होईल. या बातमीदारांचें संघटन करणें ही एक कला आहे. या बातमीदारांत निरनिराळ्या पेशांचे व वृत्तीचे लोक असतील. ते एकत्र येणेंहि कित्येक वेळां धोक्याचें होईल. कारण पोलीस अधिकारी व कम्युनिस्ट, मंत्री व विरोधी पक्षाचा सभासद, एकाच पक्षाचे परंतु ज्यांच्यामध्ये विळयाभोपळयाएवढें सख्य आहे असे दोन सभासद, या सर्वांची मोट संपादक एकत्र बांधीत असतो आणि त्यांना जर याची जाणीव झाली तर ते बिथरून जाण्याचाच पुष्कळ संभव असतो. म्हणून या सर्व

लोकांशीं संपादकानें मोठ्या कौशल्यानें संबंध ठेवला पाहिजे आणि त्यांपैकीं कोणालाहि दुसऱ्याच्या अस्तित्वाची जाणीव करून न देतां आपलें काम केलें पाहिजे.

प्रत्यक्ष व्यवहारामध्ये आंतल्या बातम्या मिळविण्याचें हें काम हळूहळू सुलभहि होत जातें. त्याचीं कारणें खालीलप्रमाणे देतां येतील. पहिलें आणि महत्त्वाचें कारण म्हणजे संपादकाच्या व्यक्तित्वाबद्दल थोरामोठ्यांना वाटणारें प्रेम किंवा आदर. केवळ त्या भांडवलाच्या जोरावर संपादक वाटेल त्याला आपल्या कामीं लावूं शकतो. दुसरें कारण म्हणजे पक्षांतर्गत भांडणें किंवा वरिष्ठ अधिकाऱ्यांमधील चुरस किंवा स्पर्धा. त्यामुळे पक्षामधील लोक किंवा अधिकारीवर्गापैकी कोणीतरी आपल्या विरोधकाला चीत करण्यासाठी कांहीं बातम्या पुरवितात. तिसरें कारण म्हणजे सर्वसाधारणपणें आपल्यामध्ये दिसून येणारा अविचारी बोलकेपणा. सरकारी अधिकारी कचेरींतील गुपित आपल्यापाशीं ठेवण्याची शपथ घेतात, आपल्या कचेऱ्यांतून त्यांना तसे आदेश देणाऱ्या घोषणाहि चिकटाविलेल्या असतात. पण हा आदेश पाळण्याचा, नव्हे मोडण्याचाच बहुतेक अधिकाऱ्यांचा धर्म झालेला आहे. याचें कारण त्यांतून त्यांना कांहीं स्वार्थ साधावयाचा असतो असें नव्हे. पुष्कळ वेळां ते जाणूनबुजूनहि बोलत नाहीत. पण अविचारीपणानें त्यांच्या तोंडून जे उद्‌गार निघतात त्यांतूनच केवढी तरी खळबळ उडविणारी बातमी बाहेर पडत असते, कितीतरी भानगडींचा उलगडा होत असतो.

संपादकाला ही भानगडीची बातमी अर्थातच अगदी शिजवून तयार मिळत नाही. त्याला एखादा धागा मिळतो व त्यावरून पुष्कळसें संशोधन करून पुष्कळसे आडाखे बांधीत तो पुढे पाऊल टाकतो. आडाखे बांधण्याचें कार्य कुशल व कल्पक संपादकच करूं शकतो. त्या कल्पकतेंतूनच केव्हाकेव्हा एखादी श्रेष्ठ बातमी उगम पावते. दिल्लींतील एक विख्यात

पत्रकार श्री. दुर्गादास यांनी कित्येक वर्षांपूर्वी अशीच एक खळबळ उडविणारी बातमी सर्वांच्या आधी प्रसिद्ध केली होती. ही बातमी दिल्ली येथे झालेल्या गांधी-आयर्विन कराराबद्दल होती. त्या वेळीं गांधीजी व लॉर्ड आयर्विन यांच्यामध्ये कांही वाटाघाटी चालल्या होत्या हें खरें आहे. पण या वाटाघाटींतून एखादा करार बाहेर पडेल असें मात्र कोणालाच वाटलें नव्हतें. वर्तमानपत्रांचे बातमीदार नेहमीप्रमाणे बातम्या मिळविण्यासाठी व्हाइसरॉय-भवनांत हजरच असत. अशाच एका वेळीं दुर्गादास यांनी लॉर्ड आयर्विन यांना एकदम प्रश्न केला, " काय, करारावर सह्या झाल्या ना ? "

लॉर्ड आयर्विन हा आकस्मिक प्रश्न ऐकून चकित झाले. आणि काय उत्तर द्यावें हें न सुचून ते क्षणभर घोटाळले. श्री. दुर्गादास हे जाति-वंत पत्रकार. त्यांनी क्षणार्धांत एकच आडाखा बांधला आणि दुसऱ्या दिवशीं दिल्ली करारावर सह्या झाल्याची बातमी त्यांनी खणखणीतपणें प्रसिद्ध केली. त्या एका 'स्कूप'मुळे दुर्गादास यांना पत्रकारजगांत जें स्थान मिळालें तें आजतागायत कायम आहे.

आडाखे म्हटले म्हणजे त्यांत कल्पकता आली खरी; पण म्हणून संपादकाने नुसत्या वावड्या उडविण्यांत मात्र अर्थ नाही. बातमीला कांहीतरी आधार हा पाहिजेच. कारण ती पूर्णतः जरी नसली तरी बऱ्याचशा प्रमा-णांत खरी ठरली पाहिजे. दुर्गादास यांनी दिल्ली करारावर सह्या झाल्याची बातमी प्रसिद्ध केली. ती सुदैवाने खरी ठरली. पण समजा, प्रत्यक्ष जरी सह्या झाल्या नसत्या तरी अशा तऱ्हेचा करार होण्याच्या वाटाघाटी चालल्या होत्या एवढें जरी सत्य असलें तरी पुष्कळ झालें. पण हा करार झाल्याची बातमी प्रसिद्ध होत असतांना मुळांत कांहीच तथ्य नसतें– म्हणजे वाटाघाटी, प्राथमिक स्वरूपाचीं बोलणीं किंवा पत्रव्यवहार हासुद्धा झालेला नसता तर ही बातमी म्हणजे नुसती वावडी ठरली असती. एवढें खरें, की आपला

वाचकवर्ग फार विसराळू आहे. तेव्हा अशा तऱ्हेची बातमी अगदीच निराधार ठरली तरी त्याला त्याचें कांही वाटतहि नाही. पण वृत्तपत्रीय जगांत कांही चिकित्सक वाचक असतातच. आणि निदान इतर पत्रकार तरी चोखंदळपणें पाहात असतातच. अगदीच निराधार बातम्या प्रसिद्ध करण्यामुळे त्यांच्यामध्ये तरी पत्राची पत जाते. तेव्हा नुसत्या वावड्या उडविण्याचा मोह संपादकाने टाळला पाहिजे.

राजकीय घडामोडींच्या बाबतींतच बहुश: या वावड्या उठत असतात. कारण इतर घटनांना कांही ना कांही आधार असल्याशिवाय त्यांच्याविषयी एखादी बातमी प्रसिद्ध होणें शक्य नसतें. राजकीय घडामोडींच्या बाबतींत मात्र कांही वेळीं कल्पनेला वाव दिल्याशिवाय अंदाज व्यक्त करणें शक्य नसतें. अशा वेळीं संपादकाने एकट्यानेच आपल्या जबाबदारीवर पहिल्या प्रतीची बातमी देण्याचें धाडस न करणें बरें. त्याच्या जोडीला एखादें सल्लागार मंडळ असलें तर चार डोकीं एकत्र आल्यामुळे चूक होण्याचा संभव कमी. कोणी म्हणेल, खरोखरच हे अंदाज व्यक्त करण्याची आवश्यकता असतेच काय ? पण मग वर्तमानपत्रांचें काम तरी कोणतें ? वृत्तसंस्थांकडून येणाऱ्या बातम्या देणें एवढेंच वर्तमानपत्राचें काम नव्हे. त्यांत वृत्तपत्रांचें खास कौशल्य काय प्रकट होणार ? राजकीय घडामोडींचा अन्वयार्थ लावून पुढे होणाऱ्या घटनांबद्दल आडाखे बांधण्यांतच खरें कौशल्य आहे. आपल्या स्वत:ची बुद्धि व राजकीय निदान करण्याची पात्रता कसोटीला लावून संपादक जेव्हा कांही आडाखे बांधतो तेव्हाच वृत्तपत्रामध्ये जिवंतपणा आणि चैतन्य निर्माण होतें. नाहीतर वर्तमानपत्राला नुसतें गॅझेटचें स्वरूप येईल.

देशामध्ये महत्त्वाच्या घडामोडी होत आहेत. त्यांची वार्ता फक्त तीनचार ओळींच्या एखाद्या पत्रकामार्फत अधिकृतपणें देण्यांत येत आहे. आता वर्तमानपत्रांनी तीं पत्रकें छापूनच स्वस्थ बसावयाचें काय ? उदाहरणार्थ, गांधी आणि जिना यांच्या वाटाघाटी चाललेल्या आहेत. दररोज गांधीजी जिना यांच्या बंगल्यावर जात आहेत. त्या बंगल्यांत

शिरतांना व तेथून बाहेर पडतांना गांधीजी व जिना कांही क्षण वार्ताहरांना भेटतात. गांधीजींच्या मुद्रेवर त्यांचें अकृत्रिम हास्य उमटलेलें आहे. जिना यांच्या करारी मुद्रेवर स्मिताची एखादी रेषा उमटते न उमटते तोंच वार्ताहर त्या दोघांना विचारीत आहेत, " कांही बातमी ? "

गांधीजी जिना यांच्याकडे बोट दाखवून मिस्किलपणें हसत म्हणत आहेत, " मी काय सांगूं ? मीं स्वतःला यांच्या हवालीं केलं आहे. "

जिना यांची मुद्रा अधिकच करारी दिसूं लागली असून त्यांच्या तोंडून एवढेच शब्द बाहेर पडत आहेत, " सभ्य गृहस्थहो, चर्चा चालू आहे. उद्या सकाळीं दहा वाजतां आम्ही पुन्हा भेटूं. "

" पण आशेला कांही जागा आहे का ? " एक धाडसी वार्ताहर प्रश्न करतो.

" आशेला नेहमीच जागा असते. " जिना यांचे धारदार उद्गार बाहेर पडतात आणि ते आणि गांधीजी आपापल्या मार्गानें निघून जातात.

आता वर्तमानपत्रांनी आपल्या उत्सुक वाचकांना बातमी काय द्याव-याची ? त्यांनी अधिकृतपणें बाहेर पडलेलें पत्रक प्रसिद्ध करून स्वस्थ बसा-वयाचें काय ? तसें जर वर्तमानपत्रांनी केलें तर आठआठ दिवसपर्यंत या महत्त्वाच्या घडामोडींबद्दल वर्तमानपत्रांना फक्त दोनच ओळी छापतां येतील— " आज चर्चा झाली; उद्या ती पुढे चालू राहणार आहे ! "

पण वर्तमानपत्रांचे संपादक इतके विकाररहित व आत्मसंतुष्ट राहूं शकत नाहीत. ते या वाटाघाटींच्या भोवती उभा केलेला पोलादी पडदा तोडूं पाहतात. मग संपादक व त्याचें सल्लागारमंडळ विचार करूं लागतें. जिना यांनी कोणती भूमिका घेतली असेल ? गांधीजींनी जिनांना कोणतीं आश्वासनें दिलीं असतील ? मग जुन्या फाइली चाळल्या जातात. गांधीजींनी मागे कधीतरी केलेली घोषणा " मी जिनांना कोरा चेक द्यायला तयार आहें... " ही संपादकाला आठवते. या वेळींहि गांधीजी तीच भूमिका घेतील काय ? मग गांधीजींचीं प्रार्थनेच्या वेळचीं भाषणें चाळून पाहिलीं जातात.

त्यांत असा कांही उल्लेख निघतो काय? तसा उल्लेख निघत असेल तर एक भूमिका तयार होते. आणि मग संपादक या वाटाघाटींबद्दलची बातमी छापतांना तो दृष्टिकोण पुढे मांडतो व म्हणतो, की गेल्या कांही दिवसांत जिना हे आपल्या भूमिकेला चिकटून राहिले व त्यांच्याशीं तडजोड करण्यासाठी गांधीजींनी शक्य तेवढी माघार घेण्याची तयारी दाखविली असें विश्वसनीय रीत्या कळतें.

पुष्कळ वेळां " विश्वसनीय रीत्या " म्हणून जें कळलेलें असतें तेंहि संपादकाच्या विचारमंथनांतूनच बाहेर आलेलें असतें. फक्त विशिष्ट घटनांचा आधार घेऊनच संपादक तो निष्कर्ष काढीत असतो. उदाहरणार्थ, या वाटाघाटी चालू असतांनाच शहरांत पं. जवाहरलाल नेहरू किंवा सरदार पटेल आले तर संपादकाच्या डोक्यांत एक नवीनच विचारचक्र सुरू होतें. पंडित नेहरू गांधीजींच्या भूमिकेला पाठिंबा देतील काय? सरदार पटेल विरोध करतील काय? मग त्या दोघांच्या मुलाखती घेऊन या वाटाघाटींबद्दल त्यांचें काय मत आहे हें काढून घेण्याचा प्रयत्न केला जाईल. त्यांनी बोलावयाचें नाकारलें तर त्यांच्या निकटवर्तीयांकडून त्यांच्या प्रतिक्रिया जाणून घ्यावयाचा मार्ग मोकळा आहेच. मग पुन्हा एक विचारमंथन होईल आणि त्यांतून दुसरा एक निष्कर्ष बाहेर पडेल. वाटाघाटी यशस्वी होण्याच्या दृष्टीने तो अनुकूल असेल किंवा प्रतिकूलहि असेल. सरदार पटेल यांनी केलेल्या एखाद्या भाषणाचा आधार देऊन वर्तमानपत्राचा खास निरीक्षक असा अंदाज व्यक्त करील, की "जिनांच्या हटवादीपणाला तोंड द्यावयाचेंच कॉंग्रेसने ठरविलें असून यापुढे कोणत्याहि नवीन मागणीचा कॉंग्रेस विचार करणार नाही. त्या दृष्टीने वाटाघाटी यशस्वी होण्याचा संभव फारच कमी झाला आहे असें म्हणावयास हरकत नाही."

याच वेळीं दोन महत्त्वाच्या घटना घडून येतात. एक म्हणजे अस्पृश्य समाजाचे पुढारी डॉ. आंबेडकर यांनी गांधीजींना एक पत्र पाठ-

विलें असल्याची बातमी येते; आणि दुसरी म्हणजे व्हाइसरॉयच्या कार्यकारी मंडळाचे दोन मुसलमान सदस्य सर सुलतान अहमद व सर महमद उस्मान हे शहरांत येऊन दाखल होतात. यावरून संपादकाच्या विचारांना नवीनच चालना मिळते. तो विचार करूं लागतो– आंबेडकरांनी गांधी-जींना काय पत्र लिहिलें असेल ? पण आंबेडकर हे आपण होऊन पत्र पाठ-विणें शक्य नाही. तेव्हा त्यांचें पत्र हें गांधीजींनी पाठविलेल्या पत्राला उत्तरच असेल काय ? मग गांधीजींनी आंबेडकरांना काय पत्र लिहिलें असेल ? ही एक विचारमालिका. दुसरी विचारमालिका ही, की सर सुलतान अहमद व सर महमद उस्मान हे याच वेळीं शहरांत कां आले ? ते जिनांची भेट घेणार काय ? घेणार असल्यास ते जिनांना काय सांग-तील ? ते जें सांगतील तें हिंदुस्थान सरकारचें मत असेल काय ? हिंदु-स्थान सरकारला या वाटाघाटी यशस्वी व्हाव्या असें वाटत असेल काय ?

या विचारमालिकेच्या अनुरोधाने संपादक माहिती गोळा करूं लागतो. त्या माहितीच्या आधारें त्याच्या विचारांना नवीन दिशा लाभते आणि मग त्यांतून एक निष्कर्ष बाहेर पडतो. हा निष्कर्ष कोणताहि असो, त्याला वास्तविक परिस्थितीचा आधार असला म्हणजे संपादकाला एक संगतवार भूमिका तयार करतां येते. डॉ. आंबेडकर यांनी खरोखरच गांधीजींना पत्र पाठविलें असेल तर त्यांच्याकडून किंवा त्यांच्या अनुयायां-कडून हें गांधीजींच्या पत्राला उत्तर होतें किंवा काय हें काढून घेतां येईल. त्या घटनेवरून आंबेडकरांच्या पत्राचें स्वरूप अजमावितां येणें शक्य आहे. कारण गांधीजींनी जर प्रथम पत्र लिहिलें असेल तर आंबेडकरांच्या भूमि-केंत खात्रीने थोडासा आग्रहीपणा येणें क्रमप्राप्त आहे. त्या परिस्थितींत आंबेडकरांनी कोणत्या मागण्या केल्या असतील हें त्यांच्या एकंदर भूमिकेचा विचार करून संपादकाला सहज ठरवितां येईल. त्या आधारें दुसऱ्या दिवशीं तो खुशाल आपल्या राजकीय प्रतिनिधीचा मजकूर म्हणून आंबेडकरांच्या पत्राची बातमी त्यांतील संभाव्य आशयासह छापून टाकील.

तीच गोष्ट सर सुलतान अहमद यांच्या भेटीबद्दल. त्यांनी जिनांची भेट घेतली की संपादकाला आपल्या मनांतील विशिष्ट निष्कर्ष संगतवारपणें मांडतां येईल. आणि वाटाघाटी यशस्वी होण्याच्या दृष्टीने हिंदुस्थान सरकार प्रयत्न करीत आहे असा जर संपादकाचा निष्कर्ष झाला असेल तर त्याला आधार म्हणून या भेटीचा त्याला उल्लेख करतां येईल. किंवा हिंदुस्थान सरकारला वाटाघाटी यशस्वी होऊं नये असें वाटत आहे अशी जर संपादकाची भूमिका झाली असेल तर सर सुलतान अहमद यांच्या भेटीमुळे वाटाघाटींच्या मार्गांत नवीन अडथळा निर्माण झाला आहे असाहि त्याला निष्कर्ष व्यक्त करतां येईल.

तात्पर्य, संपादकाला राजकीय घडामोडींच्या बाबतींत असे अंदाज व्यक्त करावेच लागतात. प्रत्येक वर्तमानपत्रामध्ये “ आमच्या राजकीय प्रतिनिधीकडून, ” “ आमच्या राजकीय निरीक्षकाकडून, ” “ आमच्या खास प्रतिनिधीकडून ” या मथळयाखाली जो मजकूर प्रसिद्ध होत असतो त्याच्या मागे बहुशः केवढेंतरी विचारमंथन असतें. त्या संपादकाचे राजकीय अंदाज खरे ठरले तर पत्राचें व संपादकाचें महत्त्व साहाजिकच वाढतें. पण त्यापासून दुसराहि एक फायदा होतो. त्यांतून वाचकांचें राजकीय शिक्षण होऊं शकतें. हें शिक्षण देऊं शकणारा संपादक तितका अधिकारी असलाच पाहिजे. नाहीतर हें राजकीय निदान तो कसा करूं शकेल व वाचकांच्या बुद्धीला पटेल व विचारशक्तीला चालना देईल अशी भूमिका तरी तो कसा मांडूं शकेल ? कोणी म्हणेल, की हें शिक्षण संपादक अग्रलेखामार्फत देऊं शकणार नाही काय ? देऊं शकेल; पण अग्रलेखाचें स्वरूप वेगळें व बातम्यांचें मंथन करून बातमीच्या रूपाने प्रकट होणाऱ्या या अंदाजांचें स्वरूप वेगळें. अग्रलेखांत संपादक विशेषतः तत्त्वचर्चा करीत असतो. तेव्हा मूलभूत सिद्धान्त मांडण्याकडेच त्याचा कल असतो. शिवाय आपलें स्पष्ट मत तो अग्रलेखांतून देत असतो. वाचकाच्या मनांत कोठल्याहि

रीतीचा संदेह राहूं नये या हेतूनेच तो आपली भूमिका मांडीत असतो. प्रत्यक्ष घडलेल्या बातम्यांच्या आधारानेच तो हें विवेचन करीत असतो. कोणतीहि घटना अनिर्णित असेल तर संपादक सहसा त्या घटनेचा विचार करीत नाही. याला एकच अपवाद असतो आणि तो म्हणजे विशिष्ट स्वरूपाचा निर्णय व्हावा असें त्याला वाटत असेल तर आणि आपल्या लिखाणामुळे त्या निर्णयाला चालना मिळण्याइतका आपला अधिकार आहे अशी त्याची भावना असेल तरच तो अनिर्णित अशा घटनेबद्दल भाकित करतो. पण तें करतांना त्याची दृष्टि इषारा देण्याची असते. सारांश, अग्रलेख हा एक प्रकारें उत्तरीय तपासणीसारखा असतो.

तसें राजकीय अंदाजांचें नाही. येथे संपादक एकंदर घटना संगतवारपणें मांडतो, त्या घटनांची चिकित्सा करतो, आणि काय घडूं शकेल याचे कांही आडाखे व्यक्त करतो. संपादकांचें या घटनांबद्दल कांही स्पष्ट मत झालेलें नसतें. त्याला स्पष्टपणें कांही मतहि व्यक्त करावयाचें नसतें. तो स्वतःच खरें म्हटलें तर विचार करीत असतो. फक्त त्याचें विचारमंथन व्यक्त स्वरूप धारण करीत असतें. वाचकांना साहजिकच त्यांतून विचारांची दिशा मिळते; त्यांना अगम्य वाटणाऱ्या कित्येक गोष्टींचा त्यांना उलगडा होतो आणि अधिकारी व्यक्तींचा विशिष्ट घटनांकडे पाहण्याचा कोणता दृष्टिकोण आहे हें कळून येऊन त्यांनाहि आपलीं मतें बनविणें सोपें जातें. त्या दृष्टीने राजकीय अंदाज वा आडाखे यांना एक प्रकारें शैक्षणिक महत्त्व आहे. आणि म्हणून हे अंदाज या नुसत्या हवेंतील वावड्या ठरूं नयेत याची संपादकाने विशेष खबरदारी घेतली पाहिजे. नाहीतर वाचकांचा विश्वास संपादन करावयाच्या ऐवजीं वर्तमानपत्रें हीं आपली फसवणूक करण्याचीं साधनें तर नव्हेत असा संशय मात्र वाचकांच्या मनांत उत्पन्न होईल आणि वृत्तव्यवसायालाहि त्यामुळे कमीपणा येईल.

अलीकडे आपल्या वर्तमानपत्रांत ‘स्कूप’च्या नांवाखाली इतक्या निराधार बातम्या प्रसृत केल्या जात आहेत आणि राजकीय निरीक्षकांचे

अंदाज म्हणून इतक्या वावड्या उडाविल्या जात आहेत, की सर्वसाधारण वाचकवर्ग अक्षरशः गोंधळांत पडत चाललेला आहे. त्यांना साहाजिकच असें वाटतें, की छापील मजकूर हा खरा असलाच पाहिजे. पण प्रत्यक्षपणें त्यांना आढळून येतें तें हें, की आज भडकपणें प्रसिद्ध होणाऱ्या बातम्यांचा दुसऱ्या दिवशीं इन्कार होतो आणि खुद्द त्याच वर्तमानपत्राचा संपादक 'चुकीची दुरुस्ती' तरी छापतो किंवा त्या बातमीमुळे कोणाचें मन दुखावलें गेलें असेल तर त्याबद्दल दिलगिरी व्यक्त करतो. पुष्कळ अंशीं या बातम्यांचें स्वरूपहि असें असतें, की त्यांतून कोणाच्या तरी बदनामीचाच सूर प्रामुख्याने निघत असतो. सरकारच्या मंत्र्यापासून तो सार्वजनिक कार्यकर्त्यापर्यंत अनेक लोकांचीं खरींखोटीं बिंगें बाहेर काढणें हाच जणू कांही 'स्कूप'चा अर्थ झालेला दिसतो. खरोखर सत्याचा जर त्या बातम्यांत अधिकांश असेल व सार्वजनिक हिताच्या दृष्टीनेच त्या छापल्या जात असतील तर गोष्ट वेगळी. पण अनेक वेळां या बातम्या अतिरंजित असतात. एवढेंच नव्हे तर पूर्णपणें असत्यहि असतात. कांही वेळीं एखादा वार्ताहर तर अशी बातमी पुरवितो, की जिच्यामुळे संपादकाचेंच हसें होतें. कांही वर्षांपूर्वी अशाच एका अवलिया वार्ताहराने मुंबईतील एका पत्राचे संपादक श्री. चिमणलाल वाडीलाल शहा यांना कायदेआझम जिना व त्या वेळचे भारतमंत्रि मि. ॲमरी यांच्यामध्ये झालेल्या गुप्त पत्रव्यवहाराची म्हणून बातमी पुरविली होती व त्या पत्रव्यवहारांतील म्हणून कांही पत्रेंहि त्यांच्या हवालीं केलीं होतीं. श्री. चिमणलाल शहा यांना वाटलें, की आता आपल्याला साऱ्या वर्तमानपत्रांवर मात करतां येईल. आणि म्हणून त्यांनी डंके व नौबती वाजवून हा पत्रव्यवहार छापला! खळबळ उडविणारी बातमी मिळाल्याबद्दल त्यांना इतका उन्माद आला होता, की या पत्रव्यवहारांतील सह्या खऱ्या आहेत किंवा नाहीत याचीहि त्यांनी खातरजमा करून घेतली नाही. तो पत्रव्यवहार प्रसिद्ध झाला आणि कायदेआझम जिना यांची बद-

नामी होण्याऐवजी खुद्द संपादकाचीच नाचक्की झाली. कारण तो सारा पत्रव्यवहार व ती सारी बातमी म्हणजे एका वार्ताहराने केलेली शुद्ध बनवाबनवी होती !

खळबळ उडविणाऱ्या बातम्या छापण्याचा हव्यास कसा अंगलटीं येतो याचें हें एक उत्कृष्ट उदाहरण आहे. संपादकाने तें उदाहरण नेहमी आपल्या डोळयांसमोर ठेवलें पाहिजे. सरकारी गोटांतील वा कोणत्याहि सार्वजनिक संघटनेंतील अंतर्गत घडामोडींच्या बातम्या मिळविण्याचा संपादकाने जरूर प्रयत्न करावा. पण त्या खऱ्या असतील व त्यांचा परिस्फोट होणें सार्वजनिक हिताचें आहे असें संपादकाला निश्चितपणें वाटलें तरच त्यानें त्या प्रसिद्ध कराव्या. तसें न करतां हातीं येईल ती बातमी केवळ खळबळ उडविणारी आहे म्हणून संपादकाने ती छापण्याची प्रथा चालू ठेवली व तिचे समाजावर परिणाम काय होतील या बाबतींत जर तो बेदरकार राहिला तर तें त्याच्या स्वतःच्या व त्याच्या वर्तमानपत्राच्या दृष्टीनेच अनिष्ट होईल. इतकेंच नव्हे तर त्यामुळे कालांतराने वृत्तव्यवसायाची सारी प्रतिष्ठाच नाहीशी होईल.

★ ★ ★

प्रकरण ९ वें

# निरागस आनंद देणारीं सदरें

★

" कांप्या द्या साहेब. " असा शब्द येतांच संपादक आपल्या मेजावरील तयार मजकुराची एक चळत फोरमनच्या हातीं देतो. ती चाळतांचाळतां फोरमन कधीकधी किंचित् नाक मुरडून म्हणतो, " विषय आहे वाटतं ? "

" मग ? काय पाहिजे तुम्हाला ? " त्याने व्यक्त केलेल्या नापसंतीची जाणीव झालेला संपादक जरा तीव्रतेने विचारतो.

" नाही, म्हटलं बातम्या असत्या तर बरं झालं असतं. " फोरमन जरा घुटमळत पण खंबीरपणें म्हणतोच.

वर्तमानपत्राकडे सर्वसाधारण लोक कोणत्या दृष्टीने पाहतात त्याची थोडीशी चुणूक फोरमनच्या या उद्गारांवरून मिळते. पण दैनिक वर्तमानपत्र म्हणजे नुसत्या बातम्या नव्हेत. त्यांत इतरहि विषय असतात, निरनिराळीं सदरें असतात, अग्रलेख असतो, वाचकांचीं पत्रें असतात, तऱ्हेतऱ्हेचा मजकूर असतो. फक्त बातम्यांना दैनिकांत अग्रस्थान असतें व इतर मजकुराला दुय्यम स्थान असतें.

दैनिक वर्तमानपत्र चटकदार व आकर्षक करण्यासाठी संपादक त्यांत बराचसा मालमसाला भरत असतो. तें शिक्षणाचें एक प्रभावी साधन

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

करण्यासाठी संपादक अग्रलेखांच्या जोडीला त्यांत विचारप्रवर्तक असे लेख छापत असतो व वाचकवर्गाला त्याच्या दैनंदिन जीवनांत उपयुक्त होईल अशी हरएक प्रकारची तो माहितीहि पुरवीत असतो. या सर्व गोष्टींमागील हेतु अर्थात् वाचकांचें मन मिळविणें हाच असतो. एक प्रकारें स्वार्थी दृष्टीनेंहि वर्तमानपत्राला या गोष्टी कराव्या लागतात. कारण दैनिक म्हटलें की साधारणपणें सर्वांच्या बातम्या सारख्याच असणार; मग वाचकांनी इतर वर्तमानपत्रांऐवजी आपलें वर्तमानपत्र घ्यावें असें संपादक कसें म्हणूं शकेल ? तसें म्हणतां यावें म्हणूनच निरनिराळे संपादक वाचकांपुढे निरनिराळीं आमिषें ठेवीत असतात; समाजांतील अनेक वर्गांपैकी, हितसंबंधांपैकी विशिष्ट वर्ग वा हितसंबंध आपल्याकडे ओढण्याचा प्रयत्न करीत असतात. त्यासाठीच वर ज्याचा "विषय" म्हणून उल्लेख झाला आहे तो मजकूर संपादक आपल्या वर्तमानपत्रांत देत असतात.

वर्तमानपत्राचा वाचकवर्ग तुम्हांला जाणून घ्यावयाचा असेल तर जरा गावांत फेरफटका मारा, वर्तमानपत्रविक्रेत्यांच्या दुकानांपुढे उगीच उभें राहा, कोण काय वाचतो तें पाहा, कोण काय बोलतो तें ऐका म्हणजे वर्तमानपत्राच्या मजकुराच्या बाबतींत तुम्हांला एक नवीनच दृष्टि मिळेल आणि तुम्हांला जो टाकाऊ वाटतो, फुकट जागा अडविणारा वाटतो, क्लिष्ट वाटतो, तो मजकूर वर्तमानपत्रें कां छापीत असतात याची तुम्हांला कल्पना येईल.

मुंबई-पुण्याकडे किंवा कोणत्याहि मोठ्या गावीं रात्रींचे साधारण नऊ वाजतां तुम्ही कधी "ओपालिंग" असें ओरडत जाणारीं मुलें पाहिलीं आहांत काय ? त्यांचा तो आवाज ऐकला की धडाधड घरांचीं विशेषतः दुकानांचीं दारें उघडतात आणि प्रत्येकजण पैसा, दोन पैसे टाकून एक लहानसें चिटोरें विकत घेतो. त्या चिटोऱ्यावर न्यूयॉर्क कॉटनचा खुलता बाजारभाव दिलेला असतो. त्या भावावर सट्टा खेळला जातो. त्यानंतर एकदीडच्या सुमारास बंद भाव येत असतो. कित्येक वेळां रात्रपाळीचा संपादक हातघाईवर येऊन

पहिल्या पानावरील अखेरच्या बातम्या तयार करीत असतांनाच फोन खणखणूं लागतो. त्याला वाटतें कांहीतरी खास बातमी आली असावी, म्हणून उत्सुकतेने तो फोन कानाला लावतो तोंच त्यांतून अजीजीने आवाज येतो, " साहेब, क्लोजिंग आला का हो ? मेहेरबानी करून सांगाल का ?"

हाच तो क्लोजिंगचा आकडा पाहण्यासाठी सकाळीं कित्येक लोक वर्तमानपत्र हातीं घेतात आणि आपण लावलेली ' एक्का ', ' तिर्री ' आली किंवा नाही एवढें पाहून ते अंक खालीहि ठेवतात. वर्तमानपत्राच्या बहुशः पहिल्या पानांवर जें एक कोष्टक दिलेलें असतें त्याला आज अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झालेलें आहे आणि म्हणून मथळयामध्ये चूक होऊं नये म्हणून संपादक जितकें लक्ष देतो तितकेंच क्लोजिंगचा आकडा चुकूं नये म्हणूनहि तो देतो.

दैनिक वृत्तपत्रांतील भविष्यालाहि एके काळीं तसेंच महत्त्व होतें. विशेषतः या भविष्यावर " आजच्या शुभराशी " म्हणून जे आकडे दिले जात असत त्यांचा सट्टयासाठी मार्गदर्शक म्हणूनहि उपयोग होत असे. सकाळीं वर्तमानपत्र हातीं घेतल्याबरोबर एकदा आपल्या राशीचें भविष्य बघितलें की गिरणीकामगाराचें समाधान होत असे. त्या भविष्याच्या अनुरोधाने त्याच्या हालचालींत बदल होत असेल किंवा काय कोण जाणे ! पण रात्रीं शुभराशींतील एखादा आकडा तरी तो लावल्याशिवाय राहात नसे एवढें खास. कांही वर्षांपूर्वी एका पत्रकाराने मला मोठ्या अभिमानाने सांगितलें, की आमच्या शुभराशीवर कांही लोकांनी हजारो रुपये मिळविले आहेत. आज दैनिकांत तरी भविष्याला फारसें स्थान राहिलेलें नाही. मोठीं वर्तमानपत्रें तें देण्याचें कटाक्षाने टाळतात. पण लहान आणि जिल्हा-वर्तमानपत्रांत त्याला वाव मिळतो. आणि भविष्य वाचणाऱ्यांचा असा एक मोठा वाचकवर्ग अद्याप अस्तित्वांत आहे.

त्यानंतर लहानांपासून थोरांपर्यंत आणि अशिक्षितांपासून सुशिक्षितांपर्यंत असंख्य लोकांना ज्यांत विलक्षण गोडी असते असा मजकूर म्हणजे चित्रपटांबद्दलचा किंवा विशेषतः नटींबद्दलचा मजकूर होय. वर्तमानपत्रांतलि चित्रपटांच्या जाहिरातींत देण्यांत आलेलीं नटींचीं चित्रें पाहून ज्यांचें समाधान होत नाही असे वाचक चित्रपटविषयक सदराकडे वळतात त्यांत चित्रपटांचें जें परीक्षण असतें त्याबद्दल त्यांना आस्था असेल असें नव्हे. पण आपल्या आवडत्या नटनटींच्या छायाचित्रांनीं तें पान जें सजविलेलें असतें त्यामुळे त्यांचीं मनें आकर्षित होतात. त्याच्याच जोडीला 'फिल्म इंडिया'चे संपादक श्री. बाबूराव पटेल यांनी लोकप्रिय केलेलें 'सवाल जबाबा'चें सदर असेल किंवा एखाद्या नटीची मुलाखत, तिच्या खाजगी जीवनाची चर्चा वगैरे खुसखुशीत मजकूर असेल तर तें पान अधिकच लोकप्रिय होतें. साहजिकच ज्या वर्तमानपत्रांना आपला वाचकवर्ग वाढवावयाचा असतो तीं चित्रपटविषयक सदराकडे बरेंच लक्ष पुरवितात. त्यापासून दुसराहि एक फायदा होण्यासारखा असतो आणि तो म्हणजे चित्रपटांच्या जाहिराती मिळण्याचा. आणि आर्थिक फायद्याचा प्रश्न आला की वर्तमानपत्रांनी परिश्रम न घेतले तरच नवल !

बहुशः चित्रपटविषयक किंवा दुसरें कोणतेंहि सदर एक किंवा दोन संपादकांच्या हातीं देण्यांत येतें. पण त्यांचें काम म्हणजे चित्रपट पाहून त्यांचें परीक्षण करणें एवढेंच नव्हे. खरें सांगावयाचें तर एखाद्या दर्दी इसमाकडेच हें काम सोपविणें इष्ट आहे. नुसत्या सिनेमाशौकिनाकडे या सदराचें संपादन सोपवून चालणार नाही. त्याला चित्रपटाच्या धंद्याबद्दल आस्था हवी; चित्रपटाचें तंत्र, दिग्दर्शन व अभिनय यांच्यामध्येंहि तो तज्ज्ञ हवा. म्हणजे वाचकांच्या मनरंजनाबरोबर या लोकप्रिय धंद्याचें उद्दिष्ट, कार्य व त्यांतील प्रगति यांबद्दल तो लोकांना उपयुक्त माहितीहि पुरवूं शकेल.

वर्तमानपत्रांतील निरनिराळीं सदरें हींहि वेगवेगळा वाचकवर्ग आपल्याकडे ओढून घेण्यासाठी सुरू करण्यांत येतात. हीं सदरें म्हणजे वर्तमानपत्रांतील मालमसाला होय. त्यांत चटकदारपणा आलाच. आणि तेंच बऱ्याच सदरांचें उद्दिष्ट असलें पाहिजे. उदाहरणार्थ, " महिलाजगत् " या मथळयाखाली स्त्रियांच्या जीवनाविषयी जो मज़कूर येतो त्याचें स्वरूप नुसतेंच बोधप्रद असून उपयोगी नाही. कित्येक वेळां महिलांचें जग म्हणजे त्यांच्या चळवळी अशीच आपण समजूत करून घेतों. आणि मग इंग्लंडांतील स्त्रीस्वातंत्र्याची चळवळ, सफ्रेजेट चळवळ, आपल्या देशांतील महिला परिषदा, राजकीय वा सामाजिक जीवनांत पुढे आलेल्या महिलांनी केलेलीं भारदस्त भाषणें, या परिषदांतील रुक्ष ठराव व त्याहीपेक्षा रुक्ष चर्चा आणि अशाच प्रकारचा मजकूर त्या पानांत घालून आपण तें पान अगदीच बोजड करतों. कांही संपादकांचें तेवढ्यानेंहि समाधान होत नाही आणि म्हणून सर्व स्फूर्तींचें आगर झालेल्या रशियाकडे ते वळतात व रशियन स्त्री, तिचें सामाजिक जीवन, तिचें सामर्थ्य व तिचें कर्तृत्व यांचीं वर्णनें करून ते महिला जगताला क्रांतीचा संदेश देतात किंवा अितर कोणत्याहि चळवळीप्रमाणे महिलांच्या चळवळींत जे भेद, तंटे, भांडणें माजलेलीं आहेत त्या भांडणांचे बरेवाईट पडसाद या सदरांतून उठवितात. हें सारें नको असें माझें म्हणणें नाही. पण तेवढेंच देऊन ' महिला जगत् ' हें पान सजविण्यांत मात्र अर्थ नाही. त्या मजकुराला विशिष्ट मर्यादित स्थान देऊन महिलांच्या जीवनाशीं संबद्ध असलेल्या इतर गोष्टींनाहि संपादकानें वाव द्यावा. आणि मग संपादकाला आढळून येईल, की नवेनवे रुचकर पदार्थ तयार करण्याची रीति, विणकामाचीं निरनिराळीं डिझाइन्स, स्त्रियांच्या वेशभूषेचे अनेक व बदलते प्रकार, घरगुती औषधें, संसारांतील अडचणी व त्यांवरील उपाय, कायदेशीर सल्ला, मुलांची जोपासना करण्याबद्दलच्या सूचना, कुटुंब-नियोजनाबद्दलचे विचार वगैरे मजकूर या सदरांत घातला तर तें पान अधिक आकर्षक होतें. इतकेंच नव्हे, तर स्त्रीवर्गांत अधिक लोकप्रिय होतें.

ह्याचा अर्थ असा, की महिलांच्या आवडीनिवडी व अपेक्षा विचारांत घेऊन संपादकाने हें सदर लिहिलें पाहिजे. आपल्या आवडीनिवडी, आपले परिपक्व झालेले विचार आणि स्त्रीवर्गाच्या कर्तव्याबद्दलच्या आपल्या कल्पना त्याने स्त्री-वाचकवर्गावर लादतां कामा नयेत. महिलांच्या विचारांना संपादकाने चालना जरूर द्यावी. त्यासाठी भाषणें, मुलाखती वा गंभीर लेख छापणें हा जसा मार्ग आहे तसाच स्त्रियांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांवर उद्बोधक पण चटकदार अशी चर्चा सुरू करणें हाहि एक मार्ग आहे. जिव्हाळ्याचे हे प्रश्न वाटेल ते असूं शकतात. मागे "सकच्छ की विकच्छ पातळें" या प्रश्नावरील चर्चा अशी रंगली होती, की क्षणभर मोठमोठे राजकीय वादहि तिच्यापुढे फिके पडल्यासारखे झाले होते. अशा तऱ्हेचे चर्चेचे विषय शोधून काढणें हेंसुद्धा संपादकाचें महत्त्वाचें कार्य होय. वर्तमानपत्रांत आपण सुरू केलेल्या चर्चा घरोघरीं आणि सार्वजनिक ठिकाणीं लोक बोलूं लागले म्हणजे संपादकाने खुशाल समजावें जनमनाची आपण पकड घेतली म्हणून.

वर्तमानपत्राच्या वाचकवर्गाला कांहीतरी नावीन्यपूर्ण असें नेहमी हवें असतें आणि मधूनमधून निर्माण होणाऱ्या वादविषयांत त्यांचें मन अतिशय रंगून जातें. अर्थात् हा वाद नवकाव्याविषयी किंवा कोयना धरणाच्या योजनेविषयी असून मात्र चालणार नाही. त्या वादाला महत्त्व असतें तें अगदीच मर्यादित अशा वाचकवर्गामध्ये. वाचकांच्यासुद्धा निरनिराळ्या परी असतात. कांहींना गंभीर विषय खरोखरीच आवडतात आणि मग मुक्तेश्वराबद्दल श्री. प्रियोळकर व श्री. आजगावकर यांच्यामध्ये वाद सुरू झाला आणि त्याचें स्वरूप निखालस संशोधनपर असलें तरी ते तो वाद डोळ्यांखालून घालतील. पण अशा वाचकांचें प्रमाण अगदीच लहान असतें. त्याच प्रकारच्या वाचकांसाठी मधूनमधून कांही संशोधनात्मक किंवा चिकित्सक स्वरूपाचा मजकूरहि छापावा लागतो. उदाहरणार्थ, कांही वाचकांना सूर्यग्रहणाबद्दलची शास्त्रीय माहिती हवी असते; कांहींना भारतीय

महायुद्धाचा काल कोणता याबद्दल ऊहापोह केलेला आवडतो. तसेंच कांहींना ऐतिहासिक कागदपत्रांच्या आधारें तत्कालीन रीतिरिवाज वा रूढि यांच्याबद्दल कोणीं विवेचन केलें तर तें आवडतें, किंवा पंचवार्षिक योजनेचें परीक्षण किंवा स्टर्लिंग गंगाजळीचा प्रश्न यांबद्दल अधिकारी व्यक्तींकडून आलेले लेख वाचावेसे वाटतात. अर्थातच संपादकाला पुष्कळ वेळां अनिच्छेने का होईना, पण या प्रकारचा मजकूर छापून त्या वाचकांचें समाधान करावेंच लागतें. इतर वाचकवर्ग त्या मजकुरावरून डोळे फिरविण्याचेहि श्रम घेत नाही. साधारणपणें अग्रलेखाच्या किंवा त्याच्या समोरच्या पानावर हा मजकूर छापून येत असतो. म्हणून तीं पानें निर्विकारपणें उलटून पुढे जाणारे वाचक कितीतरी आढळून येतात.

पण संपादकाला त्याचें वैषम्य वाटत नाही. तो प्रत्येक प्रकारच्या वाचकाला अंजारूनगोंजारून घेत असतो. त्याच हेतूने कामगारांच्या जीवनाबद्दलचें एक सदर सुरू करून तो बहुजनसमाजाचें मन मिळविण्याचा प्रयत्न करतो. या सदराचें स्वरूपहि क्लिष्ट नसावें. कामगारांच्या दैनंदिन चळवळी, कामगारविषयक कायदे, परदेशांतील कामकरी चळवळींची व कामकरी संघटनांची प्रगति व कार्य यांची तर या सदरांत माहिती हवीच; पण कामगारांना राजकीय शिक्षण देत असतांना त्यांच्या जीवनालाहि दिशा लावण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. आर्थिक मागण्या व इतर हक्कांसाठी झगडणें एवढेंच कामगारांच्या जीवनाचें ध्येय नव्हे. इतर वर्गांप्रमाणेच कामकरीवर्गहि परिपूर्ण जीवन जगण्याचा प्रयत्न करीत असतो. आणि त्यासाठी त्याला कांही जबाबदाऱ्याहि पार पाडाव्या लागतात. दुर्दैवाने कामकरी चळवळ म्हटली म्हणजे सर्वांच्या डोळ्यांसमोर नुसताच संघर्ष उभा राहतो. आणि " जगांतील कामगारांनो, एक व्हा ! " हा मार्क्सचा संदेश प्रत्येकाच्या कानांत घुमूं लागतो. पण वर्गयुद्धासाठी सज्ज झालेल्या या कामगारांना सार्वजनिक सत्यनारायण, भजन, कीर्तन, पंढरीची वारी, आखाडे

आणि हुतूतू यांची कामकरी चळवळीपेक्षाहि अधिक गोडी असते. गावच्या मारुतीच्या देवळासाठी वर्गणी गोळा करणें, आपल्या लहानशा पोटजाती-च्या संघटनेसाठी नाटकाचा प्रयोग करणें, सहकारी संघटनेसाठी शेअर जमविणें हीं कामें तो जितकीं नेटाने करतो, तितक्या नेटाने तो आपली युनियन कधीच चालवीत नाही. म्हणून त्याचे हे हितसंबंध, त्याच्या या आकांक्षा आणि त्याच्या व्यक्तिगत जीवनांतील इतर आवडीनिवडी यांचाहि कामगारांच्या सदरामध्ये प्रामुख्याने उल्लेख होणें आवश्यक असतें. काम-गारालासुद्धा प्रसिद्धीची आवड असते; आणि आपलें स्वतःचें जरी नसलें तरी आपल्या संघटनेचें वर्तमानपत्रांत नांव आलें तरी तो संतुष्ट होतो. कामगार-जगांतील या छोट्यामोठ्या हालचालींचे पडसाद कामगारविषयक सदरांत उठले पाहिजेत.

त्याचप्रमाणे कुशल व कामसू अशा कामगारांचें जीवनचित्र जर आपण रंगवूं शकलों, तर प्रसिद्धीच्या रूपाने कांही चांगल्या व्यक्तींना आपण उजेडांत आणूं, एवढेंच नव्हे, तर सामाजिक दृष्टीने एक उपयुक्त कार्य आपण केल्यासारखें होईल. कारण वर म्हटल्याप्रमाणे कामगारांना हक्क अस-तात तशाच जबाबदाऱ्याहि असावयाला पाहिजेत; व त्यांना स्वतःच्या हक्कांची जाणीव करून देणें हें जितकें आवश्यक आहे, तितकेंच त्यांना आपल्यावरील जबाबदाऱ्यांची जाणीव करून देणें हेंहि आवश्यक आहे. त्या दृष्टीने आदर्श कामगारांचीं जीवनचरित्रें छापणें हें कामकरी वर्गाला कार्य-प्रवृत्त करावयाला खात्रीने उपयुक्त होईल. कामकरी वर्गापैकी जीं बडीं धेंडें मानलीं जातात त्यांचींच हीं चरित्रें मात्र असतां कामा नयेत. कारण त्यांचीं चरित्रें देऊन फार तर त्यांचा एक लहानसा गट आपल्याला वश करून घेतां येईल; पण सर्वसाधारण कामगारांचीं मनें मिळवितां येणार नाहीत. त्यापेक्षा अधिकाराच्या जागीं नसलेल्या व चळवळीपासूनहि साधा-रणपणें अलिप्त असलेल्या श्रमिक कामगाराचें जीवनचित्र आपण रेखाटलें,

तर तें कामगारवर्गाच्या हृदयाला जाऊन भिडेल. कारण त्यांत त्याला स्वतःचें प्रतिबिंब उमटल्यासारखें वाटेल. संपादकाचाहि त्यामुळे एक फायदा होईल. आणि तो म्हणजे सर्वसाधारण कामगारांच्या जीवनाशीं त्याचा या मार्गानें प्रत्यक्ष संबंध जडेल. कामगाराच्या जीवनावरील सदर चालविणाऱ्या संपादकाचा कामगाराच्या जीवनाशीं प्रत्यक्ष संबंध असल्याशिवाय त्याला त्या पानांत जिवंतपणा, चैतन्य कसें आणतां येईल ?

समाजाच्या नाडीवर हात ठेवूनच संपादकाला इतरहि सदरें चालवावीं लागतात. सर्वसाधारण वाचकाचें मन कशांत रंगतें हें ज्या संपादकाला अचूक जाणतां येईल तो संपादक निरनिराळीं सदरेंहि शोधून काढूं शकेल आणि त्यांत रंगहि भरूं शकेल. वाचकाच्या मनाचा थांग लावण्याचें एक प्रमुख ठिकाण म्हणजे वर्तमानपत्र-विक्रेत्यांचा अड्डा हें होय. वर्तमानपत्राची खरी पारख– अर्थात् त्यांच्या दृष्टीने– वर्तमानपत्र-विक्रेतेच करीत असतात. त्यांचा वाचकांशीं दररोजचा संबंध येतो. तेव्हा वाचकांचीं मतें व आवडी यांची त्यांना जास्त चांगली माहिती असते. तसे तेहि मोठे चोखंदळ असतात. स्वतःच्या स्वार्थासाठी त्यांना वर्तमानपत्रांची योग्य निवडहि करावी लागते. संपादकाने मधूनमधून त्या चव्हाट्यावर बसण्याचा क्रम ठेवला, तर त्याला चुरचुरीत टीकाहि ऐकावयाला मिळेल आणि नवनवीन कल्पनांचीहि देणगी मिळेल.

" हें पाहिलंत का ? " एखादा विक्रेता कधी म्हणेल, " हा खुनाचा खटला या वर्तमानपत्रानं कसा सचित्र दिला आहे ! अशा तऱ्हेनं दर रविवारीं एखादा तरी खटला तुम्ही द्या, साहेब. असा खप वाढेल म्हणतां !... "

लगेच दुसरा म्हणेल, " 'जग हें असं आहे !' असं कांहीतरी सदर काढून त्यांत परदेशी वर्तमानपत्रांत येणाऱ्या कहाण्या तुम्ही सुरू करा– फार लोकप्रिय होईल तें सदर ! "

कोणी म्हणेल, "कोडं सुरू करा तुम्ही. त्याच्याशिवाय धडगत नाही आता."

त्यावर कोणी म्हणेल, "कोड्यांचीं उत्तरं आपण देऊंया. नाहीतरी नुसतीं त्यासाठी निघालेलीं चिटोरींसुद्धा लोक विकत घेतातच की नाही? आपण तर मजकूर आणि बातम्याहि देणार आहोंत. मग खपाला काय तोटा?"

अर्थात् या अड्डयांत खरें महत्त्व वर्तमानपत्राच्या खपाला असतें; आणि ज्याचा जास्त खप तें वर्तमानपत्र अधिक यशस्वी, नव्हे, अधिक श्रेष्ठ असेंहि येथील लोकांचें मत असतें हेंहि सांगावयाला नकोच.

त्यानंतर संपादकाने साहित्यिकांच्या अड्डयांत पाऊल टाकलें तर तेथे त्याला निराळयाच प्रकारच्या सूचना मिळतील. आणि आणखी कांही सदरें कशीं तयार करावीं, किंवा आहेत तीं कशीं सुधारावीं याबद्दल अधिकारवाणीने प्रकट केलेलीं मतें त्याला ऐकावयाला मिळतील. अर्थात् साहित्याचें सदर कसें व्यापक करण्यांत यावें, वाङ्मयीन चर्चा कोणत्या पद्धतीने करण्यांत यावी, 'करमणुकी'मध्ये ज्याप्रमाणे हरिभाऊ आपटे हप्त्याने आपल्या कादंबऱ्या प्रसिद्ध करीत असत, त्याप्रमाणे कादंबरीचीं प्रकरणें देऊन वाचकांना ओढ कशी लावावी, लघुकथा कोणत्या प्रकारच्या असाव्या, पुस्तक-परीक्षणाचें ध्येय व धोरण काय ठेवावें, या व इतर म्हणजे साहित्यविषयक बाबतींतच हीं मतें प्रकट करण्यांत येतील. त्यांचीं मतें कोणाला पटोत वा न पटोत, एवढें खरें, की साहित्यविषयक सदर हें प्रतिष्ठित वर्तमानपत्राचें एक प्रमुख अंग मानलें गेलेलें आहे. त्या सदराचा वाचकवर्ग लहान असे, पण तो समाजांतील विचारवंत म्हणून मानला गेलेला वर्ग असे व त्याच्या मान्यतेवर एके काळीं वर्तमानपत्राचा प्रतिष्ठितपणा ठरत असे. राजकारणाच्या खालोखाल साहित्यालाच वर्तमानपत्रांत स्थान दिलें जात असे त्याचें तरी कारण हेंच होय. दिवसेंदिवस साहित्याचा प्रसार वाढत चाललेला असल्यामुळे बहुजनसमाजालाहि

आता त्यांत गोडी वाटूं लागली आहे. आणि खरोखर आश्चर्याची गोष्ट ही आहे, की आज वर्तमानपत्रांतून येणारी साहित्यविषयक चर्चा खुद्द साहित्यिक जेवढी वाचीत नसतील तेवढा खालचा वर्ग गोडीनें वाचूं लागला आहे. ही परिस्थिति लक्षांत घेऊन संपादकानें आपलें साहित्यविषयक सदर वाचकांच्या डोक्यावरून निघून जाईल इतकें उच्च स्वरूपाचें मात्र करूं नये. लघुकथांची या वाचकांना अवीट गोडी असते. तेव्हा त्यांना प्रधान स्थान देणें हें मोठा वाचकवर्ग मिळविण्याचें एक प्रभावी साधनच होय. त्याच्या जोडीला देशांतील व परदेशांतील वाङ्मयाची माहिती, प्रमुख साहित्यिकांचीं त्रोटक जीवनचरित्रें, वाङ्मयाच्या निरनिराळ्या प्रकारांची चर्चा वगैरे मजकूर सोप्या भाषेंत लिहून प्रसिद्ध करण्यांत आला तर बहुसंख्य वाचकवर्गाच्या ज्ञानांत मोलाची भर पडेल.

विशेषत: साहित्यविषयक सदराच्या बाबतींत संपादकाला एक महत्त्वाचा व मूलभूत निर्णय घ्यावा लागेल. आणि तो हा, की आपण कोणत्या वाचकवर्गासाठी हें सदर चालविणार आहों ? संपादकाला फक्त साहित्यिक वा सुसंस्कृत अशा वर्गासाठीच हें सदर चालवावयाचें असेल तर त्याचें स्वरूप अर्थातच वेगळें होईल. मग वाङ्मयीन मूल्यें आणि नवकाव्याचें समीक्षण आणि भावनात्मक समतानतेचा सिद्धान्त वगैरे सर्वसाधारण वाचकवर्गाचा जीव घाबरा करणारा मजकूर त्यांत घालावयाला हरकत नाही. पण सर्वसाधारण वाचकवर्ग डोळ्यांसमोर ठेवून संपादक हें सदर चालविणार असेल तर हा मजकूर घालणें म्हणजे जागा फुकट घालविण्यासारखें तर आहेच; पण हा मजकूर लिहिणाऱ्या लेखकांचे श्रमहि वाया दवडण्यासारखें होईल. कित्येक संपादकांच्या डोळयांसमोर लंडन टाइम्सचा साहित्यविषयक अंक असतो. अशा तऱ्हेचें किंवा या धर्तीवर साहित्यविषयक सदर चालविणारें एखादें तरी मराठींत वर्तमानपत्र असणें आवश्यक आहे यांत संशय नाही. किंवा तो आदर्श ठेवून वर्तमानपत्रांनी आपलें काव्यशास्त्रविनोदाचें सदर

चालविण्याचा प्रयत्न केला तरी वाचकांच्या ज्ञानांत व आपल्या साहित्यांत महत्त्वाची भर पडेल यांतहि शंका नाही. पण मग आपल्या लिखाणाची विशिष्ट पातळी ठेवून त्याच्याशीं विसंगत होईल असा कोणताहि साहित्य-विषयक मजकूर न छापण्याची मात्र संपादकाने खबरदारी घेतली पाहिजे. वर्तमानपत्रांतील इतर मजकुराच्या बाबतींतहि मग नाही म्हटलें तरी बंधनें येतीलच. कारण सुसंस्कृत असा वाचकवर्ग एकीकडे सौंदर्यशास्त्रावरील चर्चा आणि दुसरीकडे एखाद्या बलात्काराच्या गुन्ह्याचें केलेलें बीभत्स वर्णन सारख्याच आनंदाने कसें वाचूं शकेल ? तेव्हा संपादकाने कोणता आदर्श कितपत व्यवहारांत आणतां येईल हें पाहूनच आपल्या सदराची रचना केली पाहिजे.

इतर सदरांच्या बाबतींतहि संपादकाला तोच निर्णय घ्यावा लागेल. उदाहरणार्थ, शाळा-कॉलेजांतील विद्यार्थ्यांच्या जीवनाविषयी सदर चाल-वितांना त्यांचें स्वरूप काय असावें याबद्दल संपादकाला पेच न पडला तरच नवल ! राजकीय चळवळीमुळे मधूनमधून उठणारी खळबळ सोडली, तर सर्वसाधारण विद्यार्थ्यांना बहुशः खेळ, मुलांमुलींचें सहजीवन किंवा टवाळी यांतच जास्तींत जास्त गोडी असते. म्हणजे अभ्यासाकडे त्यांचें लक्ष नसतें असें नव्हे; पण अभ्यासाकरिता वर्तमानपत्राची कास धरण्याचें त्यांना कधींच प्रयोजन पडत नाही. तेव्हा वृत्तपत्रांच्या दृष्टीने विद्यार्थीवाचक-वर्ग मिळविण्यासाठी वरील दोनतीन गोष्टींचाच त्यांना विचार करावा लागतो. स्पष्टच सांगावयाचें तर खेळांपेक्षाहि कॉलेजांतील दैनंदिन घडामोडी, संमेलनें, विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या सफरी, विद्यार्थिनी रूढ करीत असलेल्या नव्यानव्या फॅशन्स, एखाद्या विद्यार्थ्याने विद्यार्थिनीशीं केलेला अतिप्रसंग व त्याचें त्याला मिळालेलें झणझणीत उत्तर, कांही छुपीं किंवा उघड प्रेमप्रकरणें, वर्गांतील मौजा, प्राध्यापकांच्या हालचाली आणि टवाळी या सदरांत पडणाऱ्या अनेक लहानमोठ्या गोष्टी यांना या सदरांत स्थान मिळालें तर तें

सदर अधिक लोकप्रिय होईल. आणि बहुशः इंग्रजी वर्तमानपत्रांचेंच वाचन करणाऱ्या विद्यार्थीवर्गाला निदान तेवढ्यापुरतें तरी आपल्याकडे वळवितां येईल. पण हा मार्ग स्वीकारावयाचा की गंभीरपणें विद्यार्थ्यांच्या जीवनाकडे पाहावयाचें हें संपादकाला ठरवावें लागेल.

गंभीरपणें संपादकाने पाहावयाचें ठरविलें तर विद्यार्थीवर्गाच्या जीवनाला अधिक विधायक अशी दिशा लावून देण्याचेंहि कार्य वृत्तपत्राला करतां येईल. मग विद्यार्थीवर्गाची आर्थिक व सामाजिक पाहणी करून ते ज्या सामाजिक थरांतून आलेले असतील त्या थरांतील लोकांच्या जीवनाची आपल्याला माहिती करून देतां येईल. त्या योगाने विद्यार्थ्यांना आपल्यावरील जबाबदारीची जाणीव होईल व त्या प्रमाणांत त्यांचा खर्च नियंत्रित होऊन पालकवर्गाचीहि कांही प्रमाणांत हातसोडवणूक होईल. मध्यमवर्गातून आलेल्या बहुसंख्य विद्यार्थ्यांना आपल्या कुटुंबाच्या आर्थिक परिस्थितीची योग्य कल्पना करून देण्यांत आली तर खरोखरच अनेक कुटुंबांचें कल्याण झाल्याशिवाय राहणार नाही. मग चंडोलाप्रमाणे मुक्त जीवन जगणाऱ्या विद्यार्थ्यांना आपल्या खर्चासाठी आपल्या मातापितरांना जीं टिपें गाळावीं लागत असतील त्याची थोडीशी तरी कल्पना येईल आणि आपला खर्चच नव्हे, तर आपली जीवनपद्धति व आपला शिक्षणक्रमहि ते बदलतील. त्याचप्रमाणे विधायक कार्यासाठी विद्यार्थ्यांची शक्ति उपयोगांत आणण्याच्या दृष्टीनेहि या सदरांत मजकूर घालतां येईल. सुटीच्या वेळीं किंवा फावल्या वेळांत विद्यार्थ्यांनी कोणती समाजसेवा करावी, खेडेगावांची किंवा शहरांतील वस्तींची पाहणी कशी करावी, साक्षरतेचे किंवा समाजशिक्षणाचे वर्ग कसे घ्यावे, याबद्दलच्या सूचना संपादकाला स्वतः किंवा इतर लेखकांच्यातर्फे देतां येतील. त्याच वेळीं या प्रकारचें किंवा इतर कोणत्याहि प्रकारचें शैक्षणिक वा सामाजिक कार्य करणाऱ्या विद्यार्थ्यांची वा विद्यार्थीसंघटनांची माहितीहि या सदरांत छापतां येईल. या सर्व लिखाणाचा विद्यार्थ्यांचीं मनें समाजकार्याकडे वळविण्यासाठी उपयोग होऊं शकेल.

त्यानंतर या सदरांत देशांतील आणि परदेशांतील निरनिराळीं विश्वविद्यालयें, त्यांचे शिक्षणक्रम, तेथे जाण्यासाठी लागणारी पात्रता, शिक्षणक्रमाचा व इतर आनुषंगिक खर्च यांचीहि माहिती देण्यांत आली, तर कित्येक विद्यार्थ्यांना तिचा अमूल्य उपयोग होईल. पण मग करमणुकीपेक्षा शिक्षणाकडे व मौजेपेक्षा उपयुक्त माहिती देण्याकडेच या सदराचें अधिक लक्ष राहील. कोणी म्हणेल, आम्ही दोहोंची सांगड घालूं. कांही प्रमाणांत तें शक्यहि होईल; पण प्रधान हेतु कोणता हा तरीहि प्रश्न राहीलच.

मला स्वत:ला विचारलें तर मी म्हणेन, याच सदराच्या बाबतींत काय, पण सबंध वर्तमानपत्राच्या बाबतींत बोध आणि शिक्षण यांना दुय्यम स्थान देऊन, घटकाभर मौज आणि आनंद उपभोगणें याला पहिलें स्थान दिलें तर तें समाजाला अधिक उपयुक्त होईल. निर्भेळ आनंदाची आपल्या देशांत फार वाण पडलेली आहे. त्याग, सेवा, कर्तव्य यांची हाकाटी सर्वत्रच होत आहे. प्रत्येकजण चर्चिलच्या आवेशाने रक्त, घाम आणि अश्रू गाळण्यासाठी तयारी ठेवण्याचा संदेश देत आहे. सर्वत्र उदासपणा आणि सुतकी गांभीर्य पसरलेलें आहे. समाज, देश आणि जनता यांच्या सेवेचें कंकण बांधून सारेचजण रस्त्यावर उभे आहेत. देशाची, जगाची आणि समाजाची परिस्थिति तशी आहे हें मान्यच आहे. पण म्हणून आनंदाला का सर्वस्वीं फाटा द्यावयाचा ? करमणुकीचें का वावडें मानावयाचें ? मला वाटतें, विद्यार्थिजीवनाविषयीच्या सदरांत विद्यार्थी-संघटनेचें आविरत कार्य करणाऱ्या आणि त्या कार्यामुळे श्रान्त, क्लान्त झालेल्या तरुण विद्यार्थिनीचें जीवनचरित्र जरूर छापावें. निर्धाराने ओठ घट्ट मिटून घेतलेले आहेत; डोळयांत ध्येयवादाचें तेज चमकत आहे, अलंकारविरहित असे हात भुंडे आणि उन्हाने श्यामल झालेले आहेत, कसातरी बांधलेला केसांचा अंबाडा मानेवर रुळत आहे, अशा तऱ्हेची कार्यतत्पर तरुणी पाहून विद्यार्थीवर्गाला स्फूर्ति येईल यांत काय संशय ? आणि ही दुसरी तरुण विद्यार्थिनी उन्हा-

ळयाच्या सुट्टींत खेडोपाडीं हिंडण्यासाठी बाहेर पडली आहे, तिचाहि पोशाख साधा, टापटिपीचा आहे; पण दोनदोन बांगड्या हातांत आहेत. पाठिवर केसांचा शेपटा पडलेला आहे. तिच्या मुद्रेवर सेवेचा आनंद ओसंडत आहे. तिच्या गंभीर डोळ्यांत आत्मविश्वासाचें पाणी चकाकत आहे. या तरुणी-मुळे विद्यार्थी कार्यप्रवृत्त होतील यांतहि शंका नाही. तेव्हा या दोही तरुणींना या सदरांत स्थान मिळालें तर कोणालाहि वैषम्य वाटणार नाही. पण ही तिसरीहि तरुण विद्यार्थिनी विद्यार्थीजगांत चमकत आहे आणि तिच्या दर्शनासाठी असंख्य विद्यार्थी तळमळत आहेत. तिच्या एका कटाक्षासाठी कित्येकजण आपल्या जिवाची कुरवंडी करावयाला तयार आहेत ! त्या तरुणीच्या ओठांवर स्मितहास्य खुललेलें आहे. कपाळावर आलेली केसांची बट सावरतांना सोन्याच्या दोन बिल-वरांनी सुशोभित केलेल्या तिच्या नाजुक हातांची अशी मोहक हालचाल होते म्हणून सांगूं ! आणि गोऱ्या मानेवर रुळणाऱ्या सैलशा अंबाड्यांत गुलाबाचें एक सपर्ण पुष्प खोवतांना... पण फडक्यांनी आपल्या लेखणीने चितारलेल्या आणि दलालांनी आपल्या कुंचल्याने रंगविलेल्या या जादुगारिणीचें चित्र मी काय रंगवूं ? मला एवढेंच सांगावयाचें आहे, की विद्यार्थीवर्गाचा कानोसा घेतांना या तरुणीला विसरून तर चालणार नाहीच; पण तिच्या-बरोबर गुणगुणाऱ्या हजारो विद्यार्थ्यांसह आपणहि

**शरदाचें चांदणें**
**मधुवनिं फुलला निशिगंध**

या काव्यपंक्तीहि गुणगुणल्या पाहिजेत.

— वाचकांना निरागस आनंद देणें हेंच तर आपलें ध्येय नव्हे काय ?

☆ ☆ ☆

प्रकरण ७ वें

# वाचकांचीं पत्रें

★

" टाइम्स ऑफ इंडिया " या पत्राचे पूर्वीचे एक संपादक मि. फ्रान्सिस लो यांच्याबद्दल असें सांगतात, की " वाचकांचीं पत्रें " हें सदर ते स्वतः नेहमी तयार करून देत असत. म्हणजे हीं पत्रें ते स्वतः वाचून पाहून त्यांचें संपादन ते करीत असत. त्यावरून " वाचकांचीं पत्रें " या सदराचें महत्त्व कळून येतें.

कोणी म्हणेल, काय असतें या पत्रांत ? कोणीतरी वाचक उठतो आणि आपलीं खरींखोटीं गाऱ्हाणीं वेशीवर टांगतो. त्यामुळें त्याचें नांव वर्तमानपत्रांत झळकतें खरें; पण वर्तमानपत्रांतील केवढीतरी जागा उगीचच फुकट जाते.

कांहीं अंशीं त्याचें म्हणणें खरें असतें. आपल्या वर्तमानपत्रांतील अनेक पत्रें निव्वळ जागा अडविणारीं असतात. याचें कारण असें आहे, की वाचकांच्या पत्रांचें स्वरूप काय असावें, कोणत्या हेतूनें तीं लिहिलीं जावीं, कोणतें उद्दिष्ट त्यांतून साध्य करावयाचें असतें, याबद्दल आपल्या वाचकवर्गाला नीटशी कल्पनाच नाही ! उदाहरणार्थ, कांहीं पत्रें अगदी व्यक्तिविषयक गाऱ्हाणें पुढे मांडणारीं असतात. व्यक्तीच्या गाऱ्हाण्याल

वृत्तपत्रांत स्थान नसावें असें नाही; पण हें गाऱ्हाणें वर्तमानपत्रांतून मांडण्यापूर्वी तें सोडविण्याचे अनेक मार्ग उपलब्ध असतात. त्या मार्गांचा अवलंब केल्याशिवाय एकदम वर्तमानपत्रांकडे धाव घेण्यांत काय अर्थ ?

इतर समाजविषयक गाऱ्हाण्यांच्या बाबतींतहि तेंच म्हणतां येईल. एखाद्या गाऱ्हाण्याबद्दल सरकारदरबारीं दाद लावून घ्यावयाची असेल तर अर्ज करणें, मुलाखत घेणें, शिष्टमंडळ नेणें वगैरे पुष्कळ मार्ग अस्तित्वांत असतात. वर्तमानपत्रांतून गाऱ्हाणें मांडणें हा एक प्रकारें निर्वाणीचाच उपाय होय. पण आजकाल असें झालें आहे, की आधी वर्तमानपत्रांत प्रसिद्धि आणि नंतर सरकारकडे फिर्याद, असा तक्रारीचा उलटा क्रम लागूं लागला आहे. पुष्कळ वेळां वर्तमानपत्रांतील प्रसिद्धीमुळे कांही तक्रारी सरकारच्या वा अधिकाऱ्यांच्या कानीं जातात. आणि मग साहजिकच इभ्रतीचा प्रश्न आड येऊन न्याय मिळणेंहि दुरापास्त होतें. त्यामुळे खरें म्हटलें तर तक्रार करणाऱ्याचेंच नुकसान होतें. आणि गाऱ्हाणें वेशीवर टांगून न्याय मिळविण्यासाठी प्रयत्न करणें हें जें वर्तमानपत्राचें उद्दिष्ट असतें तेंहि साध्य होत नाही.

वर्तमानपत्रांतील वाचकांच्या पत्रांना इंग्लंडसारख्या देशांत केवढें महत्त्वाचें स्थान आहे हें तेथील सर्वप्रमुख वर्तमानपत्रांत प्रसिद्ध होणाऱ्या पत्रांवरून दिसून येतें. आपल्याकडे लेखांना जें महत्त्व असतें तें व तितकेंच महत्त्व तेथे पत्रांना असतें. हीं पत्रें सार्वजनिक जिव्हाळ्याच्या अनेक प्रश्नांवर जशीं लिहिलीं जातात, तशींच सरकारी धोरणाबद्दलहि लिहिण्यांत येतात. आणि लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही आहे, की प्रमुख वर्तमानपत्रांत प्रसिद्ध होणाऱ्या पत्रांची सरकार नेहमी दखल घेत असतें. " टाइम्स " किंवा " मँचेस्टर गार्डियन " या पत्रांत आपल्या पत्राला प्रसिद्धि मिळणें हें म्हणूनच मानाचें मानलें जातें. ब्रिटिश राजकारणांत मुरलेले मुत्सद्दीसुद्धा पुष्कळ वेळां पत्ररूपाने आपले विचार प्रकट करतात. एक काळ असा

होता, की ब्रिटिश वर्तमानपत्रांत हिंदुस्थानच्या चळवळींबद्दल किंवा आकांक्षां-बद्दल क्वचितच उल्लेख होत असे. त्या वेळीं हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याच्या मागणीला पाठिंबा देणारें किंवा तिला कसून विरोध करणारें एखादें जरी पत्र प्रसिद्ध झालें तरी त्याचा केवढातरी गाजावाजा होत असे. मग त्या पत्राचा सारांश रूटरमार्फत साऱ्या जगामध्ये पाठविला जात असे. त्या पत्राच्या अनुरोधाने कॉमन्स सभेंत प्रश्न विचारले जात असत; आणि एखाद्या सरकारी मंत्र्याला हिंदुस्थानविषयक धोरणाचा प्रसंगीं खुलासाहि करावा लागत असे. आपल्या देशांतील जाणत्या लोकांनाहि आश्चर्य वाटावयाचें, की 'टाइम्स'मध्ये एखादें पत्र प्रसिद्ध होतें काय आणि त्याबद्दल इतका ऊहापोह तरी काय होतो? आपल्याकडे प्रसिद्धीचें मोजमाप किती स्तंभ मजकूर छापून आला यावर केलें जातें. त्यामुळे बोटभर पत्रांतून मिळणारी प्रसिद्धि ही आपल्याला अपुरीच नव्हे, तर हास्यास्पदहि वाटल्यावांचून राहात नसे. पण ब्रिटिश वर्तमानपत्रांतील प्रसिद्धीचें मोजमापहि वेगळें आणि त्या वर्तमानपत्रांत प्रसिद्ध होणाऱ्या पत्रांचें महत्त्वहि अनन्यसाधारण. त्यामुळे एखादे सोरेन्सन किंवा एखादे फेनर ब्रॉकवे लहानशा पत्राच्या साहाय्याने हिंदुस्थानबद्दल जेवढें कुतूहल ब्रिटनमध्ये निर्माण करूं शकत असत, तेवढें प्रत्यक्ष आपल्या विराट् चळवळींनीहि निर्माण झालें नसेल!

वाचकांच्या पत्राला सरकारदरबारीं व समाजामध्येहि हा मान प्राप्त व्हावयाला पाहिजे. तो कसा प्राप्त करून द्यावयाचा? पहिली गोष्ट ही, की वाचकांचीं पत्रें छापणें म्हणजे पोस्टमन जसा पत्रांचा बटवडा करतो तशीं वाचकांकडून आलेलीं पत्रें संपादकीय थैलींतून काढून त्यांना प्रसिद्धि देणें नव्हे. इतकें सोपें हें काम असतें, तर 'टाइम्स ऑफ इंडिया'च्या संपादकाला खुद्द त्यांत लक्ष घालण्याचें कारण नव्हतें. या पत्रांच्या प्रसिद्धी-मागे कांहीतरी धोरण असलें पाहिजे. तें धोरण वर म्हटल्याप्रमाणे कांही गाऱ्हाणीं वेशीवर टांगून त्यांना न्याय मिळवून देणें हें होऊं शकेल, किंवा

राजकीय धोरणाविषयी चर्चा करून वाचकांचें मत अजमाविण्याचाहि या पत्रांमार्फत प्रयत्न करतां येईल. किंवा सार्वजनिक संस्थांमधील अंदाधुंदी किंवा अपुरेपणा यांबद्दलच्या असंतोषाला वाचा फोडून त्या संस्थांची सुधारणा करणें हेंहि उद्दिष्ट होऊं शकेल. किंवा व्यक्तिगत अडचणींचें दिग्दर्शन करून त्या सोडविण्यासाठी माहितगाराचा सल्ला मिळवून देण्याचेंहि कार्य यांतून साध्य होऊं शकेल. तेव्हा वाचकांच्या पत्रव्यवहाराकडे पाहतांना विशिष्ट पत्राचा हेतु काय आहे व पत्रलेखकाला कोणतें उद्दिष्ट साध्य करून घ्यावयाचें आहे याचा संपादकाला बारकाईने विचार केला पाहिजे; आणि त्या दृष्टीने पत्राचें योग्य रीतीने संपादन केलें पाहिजे.

म्हणजे असें, की एखादें पत्र अगदीच व्यक्तिगत स्वरूपाचें आहे आणि त्यांत गाऱ्हाणें असलें तर वर्तमानपत्रांतील प्रसिद्धीमुळे तें दूर होण्यासारखें नाही अशा पत्राला प्रसिद्धि देऊन वर्तमानपत्राची जागा अडविण्यांत काय अर्थ आहे ? उदाहरणार्थ, एका तरुणीवर एकाचें प्रेम बसलें आहे. पण ती त्याला झिडकारून टाकते. हा तरुण निराशेने संपादकाला लिहितो, "मीं आता काय करावें ?" आता संपादक त्याला काय सल्ला देणार ? संपादकाला तेवढा वेळ असला तर त्याने फार तर त्या तरुणीचें मन वळविण्याचा प्रयत्न करावा. पण त्या प्रयत्नाचा वर्तमानपत्राशीं अर्थाअर्थी कांही संबंध नाही.

कांही वर्तमानपत्रांनी मात्र अलीकडे या अशा व्यक्तिगत प्रश्नांच्या बाबतींत सल्ला देण्याची पद्धति रूढ केली आहे. खरें सांगावयाचें तर 'समाजस्वास्थ्य' या मासिकांत प्रथम 'शारदा' या नांवाने सल्ला देण्याची प्रथा सुरू झाली. बहुशः संततीनियमन किंवा अशाच शास्त्रीय प्रश्नांच्या बाबतींत हा सल्ला देण्यांत येत असे. पण आता कांही वर्तमानपत्रांनी तें एक आपलें वैशिष्ट्य केलें आहे. अर्थात् पत्रापेक्षा त्या पत्राच्या उत्तरालाच यांत अधिक महत्त्व असतें. त्या दृष्टीने तें एक स्वतंत्र संपादकीय सदरच मानावें

लागेल. वाचकांचीं पत्रें छापण्याचा हेतु अगदीच निराळा असल्यामुळे व्यक्तिगत स्वरूपाच्या या पत्रांना त्यांत स्थान मिळूं शकणार नाही.

परंतु कांही पत्रांत व्यक्तिगत गाऱ्हाण्यांची नोंद असली तरी प्रसिद्धीमुळे ती दूर होण्याचा संभव असतो. उदाहरणार्थ, एखाद्या निवृत्त शाळामास्तराचें पेन्शन मिळावयाला विलंब लागला तर अखेरचा उपाय म्हणून तो वर्तमानपत्राकडे धाव घेतो. किंवा कांही व्यक्तिगत प्रश्न सार्वजानिक महत्त्वाचेहि असूं शकतात. उदाहरणार्थ, एखाद्या कामगार युनियनचे कार्यकर्ते असलेल्या कामगारांना तेवढ्याच कारणावरून कामावरून कमी करण्यांत येतें. आणि सार्वजनिक हिताच्या दृष्टीने त्यांच्या गाऱ्हाण्यांना वाचा फोडणें आवश्यक असतें. या पत्रांना आपल्या वर्तमानपत्रांत स्थान देण्यापूर्वी वर म्हटल्याप्रमाणे या पत्रलेखकांनी संबंधित व्यक्तींकडे रीतसर अर्ज केले आहेत किंवा नाहीत याची संपादकाने खात्री करून घेणें इष्ट आहे. ती खात्री करून घेतांना या गाऱ्हाण्यांत सत्य आहे किंवा नाही याचीहि संपादकाला माहिती होईल. आपल्या पत्रांतील कोणताहि मजकूर असत्य किंवा बेजबाबदारपणाचा नसावा याची संपादकाने जी खबरदारी घेतली पाहिजे ती वाचकांच्या पत्रांनाहि लागू आहे. तो मजकूर खोटा निघाला तर संपादकाला खुलासा छापतां येतो हें खरें आहे; पण असे खुलासे छापण्याची वेळ येणें ही वर्तमानपत्राला कमीपणा आणणारीच गोष्ट आहे.

आता हें गाऱ्हाणें प्रसिद्ध केल्याबरोबर त्याचे दोन परिणाम होतील. एक, याच विषयावरील आणखी कांही गाऱ्हाणीं पुढे येतील व समाजांतील अन्यायाला अनायासेंच तोंड फोडल्यासारखें होईल. दुसरें, संबंधित अधिकारी वा संस्था या गाऱ्हाण्याची नोंद घेतील व एक तर त्याचा स्पष्ट इन्कार करतील, किंवा आपली बाजू पुढे मांडतील, किंवा या प्रश्नांत लक्ष घालण्याचें आश्वासन देतील. यांपैकी कोणतीहि गोष्ट घडून आली तरी संपादकाचा या प्रश्नाच्या बाबतींत स्वतःचा जो कांही निर्णय झाला असेल त्याच्या अनुरो-

धाने त्याला हा प्रश्न मिटवून तरी टाकतां येईल किंवा पुढे तरी रेटतां येईल. मग तो तडीस लागावयाचा असो किंवा नसो. हा प्रश्न मिटवून टाकावयाचा असेल तर त्या विषयावरील सारा पत्रव्यवहार त्यापुढे बंद होईल. पण हा प्रश्न पुढे रेटावयाचा असेल तर संपादक अग्रलेख किंवा स्फुट लेख लिहून त्या प्रश्नाची संपादकीय नोंद घेईल. साहजिकच त्यामुळे या प्रश्नाला सामाजिक महत्त्व प्राप्त होईल व त्यांतून विविध प्रकारचा पत्रव्यवहारहि निष्पन्न होईल.

सार्वजनिक स्वरूपाच्या गाऱ्हाण्यांबद्दलहि हेंच म्हणतां येईल. वाचकांच्या पत्रव्यवहाराच्या साहाय्याने संपादक समाजाशीं संबंध ठेवतो व त्याला उपयुक्त होईल अशी कामगिरीहि करतो. संपादकाच्या मेजावर पत्रांचे जे भारेच्या भारे येऊन पडतात त्यांत कोणत्या विषयांचा समावेश होत नाही ? मागे एकदा सोलापूर जिल्ह्यांत उंदरांचा असा उपद्रव सुरू झाला, की रोजच्या रोज याचबद्दल आमच्या वर्तमानपत्रांत पत्रें येऊं लागलीं. त्यांचें संपादन तरी कुठवर करणार ? सरतेशेवटीं एक संपादक वैतागून म्हणाला, "या उंदरांचा शेतकऱ्यांना होत नसेल इतका या पत्रांचा आम्हांला उपद्रव होत आहे !"

दुसरा हसतहसत म्हणाला, "आणि सगळे सरकारला शिव्या देत आहेत ! पण उंदीर मातले तर सरकार काय करणार त्याला ?"

पहिल्याने वैतागाने म्हटलें, "मी आता एक पत्र लिहून सूचना करतों, की सरकारने मांजरांची एक फौज निर्माण करावी म्हणून."

पत्रव्यवहाराचें सदर पाहणाऱ्या संपादकाच्या टेबलापाशी तुम्ही बसा, म्हणजे तेथे संपादकांमध्ये आपापसांत चाललेलें बोलणें ऐकून या पत्रव्यवहाराच्या विविधतेची तुम्हांला कांहीशी कल्पना येईल. कोणाला संततिनियमन हवें असतें, कोणाचा त्याला सक्त विरोध असतो. एखाद्याचा विरोध तात्त्विक असतो; दुसऱ्याला संततिनियमनाचीं साधनें वापरणें व्यवहार्य वाटत नाही. तिसरा म्हणतो, "संयम हाच खरा संततिनियमनाचा मार्ग होय."

“ अहो, हें पत्र पाहिलंत का ? ” एक संपादक म्हणतो, “ आचार्य धर्माधिकारी यांनी परवा म्हणे लग्नघरीं जाऊन एका जोडप्याला आशीर्वाद दिला– ‘ तुमचं वैवाहिक जीवन सुखाचं जावो. पण तुम्हांला मुलं न होवोत.’ त्यावर टीका आहे या पत्रांत.”

“ वा ! वा ! बहुधा आचार्यांनी ‘कामे च नातिचरामि ’ या शपथेलाहि विरोध केला असेल ! ” दुसरा संपादक हेटाळणीने उद्गारतो.

“ पत्रलेखक तेंच म्हणतो आहे. देऊंया आपण तें. हा वाद चांगला रंगेल. ”

हा वाद चांगला रंगतो. पण त्याच वेळीं एक प्राथमिक शिक्षक दारिद्र्याला कंटाळून आत्महत्या करतो, त्याला अनुसरून येणारीं पत्रें जितकीं हृदयस्पर्शी असतात तितकाच क्षोभहि त्यांतून प्रकट होत असतो. शाळामास्तरांचें दारिद्र्य आणि दैन्य यांचीं वर्णनें तर त्यांत असतातच; पण त्यांची उपेक्षा करणाऱ्या सरकारवर व समाजावरहि त्यांत कोरडे ओढलेले असतात. संपादकाच्या दृष्टीने हा अर्थातच अग्रलेखाचा विषय असतो. पण त्या अग्रलेखांतून ‘ आत्महत्या करणें हें भ्याडपणाचें आहे काय ? ’ हा एक नवीनच प्रश्न निघतो आणि मग वाचकांच्या परस्परविरोधी पत्रांचा संपादकाच्या टेबलावर सडा पडतो. असे विषयांतून विषय निघत असतात व त्यांतूनच संपादकाला जनमनाचा कानोसा घेतां येतो.

पत्रव्यवहारांतून अनेक प्रकारच्या चर्चाहि रंगत असतात. राजकीय धोरणाबद्दलच्या चर्चेला तर कधीच अंत नसतो. भेंड्या लावाव्या तशा एकेका शब्दांतून मोठमोठ्या चर्चा निघत असतात आणि वाचकवर्ग त्या चर्चेबरोबर वाहत जातो व पुन्हा आपल्या मताप्रमाणे आणि कुवतीप्रमाणे त्या प्रवाहाला चालना तरी देत असतो किंवा निराळें वळण तरी लावीत असतो. उदाहरणार्थ, “ लोकसत्ता यशस्वी होणें शक्य आहे काय ? ” या विषयावर एखादा वाचक एक लहानसेंच पत्र लिहितो. संपादक नेहमीच्या

पद्धतीप्रमाणे एखादें गंभीर पत्र हवें म्हणून तें छापून टाकतो. पण या पत्राला पुढे किती फाटे फुटावयाचे असतात! मग लोकसत्ता यशस्वी होणें शक्य आहे आणि नाही यावर दोन तट पडतात. शक्य असल्यास कां? आणि शक्य नसल्यास कां नाही? याचीं लहानमोठीं अनेक कारणें नंतर विशद करण्यांत येतात. एखादा चिकित्सक वाचक त्याच वेळीं लोकसत्ता म्हणजे काय हा मूलभूत प्रश्न उभा करतो. दुसरा लगेंच लोकसत्ता म्हणजे काय नाही याची चर्चा करतो. तिसरा औपचारिक लोकसत्ता व खरी लोकसत्ता असा नाजुक भेद काढतो. चवथा खरी लोकसत्ता म्हणजे सोव्हियट राजवट होय असा निष्कर्ष काढतो. मग लोकसत्ता आणि कम्युनिझम्, लोकसत्ता आणि फॅसिझम्, पार्लमेंटरी पद्धतीची लोकशाही आणि सोव्हियट पद्धतीची लोकशाही यांच्यामधील साम्याचें वा विरोधाचें, त्यांच्या इष्टानिष्टतेचें एकच चर्चाकुंड पेटतें व अखेरीस तें लहानसें पत्र छापणाऱ्या संपादकाला आपण कोठून या ब्रह्मघोटाळयांत सापडलों असें होऊन जातें!

मधूनमधून वाचकांच्या पत्रव्यवहाराच्या सदरांत आपल्याला जी एक संपादकीय टीप आढळते-- की "यापुढे या विषयावरील चर्चा बंद करण्यांत आली आहे" त्याचें तरी कारण हेंच होय. पण बहुश: टीप एखाद्या गंभीर विषयावरील पत्रव्यवहारांत आढळून येत नाही. कधीकधीं "शेपटा हा अधिक कलापूर्ण असतो की अंबाडा?" या चर्चेला तोंड लागतें आणि मग स्त्री आणि पुरुष पत्रलेखकांना आवरणें संपादकाच्या आवाक्याबाहेरचें होतें! पत्रलेखक हे रसिक खरे. असा कांही विषय निघाला कीं त्यांच्या लेखणींत असें लालित्य येतें, त्यांची कल्पनाशक्ति इतकी स्वैरसंचार करूं लागते आणि आपली भूमिका मांडतांना त्यांच्यामध्ये इतका आवेश येतो, की संपादक क्षणभर स्तिमित होऊन म्हणतो, "आज समाजापुढील सर्वांत महत्त्वाचा प्रश्न हाच आहे का?"

हीं पत्रें संपादित करणें ही एक आनंदाची गोष्ट असते यांत मात्र शंका नाही. पण संपादकामध्ये रसिकता हवी. एखादा पत्रलेखक भवभूति आणि

कालिदासाचा श्लोक देऊन अंबाड्याची महति गातांना म्हणतो, " अरेरे, आपल्या नागर संस्कृतीचा लोकांना इतका विसर पडावा का ? " दुसऱ्या पत्रलेखकाला माधव ज्यूलियनांची कविता आठवते आणि " जणु चिन्तांचा समूह सारुनि " अंबाडा बांधणाऱ्या तरुणीचें तो चित्र रंगवितो. त्याच्या उलट तिसऱ्या पत्रलेखकाच्या प्रतिभेला पाठीवर वळवळणाऱ्या शेपट्याची हालचाल नागिणीच्या हालचालीइतकी मोहक वाटते. चवथा नवीनच मुद्दा काढून म्हणतो, " मुक्त केशकलाप हाच या दोहोंपेक्षा अधिक मनोहारी दिसत नाही काय ? " विचाऱ्या स्त्रिया क्वचितच या चर्चेत भाग घेतात. पण एखादी तरुण पत्रलेखिका मध्येच उसळून म्हणते, " आम्हीं शेपटा घालावा की अंबाडा बांधावा याची पुरुषांना उठाठेव कशाला ? " मग पत्रलेखकांच्या विचाराला नवीनच चालना मिळते आणि त्यानंतर पुरुषांची ही उठाठेव नव्हे, तर स्त्रियांच्या प्रसाधनाची आणि वेशभूषेची चिकित्सा पुरुषच अधिक करूं शकतात, अशा आशयाचीं किंवा त्याविरुद्ध अनेक पत्रें येऊं लागतात. या वेळीं मात्र संपादकाला वाटूं लागतें, की हा विषय आवरला नाही तर या चर्चेला स्त्री-पुरुष-युद्धाचें स्वरूप येईल; आणि म्हणून तो या विषया-वरील चर्चा बंद करून टाकतो.

वाचकांचा पत्रव्यवहार कधी समाजहिताला चालना देणारा, तर कधी तत्त्वचर्चात्मक, तर कधी नुसताच मनोरंजक कसा होऊं शकतो याची यावरून कल्पना करतां येईल. संपादक आपल्या धोरणानुसार आणि प्रवृत्तींनुसार त्यांचें संपादन करीत असतो. या संपादनाचें स्वरूप प्रसिद्धीसाठी पत्रांची निवड करणें हें तर आहेच; पण पत्रव्यवहार मांडण्याची संपादकाने एक योजनाहि आखली पाहिजे. या योजनेप्रमाणे पत्रांची वर्गवारी करणें हें त्याचें पहिलें कार्य. प्रसिद्ध होणाऱ्या पत्रव्यवहारांत दर दिवशीं विविधता असली पाहिजे. म्हणजे सर्व पत्रें एकाच विषयावरील असूं नयेत. कांहीं गाऱ्हा-ण्यांचीं, कांही तत्त्वचर्चात्मक, कांही मनोरंजक, कांही संशोधनात्मक, कांही

अनुभव व्यक्त करणारीं अशीं हरएक प्रकारचीं पत्रें वर्गवारीने लावून ठेवण्यांत यावींत आणि तीं क्रमाने प्रसिद्ध करण्यांत यावीं. त्यामुळे वाचक प्रत्येक पत्र उत्साहाने वाचील आणि सबंध सदर त्याला माहिती देणारें व मनोरंजक वाटेल.

पण आपल्या दृष्टीने महत्त्वाच्या वाटणाऱ्या पत्रलेखकांशीं प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित करण्याचें, किंवा पत्रांतील विषयाबद्दल अधिक माहिती गोळा करण्याचें, किंवा त्यांत करण्यांत आलेल्या सूचनांची अंमलबजावणी करता येईल किंवा काय हें पाहण्याचें कार्यहि संपादकाने करावयाला पाहिजे. समाज व त्याचे घटक असलेल्या व्यक्ति, सरकार व प्रजा, संस्था व तिचे सभासद यांमधील दुवा म्हणून वर्तमानपत्राला स्थान मिळवावयाचें असेल तर समाजाशीं संपादकाचे प्रत्यक्ष व जिव्हाळ्याचे संबंध निर्माण होणें आवश्यक आहे. खरें म्हटलें तर वाचकवर्ग संपादकाकडे आपला एक मार्गदर्शक, स्नेही आणि तत्त्वदर्शक या नात्यानेच पाहतो. मग संपादकाने वाचकाला तशाच प्रकारचा प्रतिसाद देणें आवश्यक नाही काय ? गांधीजींनी ‘ हरिजन ’ किंवा ‘ यंग इंडिया ’ या वृत्तपत्रांत प्रसिद्ध होणाऱ्या पत्रांमार्फत वाचकांशींच नव्हे, तर समाजाशींहि संबंध जोडले. गांधीजींच्या थोर व्यक्तित्वामुळे या पत्रांना महत्त्व प्राप्त झालें व वाचकहि त्यांच्याकडे आकर्षित झाले हें खरें आहे. पण गांधीजींच्याइतकें आपल्या पत्रांना महत्त्व मिळेल अशी कोणताच संपादक अपेक्षा करीत नसेल. तथापि त्याच्या परीने तो वाचक आकर्षित करीलच. त्याने वाचकांना प्रत्यक्षपणें पटवून दिलें पाहिजे तें हें, की येथून आपल्या गाऱ्हाण्यांना वाचा फोडली जाईल, येथेच आपल्याला योग्य तो सल्ला मिळेल, याच संपादकाकडून आपल्या शंका-कुशंकांचें निवारण होईल, याच्याच साहाय्याने आपल्याला तत्त्व-बोध होऊं शकेल. अडीअडचणीच्या वेळीं वाचकवर्गाला पत्राच्या कचेरींत धाव घ्यावीशी वाटावी असा आपलेपणा संपादकाने वाचकवर्गाच्या

७५९६०

अंतःकरणांत निर्माण केला पाहिजे. निरनिराळ्या पक्षांचीं वर्तमानपत्रें बऱ्याच प्रमाणांत हें कार्य करीत असतात. त्याची प्रेरणा पक्षविशिष्ट दृष्टिकोन ही असेल; पण पक्षनिरपेक्ष समाजहिताचा दृष्टिकोन याहीपेक्षा प्रबळ अशी प्रेरक-शक्ति होऊं शकणार नाही काय ? कोणीं सांगावें ? एके दिवशीं संध्याकाळीं एखादी मिसेस ड्रेफस अनपेक्षितपणें आपल्या कचेरींत येईल आणि आपल्या निरपराध पतीवर झालेल्या अन्यायाची सारी कहाणी आपल्याला अश्रुभरित नेत्रांनी सांगेल. अशा अन्यायाला वाचा फोडणें हेंच तर वर्तमानपत्राचें सर्वश्रेष्ठ कार्य नाही काय ? मिसेस ड्रेफसने सांगितलेली करुण कहाणी ऐकून सात्विक संतापाने क्षुब्ध झालेल्या एमिल झोलाने वर्तमानपत्राचा आश्रय घेऊन " I Accuse ! " ( 'माझें आव्हान आहे' ) या इतिहास-प्रसिद्ध झालेल्या मथळ्याखाली फ्रेंच सरकारवर, फ्रेंच लष्करी अधिकाऱ्यांवर उघडउघड आरोप केले आणि एका निरपराध जिवाच्या बचावासाठी अधिष्ठित सत्तेला आव्हान दिलें. एमिल झोलाने जी उज्ज्वल परंपरा निर्माण केली त्या परंपरेचा प्रत्येक संपादक हा वारसदार होय. एखाद्या ड्रेफसला जिवंतपणींच्या यमयातनांतून सोडविण्याचें भाग्य कदाचित् आपल्याला मिळणार नाही किंवा त्यासाठी करावा लागणारा आत्मत्याग करण्याइतकें धैर्यहि कदाचित् आपल्या ठायीं नसेल. पण आपलीं दारें आपण समाजाला सदैव उघडीं ठेवलीं आणि समाजाच्या सुखाबरोबर आनंदून जाणें, दुःखाशीं सहभागी होणें, समाजांतील सुष्टांचा दुवा घेणें आणि दुष्टांना दहशत बसवणें, हें कार्य जर आपण अखंडपणें करीत राहिलों, तर आपल्या परीनें, आपल्या कुवतीप्रमाणे हा वारसा आपण जतन करूं. मोगल बादशहा जहांगीर याने एक घंटा आपल्या राजवाड्यांत बसविली होती. कोणालाहि, कोणत्याहि वेळीं ती घंटा वाजवून बादशहाकडे दाद-फिर्याद करतां येत असे, इन्साफ मागतां येत असे. आपली कचेरी ही इन्साफ मागण्याची जागा होण्याइतकी लोकप्रिय व्हावी, आपण स्वतः इतकें समाजाभिमुख व्हावें हीच खरोखर संपादकाची अंतिम महत्त्वाकांक्षा असली पाहिजे.

★ ★ ★

प्रकरण ८ वें

# धक्के आणि बुक्के

★

दैनिक वृत्तपत्रांत विनोदाला स्थान असावें किंवा नाही हा एक नेहमी वादाचा विषय असतो. कांही लोकांचें असें मत आहे, की विनोदामुळे दैनिक वृत्तपत्रांतील गांभीर्याचें वातावरण नाहीसें होईल व तसें होणें अनिष्ट आहे. पण या बाबतींत असेंहि म्हणतां येईल, की वृत्तपत्राला विनोदाची जोड नसेल तर अति गांभीर्यामुळे वाचकाच्या मनावर अतिशय ताण पडण्याचा संभव आहे व तीहि गोष्ट अनिष्टच मानावी लागेल. हा वाद नुसत्या तात्त्विक चर्चेने मिटणार नाही. प्रत्यक्षपणें वाचकांच्या काय भावना आहेत हें पाहिलें तर मात्र त्यांतून कांहीतरी तोड निघूं शकेल. आपल्याकडे दुर्दैवाने निर्मळ, निरागस विनोद ज्यांतून निर्माण होईल असें लिखाण प्रसिद्ध करणारीं फारच थोडीं वृत्तपत्रें आहेत. कांही जण विनोद करतात तो पुष्कळ वेळां विषारी असतो. अशा तऱ्हेचा विनोद करण्यापेक्षा तो न केलेलाच बरा ! पण ज्या विनोदामुळे खळखळून हसूं येईल आणि ज्याचा उपहास केला गेला असेल त्याच्याहि मुद्रेवर ज्यामुळे स्मिताची रेषा उमटेल असें विनोदी लिखाण प्रसिद्ध होत असेल तर त्याबद्दलच्या समाजाच्या प्रतिक्रिया पाहणें मनोरंजक होईल व त्यावरून दैनिक वृत्तपत्रांत

असें एखादें विनोद निर्माण करणारें सदर असावें किंवा नाही याबद्दलहि आपल्याला मत बनवितां येईल.

उदाहरणार्थ, " नवशक्ति " या पत्रांतील " धक्के आणि बुक्के " हें सदर पाहा. या सदराचा हेतु उघडउघड गंमत करणें, टिंगल करणें एवढाच असतो. हा हेतु नेहमीच सिद्धीस जात असेल असें नव्हे. कित्येक वेळां त्यांत सहज धक्का देण्यापेक्षा बोचकारे काढण्याचीहि वृत्ति दिसून येत असेल. पण एकंदरीने पाहतां वाचकांना हे धक्केबुक्के आवडतात हें खरें. सकाळच्या प्रहरीं वर्तमानपत्र हातीं पडल्यानंतर कचेरीला जाण्यापूर्वी जो कांही थोडासा वेळ मिळतो त्यांत वाचकाला गंभीर विषयाचें वाचन करायाला कितीसा वेळ मिळणार ? तो एकदा मुख्य मथळे डोळ्यांखाली घालून जगाची परिस्थिति काय आहे तें अजमावतो आणि मग धक्क्याबुक्क्यांकडे वळतो. याचीं कारणें दोन. एक तर हें सदर छोटेंसें असतें; आणि दुसरें, त्या वाचनाचा डोक्याला शीण पडण्यासारखा नसतो. उलट मनमोकळेपणें हसून मनाला थोडीशी प्रसन्नता मिळावयाचीहि त्या वाचनांत शक्यता असते.

पुरुषवर्ग कचेरींत गेल्यानंतर अर्थातच सुगृहिणींचें घरांत राज्य होतें. त्या बिचाऱ्या कामामुळे इतक्या शिणलेल्या असतात, की जेवण उरकल्याबरोबर हातीं वर्तमानपत्र घेऊन तें गंभीरपणें वाचीत बसण्याची त्यांची तयारी असणें शक्यच नसतें. म्हणून तोंडांत सुपारी टाकून ती चघळतचघळत त्या वर्तमानपत्र हातीं घेतात आणि मग प्रथम त्यांचें लक्ष वेधतें तें " धक्के आणि बुक्के " या सदराकडे. त्या सदराचें आणखी एक वैशिष्ट्य सांगतां येईल तें हें, की तें वाचून दाखवून चारचौघींनाहि एकाच वेळीं त्यांतील विनोदाचा आस्वाद घेतां येतो. दुसऱ्या कोणत्याहि लिखाणाचा असा सामुदायिक रीतीने आस्वाद घेतां येत नाही.

तात्पर्य असें, की अशा तऱ्हेच्या विनोदाला दैनिक वृत्तपत्रांत वाव आहे आणि दैनिकाचें तें एक मोठेंच आकर्षणहि होऊं शकतें. मग आपल्या

वृत्तपत्रांत त्याचा विशेष उपयोग कां होत नाही ? स्पष्टच सांगावयाचें तर त्याचें कारण असें, की विनोदनिर्मिति ही एक अत्यंत अवघड गोष्ट आहे. आणि दररोज न चुकतां त्याची चमचमीत मेजवानी देणें हें तर त्याहीपेक्षा दुर्मिळ आहे. लोकांना खळखळून हसावयाला लावणें, त्यांना गुदगुल्या होतील असें लिखाण लिहिणें ही एक जन्मजात देणगी आहे. संपादकाची मनःप्रवृत्तीच तशी असल्याशिवाय अशा तऱ्हेचा विनोद निर्माण व्हावयाचा नाही. ओढूनताणून विनोद निर्माण करण्याचा प्रयत्न करणें हें तर अगदींच अनिष्ट आहे. कारण त्यामुळे वाचकांचें मनरंजन होणें तर दूरच राहिलें; उलट त्यांच्या मनांत शिसारी मात्र निर्माण होईल. ही गोष्ट जाणूनच बहुधा बरेच संपादक यापासून परावृत्त होत असावेत.

दुसरी गोष्ट अशी, की वाचकांना ज्या प्रकारचा विनोद हवा असतो तो देणें हें कित्येक संपादकांना कमीपणाचेंहि वाटणें शक्य आहे. हा विनोद टिंगल करण्याच्या स्वरूपाचा असतो हें कबूल करणें तर भागच आहे. विनोद निर्माण करणाऱ्या एका सदराला 'नवशक्ती'ने "धक्के आणि बुक्के" हें नांव दिलें यावरूनसुद्धा हें समजून येण्यासारखें आहे. हे धक्के कोणाला बसतील व त्यांचें स्वरूप कशा प्रकारचें असेल याचा नियम नाही. एकदा टिंगल करावयाची म्हटली म्हणजे कितीहि थोर व्यक्ति असली तरी तिचासुद्धा उपहास करणें कठीण नाही आणि तो मोह आवरतांहि येत नाही. कोणताहि गंभीर विषय असला तरी त्यालाहि हास्यास्पद स्वरूप देतां येणें शक्य असतें. कित्येक संपादक म्हणूनहि या प्रकारचें विनोदी सदर देण्याचें टाळीत असतील.

तिसरी गोष्ट अशी, की आपण एखाद्याची टिंगल सुरू केली म्हणजे आपल्यावरहि तोच प्रयोग होण्याचा संभव असतो. आणि तसें झालें तर आपला स्वतःचा उपहास सहन करण्याइतकी विनोदबुद्धि फारच थोड्या लोकांच्या जवळ असते. कित्येक संपादक दुसऱ्यावर अत्यंत कडक आणि

कठोर टीका करतात, दुसऱ्याचा उपहास करतांना कोणतीहि मर्यादा ठेवीत नाहीत; पण स्वतःवर ती पाळी आल्यानंतर मात्र त्यांचा धीर सुटतो, त्यांच्या संतापाचा पारा चढतो आणि त्यांच्यामध्ये साधारण विवेकसुद्धा राहात नाही. विनोद म्हटला की लेखकाने स्वतःची टवाळी स्वतःच करण्याची तयारी ठेवली पाहिजे आणि दुसऱ्याने ती केली तर उदारबुद्धीनेच तिचा स्वीकार केला पाहिजे. स्वतःलाच जो हसूं शकतो त्यालाच दुसऱ्याला हसण्याचा अधिकार आहे. ज्यांच्यामध्ये ही वृत्ति नसेल त्यांनी विनोदापासून दूर राहणेंच बरें. दुसऱ्याने केलेली टवाळी सहन करण्याची तयारी नसल्यामुळेंहि कांही संपादक या प्रकारच्या सदरापासून दूर राहात असतील.

पण ज्यांच्यामध्ये भरपूर विनोदबुद्धि आहे अशा संपादकांनी मात्र अशा प्रकारचें सदर दैनिकांत जरूर असूं द्यावें. देवमूर्तींचे शाडूचे पाय कधीमधी उघड झाले तर त्यांत काय वाईट आहे ? विनोदाच्या साहाय्याने तें करतां येतें आणि त्या योगाने अंधश्रद्धाहि कमी होणें शक्य आहे. गांधीजी हे थोर राजकारणी पुरुष व एका नव्या तत्त्वज्ञानाचे पाईक होते हें खरें आहे. पण म्हणून सर्वच विषयांत ते तज्ज्ञ होते असें म्हणून कसें चालेल ? वैद्यकीय विषयांवरहि ते तज्ञाप्रमाणे बोलूं लागले तर कोण ऐकून घेईल ? अशा वेळीं त्यांनी व्यक्त केलेल्या मतांवर विनोदाचें टीकास्त्र न सोडावयाचें तर काय करावयाचें ? त्यामुळे त्यांच्या अंधभक्तांना पावित्र्यभंग केल्यासारखें वाटेल हें खरें आहे. पण सर्वसाधारण वाचकवर्ग खुमासदारपणें केलेल्या या विनोदाचा आस्वाद चांगल्या रीतीने घेऊं शकेल. आधीच दैनिकांतील बातम्या कठोर, क्रूर आणि मन अस्वस्थ करणाऱ्या असतात. पुढाऱ्यांचे संदेशहि तसेच उग्र आणि असलेल्या परिस्थितीचें अधिकच उदास चित्र रेखाटणारे. त्यांत विद्याभ्यासजड संपादकीय मजकुराची भर. मग वाचकाचा जीव गुदमरून जाणार नाही तर काय ? अशा वेळीं खुसखुशीत विनोदाने भरलेलें एखादेंच सदर जर वाचकाला दिसलें, तर तो एखाद्या हपापलेल्या माणसाप्रमाणे त्याच्यावर झेप टाकल्याशिवाय राहणार नाही.

या सदरांत अनेक प्रकारचा विनोद आणतां येईल. कांही बातम्या जात्याच विनोद निर्माण करणाऱ्या असतात. त्या नुसत्या वाचकांपुढे ठेवल्या तरीसुद्धा ते आपोआप हसूं लागतील. अशा बातम्यांवर संपादकीय मखलाशीचीसुद्धा जरूर पडणार नाही. निरनिराळ्या परदेशांतील वृत्तपत्रांतून या बातम्या गोळाहि करतां येतील. आपल्या दैनंदिन जीवनांतसुद्धा केवढा विनोद भरलेला असतो, किती वैचित्र्यपूर्ण माणसें आपल्याला प्रतिक्षणीं भेटत असतात. त्यांच्या विचित्र वागणुकीचें नुसतें चित्र आपण रेखाटलें तरी वाचकांच्या मुद्रेवर स्मित झळकूं लागेल. अशीं विनोदी व्यक्तिचित्रें हें या सदराचें एक वैशिष्ट्य होऊं शकेल. त्यानंतर मोठमोठ्या लोकांच्या भाषणांतसुद्धा कांही विनोदी कथा सांगितलेल्या आढळून येतील. त्या कथा एकत्र करून ठेवणें हासुद्धा संपादकाचा दिनक्रम झाला पाहिजे. म्हणजे या गोष्टींचा साठा कधी आटणार नाही. विनोदप्रिय संपादकाला थोर लोकांच्या भाषणांत असाहि मजकूर सापडेल, की ज्याचा त्याला परिणामकारक रीतीने उपहास करतां येईल. सारांश,संपादकाचें सारें लक्ष विनोद हुडकण्याकडेच लागलें पाहिजे. मग कन्हय्यालाल मुन्शी यांच्या वनमहोत्सवांत त्याला विनोद करण्याची एवढी सामुग्री आढळून येईल, की ज्याच्या योगाने कित्येक दिवस तरी या सदरासाठी त्याला मजकुराचा तुटवडा पडणार नाही. या वनमहोत्सवासाठी शेतकी खात्यांतील एका अधिकाऱ्याने टेंडरें मागवून दोन रुपयांना एक खड्डा असे खड्डे तयार करून घेतले आणि मग सिमल्याहून किंवा इतर ठिकाणांहून येणारीं रोपें आलीं नाहीत म्हणून त्याने पुन्हा टेंडर मागवून रुपयाला एक खड्डा अशा दराने ते बुजवून टाकले असें म्हणतात! आता या बातमीइतका विनोद दुसरा कोणता असूं शकेल ? साखरेच्या टंचाईच्या वेळीं तिखटमिठाच्या करंज्या करून दिवाळी साजरी करावयास सांगणाऱ्या काकासाहेब गाडगिळांवर कित्येक विनोदी लेखकांनी हत्यार उगारलें होतेंच ना ! त्यांचीं कित्येक भाषणें विनोदी उपमा व कथांनी जशीं

भरलेलीं असतात तसाच त्यांतून प्रत्यक्ष विनोदहि निर्माण होत असतो. संपादकानें त्यांच्याकडे लक्ष मात्र ठेवलें पाहिजे.

विनोदी लघुकथांची सामुग्री तर संपादकाला क्षणभर कोणत्याहि अड्ड्यावर जाऊन बसलें तरी मिळूं शकेल. दिल्लींतील प्रत्येक अड्ड्यावर सरदारजींच्या ज्या कथा रसभरितपणें सांगण्यांत येतात त्या मराठी वाचकांना सादर केल्या तर वाचकांचें हसूनहसून पोट दुखून येईल. यांत कोणत्याहि एका जमातीचा उपहास करण्याचा हेतु नसतो. ब्रिटनमध्ये ज्याप्रमाणे कोणत्याहि विनोदी गोष्टी स्कॉचमनच्या नांवानें खपत असतात, तसेंच उत्तर हिंदुस्थानांत तरी सरदारजी हे विनोदविषय झालेले आहेत. ब्रिटनमधील अनेक वृत्तपत्रें जें विनोदी लिखाण प्रसिद्ध करीत असतात, त्यांत या गोष्टींना प्राधान्य दिलेलें असतें. या दंतकथा अर्थातच कोणाच्या तरी सुपीक मेंदूंतून बाहेर पडत असतात. क्षणभर करमणूक करून घ्यावयाची, खळखळून हसावयाचें आणि पुढेमागे दुसऱ्याला त्या सांगून त्याच्याहि आनंदांत भर घालावयाची हाच त्यांमागील हेतु असतो. वानगीदाखल ही एक गोष्ट पाहा.

एका ख्यातनाम सरदारजींची ही गोष्ट आहे. सरदार आजितसिंह वस्तुसंग्रहालय पाहात होते. त्या विभागाचे सेनापति कांही दिवसांच्या रजेवर गेल्यामुळे त्यांच्या जागीं सरदार आजितसिंह यांची नेमणूक झाली होती. साहजिकच वस्तुसंग्रहालयाचे क्यूरेक्टर स्वतः त्यांना सर्व संग्रहालय दाखवीत होते. पाहतांपाहतां सरदारजींची दृष्टि एका मानवी कवटीवर गेली. कां कोण जाणे, अंतःप्रेरणेनेच जणू ते त्या कवटीकडे पाहात राहिले.

"कोणा महाभागाची ही कवटी असेल कोण जाणे!" ते आपल्याशींच पुटपुटले. क्यूरेटरांनी ते उद्गार ऐकले आणि सरदारजींची तंद्री लागलेलीहि त्यांनी पाहिली. ते क्षणार्धांत सरदारजींना म्हणाले, "महाराज, माफ करा! मीं आधीच आपल्याला सांगायला पाहिजे होतं– ही कवटी गुरु गोविंदसिंगांची आहे."

" काय ! गुरु गोविंदसिंग ! " सरदार अजितसिंह एकदम ताठ होत म्हणाले. त्यांचा हात लष्करी सलामीसाठी निमिषार्धांत वर गेला. त्यानंतर नम्रपणें वाकून आपल्या खिशांतून सव्वा रुपया काढीत त्यांनी " सत् श्री अकाल " असें म्हणून तो सव्वा रुपया त्या कवटीपुढे ठेवला. त्या वेळीं त्यांच्या डोळ्यांतून घळघळ अश्रू वाहत होते.

पण त्यानंतर सरदार अजितसिंह एकदम विचारमग्न झाले. क्षण-भराने त्यांनी क्यूरेटरला विचारलें, " का हो, तुम्ही म्हणतां ही गुरु गोविंदसिंगांची कवटी आहे; पण मला वाटतं, गुरु गोविंदसिंग तर चांगले धिप्पाड होते. ही कवटी तर अगदीच लहान दिसते ! "

क्यूरेटर तितक्याच गंभीरपणें उत्तर देत म्हणाले, " सरदारजी, किती मार्मिक प्रश्न विचारलांत तुम्हीं ! खरं आहे तुमचं म्हणणं. गुरु गोविंदसिंग केवढे मजबूत अन् धिप्पाड होते. पण ही कवटी त्यांच्या बाळपणींची आहे. "

सरदार अजितसिंह पुन्हा एकदा भक्तिभावाने त्या कवटीला प्रणाम करीत म्हणाले, " गुरु गोविंदसिंगजी ! क्या खुशकिस्मती मेरी ! "

अशा विनोदी कथा जर आपल्या वृत्तपत्रांत येऊं लागल्या, तर विनोदाचें आपलें सदर आल्हाददायक होईल यांत काय संशय ?

अलीकडे व्यंगचित्रांनी बऱ्याच प्रमाणांत आपल्या वर्तमानपत्रांतील ही उणीव भरून काढलेली आहे. श्री. शंकर यांनी या क्षेत्रांत जी कामगिरी बजाविली आहे ती एकमेवाद्वितीयम् अशा स्वरूपाची आहे. 'हिंदुस्थान टाइम्स'मध्ये ते होते त्या वेळीं त्यांच्या व्यंगचित्रासाठीसुद्धा कित्येक वाचक त्या पत्रावर झेप टाकीत असत. आज केवळ व्यंगचित्रांचेंच एक साप्ताहिक यशस्वी रीतीने चालवून त्यांनी या क्षेत्रांतील आपलें प्रभुत्व तर प्रस्थापित केलें आहेच; पण वाचकांनासुद्धा व्यंगचित्रांमध्ये किती गोडी असते, वाचकवर्ग हासुद्धा किती विनोदप्रिय असतो याचा प्रत्यक्ष पुरावा दिला आहे. अर्थात्

व्यंगचित्रें जितकीं विनोदी असतात तितकींच तीं भेदकहि असतात. 'लो' यांचीं राजकीय व्यंगचित्रें म्हणजे कथात्मक उपरोध व उपहास यांचे तेजस्वी नमुनेच होत. मुत्सद्द्यांच्या तार्किक आणि मुद्देसूद वक्तृत्वाने किंवा प्रभावी सरबत्तीने प्रतिपक्षाची बाजू जेवढी दुर्बल होत नसेल तितकी लो यांच्या एखाद्याच मर्मभेदी व्यंगचित्रांतील विकृत दर्शनाने ती दुबळी पडत असेल. सध्याच दिल्लींतील 'हिंदुस्थान टाइम्स'मध्ये 'वर्ल्ड सिटिझन' या मथळ्या-खाली जीं त्यांचीं व्यंगचित्रें प्रसिद्ध होत आहेत तीं पाहिलीं तर सोव्हियट मुत्सद्द्यांचा अक्षरशः तिळपापड होईल ! व्यंगचित्रांचें हें शैक्षणिक महत्त्वहि विसरून चालणार नाही.

पण तुम्हांला नुसतेंच हसावयाचें असेल तर 'टाइम्स'मधील पॉप किंवा 'हिंदुस्थान टाइम्स'मधील चंदूकडे तुम्हांला वळलें पाहिजे. पॉप हा इतका लोकप्रिय झाला आहे, की उद्या तो दिसला नाही तर वाचकांना त्या दिवशीं करमणार नाही. युद्धकाळामध्ये पॉपच्या छायाचित्रांचे ठसे येऊं न शकल्यामुळे कांही काळ हीं व्यंगचित्रें छापणें थांबवावें लागलें तेव्हा वाचक हळहळत म्हणूं लागले होते, "अरेरे ! पॉपचाहि या निर्घृण युद्धानं बळी घेतला ना !" पॉपवर आपलें प्रेमहि इतकें असतें, की त्याचा पराभव झाला तर आपल्याला वाईट वाटतें व त्याने बाजू उलटविली की आपल्याला कमालीचा आनंद होतो.

तीच गोष्ट 'हिंदुस्थान टाइम्स'मधील चंदू व पिपि यांच्याबद्दलहि होय. त्या व्यंगचित्रांत इतका निर्मळ विनोद असतो, दैनंदिन प्रश्नांबद्दल इतकीं तऱ्हेवाईक मतें तें जोडपें व्यक्त करीत असतें आणि त्यांच्या मासलेवाईक दृष्टिकोनामुळे आपल्याला इतका आश्चर्याचा धक्का बसतो, की हें पत्र हातीं धरतांच त्या जोडप्याकडेच आपलें प्रथम लक्ष वेधलें जातें आणि मगच आपण इतर मजकुराकडे वळतों.

व्यंगचित्रांचें उद्दिष्ट समाजांतील व्यंगांवर बोट ठेवणें हें तर खरेंच, पण तें करतांना द्वेषभावनेपासून मन मात्र पूर्णपणें अलिप्त ठेवलें पाहिजे. विनोद हा जसा विषारी असतां कामा नये, तशीच व्यंगचित्रांतील हेटाळणीहि विषारी असतां कामा नये. वर्तमानपत्रांतलि इतर मजकुराप्रमाणे व्यंगचित्रांतहि सदभिरुचीच्या मर्यादा पाळल्या जाणें आवश्यक आहे. त्या दृष्टीने व्यंगचित्रांच्या कल्पना देतांना संपादकाने ही गोष्ट व्यंगचित्रकाराच्या मनावर बिंबविली पाहिजे. कोणत्याहि परिस्थितींत लोकांच्या मनांत तिरस्कार उत्पन्न होईल अशी भावना व्यंगचित्राने व्यक्त करतां कामा नये. ज्याचें व्यंगचित्र काढलें असेल त्याला हास्यास्पद बनविणें हा तर त्यांतील प्रधान हेतु खरा; पण तें करतांना खुद्द त्या व्यक्तीला जरी शिसारी आली तरी तें व्यंगचित्र फसलें असें समजावयाला हरकत नाही. स्वतः हसणें, लोकांना हसविणें आणि खुद्द व्यंगचित्राचा विषय झालेल्या व्यक्तीलाहि हसविणें हेंच व्यंगचित्राचें मुख्य उद्दिष्ट असलें पाहिजे.

पण प्रथमच मीं म्हटल्याप्रमाणे विनोदी मजकूर लिहिणें किंवा विनोदी व्यंगचित्रांच्या कल्पना देणें हें तशी प्रवृत्ति असणाऱ्या लोकांचेंच काम आहे. दैनिक वृत्तपत्राच्या रगाड्यांतहि ही प्रवृत्ति शाबूत ठेवणारे लोक क्वचितच आढळून येतात. म्हणूनच मराठी वृत्तपत्रांची ही बाजू बहुशः लंगडी राहिलेली आहे. पण ती उणीव दूर होणें अत्यंत आवश्यक मात्र आहे.

★ ★ ★

प्रकरण ९ वें

# संपादकीय मजकूर

★

दैनिक वृत्तपत्राच्या संपादकीय कचेरींत तुम्ही संपादकाला भेटायला गेलांत तर तुम्हांला तो आल्यागेलेल्या लोकांशीं बोलत असलेला, किंवा प्रुफांच्या गठ्ठयांवरून डोळे फिरवीत असलेला, किंवा संपादकीय मजकूर देण्याची त्याची वेळ झालेली असेल तर अक्षरशः सचिंत आणि व्यग्र असा दिसेल. संपादकीय मजकूर देतांना त्याला ज्या वेदना होत असतात त्यांना कांही जण विनोदाने 'प्रसूतिवेदनां'ची उपमा देतात. तुम्ही म्हणाल, या वेदना कां व्हाव्या ? लेखनांत ज्या संपादकाचा हातखंडा असतो त्याला संपादकीय मजकूर देतांना एवढी कां यातायात पडावी ? खरें आहे तुमचें म्हणणें. पण ही यातायात पडते ती लेखनाबद्दलची नव्हे, तर लेखनाचा विषय शोधून काढण्याची, त्यासाठी आवश्यक ती माहिती जमविण्याची व त्या विषयावरील आपला दृष्टिकोण ठरविण्याची.

दररोज संपादकीय मजकुरासाठी विषय शोधून काढणें ही सोपी गोष्ट नव्हे खास. कोणी म्हणेल, एवढ्या असंख्य बातम्या येत असतात, मग विषयांना काय तोटा ? पण सगळ्याच बातम्या या अग्रलेखांचे वा स्फुट लेखांचे विषय होऊं शकत नाहीत. संपादकीय मजकुराचें उद्दिष्ट ध्यानीं आणलें

म्हणजे हें कळून येईल. संपादकीय मजकुरांतून संपादक आपलीं अशीं विशिष्ट मतें प्रतिपादन करीत असतो. जगांत चाललेल्या घडामोडींवरीलच हीं मतें असतात; पण या घडामोडींचा आधार घेऊन, त्यांचें विश्लेषण करून, त्यांचीं कारणें व त्यांचे परिणाम यांचा विचार करून संपादक कांही मूलभूत तत्त्वें प्रस्थापित करूं पाहात असतो. घडामोडींना अर्थात् संपादकाच्या दृष्टीने महत्त्व आहेच; पण केवळ पाया म्हणून. त्या पायावर संपादक आपल्या तात्त्विक भूमिकेची इमारत उभी करीत असतो. साहजिकच या भूमिकेचा पाया स्थिर व खंबीर असावा म्हणून त्याला विशिष्ट बातम्यांची व घडामोडींची निवड करावी लागते. विषय निवडतांना त्याला जी याता-यात करावी लागते ती याचमुळे होय.

संपादकाला यासाठी कोणकोणत्या गोष्टींकडे लक्ष द्यावें लागतें तें पाहा. त्याला आधी सर्व वर्तमानपत्रें चाळावीं लागतात. हीं वर्तमानपत्रें स्थानिकच नव्हेत, तर देशांतील सर्व प्रमुख व परदेशांतीलहि कांही वर्तमानपत्रें होत. संपादकीय मजकुरासाठी तो त्यांतील बातम्यांकडे फारसें लक्ष देत नाही. तो त्यांतील संपादकीय मजकुराकडे बारकाईने पाहतो व त्या वृत्त-पत्रांनी विशिष्ट विषयावर कोणतीं मतें व्यक्त केलीं आहेत, विशिष्ट घटनां-कडे पाहण्याचा कोणता दृष्टिकोण ठेवला आहे याचा तो अभ्यास करतो. त्या अनुरोधाने आपली भूमिका ठरविणें त्याला सोपें जातें.

त्यानंतर कांही विषय संपादकाच्या मनांत आधीच घोळत असतात. पण त्यांबद्दलची सर्व माहिती त्याला वृत्तपत्रांतून किंवा पुस्तकांतून गोळा करावयाची असते. त्यांवर तज्ज्ञांचीं मतें घेणेंहि त्याला आवश्यक वाटतें. आपल्या सहकाऱ्यांशीं चर्चा करूनहि तो आपली भूमिका पक्की करूं पाहात असतो. त्या दृष्टीने हा विषय हातावेगळा करीपर्यंत संपादकाला सारखी भवति न भवति करावी लागते, शंकाकुशंका दूर कराव्या लागतात, विचारांचें मंथन करावें लागतें. साहाजिकच तो संपादकीय मजकूर लिहून होईपर्यंत त्याला बराच त्रास सहन करावा लागतो.

शिवाय कांहीं विषय असे असतात, की ज्यांची नोंद ठराविक दिवशीं घेणें भागच पडतें. त्या वेळीं संपादकाला "आज अग्रलेख कोणत्या विषयावर लिहूं ?" याची विवंचना मात्र पडत नाही. उदाहरणार्थ, अंदाजपत्रक ज्या दिवशीं लोकसभेपुढे येतें त्याच्या दुसऱ्या दिवशीं सर्वत्र अग्रलेख ठरलेलाच असतो. पण विषय ठरला म्हणून यातना कमी झाल्या असें नव्हे. अंदाजपत्रक आल्यानंतर त्याचा सारासार विचार करणें, त्याबद्दलचा आपला दृष्टिकोण ठरविण्यासाठी तज्ज्ञांबरोबर चर्चा करणें, त्यांच्या अनुरोधाने टीकेचें स्वरूप ठरविणें, हें अत्यंत कठीण कार्य संपादकाला लगेच करावें लागतें. तज्ज्ञांचीं मतें देऊन वृत्तसंस्था संपादकाला मदत करते हें खरें; पण दृष्टिकोण हा संपादकालाच स्वतः विचार करून ठरवावा लागतो. अर्थातच अंदाजपत्रकावरील अग्रलेख सादर करतांना संपादकाला प्रसववेदना झाल्या तर काय नवल ?

थोर पुरुषांचे जन्मदिन वा त्यांच्या पुण्यतिथ्या किंवा असेच राष्ट्रीय वा आंतरराष्ट्रीय महत्त्वाचे दिवस केव्हा पडतात यांकडेहि संपादकाला लक्ष द्यावें लागतें. त्या दिवशीं संपादकीय मजकूर अर्थातच वैशिष्ट्यपूर्ण असा असतो. कारण या दिवसांचें महत्त्व विशद करून संपादक आपल्या वाचकांना एक प्रकारें संदेश देत असतो. उदाहरणार्थ, लोकमान्य टिळक किंवा महात्मा गांधी यांचें पुण्यस्मरण करतांना त्यांचा संदेश आचरणांत आणण्यासाठी लोकांनी काय केलें पाहिजे याविषयी संपादक मार्गदर्शन करतो. म्हणूनच हा मजकूर लिहितांना तो विशेष परिश्रम घेतो व आपले विचार व आपली भाषा हीं दोन्हीहि त्या प्रसंगांना अनुरूप अशी असावी याचीहि तो काळजी घेतो. या दिवशीं किंवा स्वातंत्र्यादिनाच्या किंवा प्रजासत्ताकाच्या वाढदिवसाच्या वेळीं बहुतेक संपादकांनी लिहिलेले अग्रलेख जितके विचारप्रवर्तक तितकेच भाषेच्या दृष्टीनेहि नमुनेदार आढळून येतात याचेंहि कारण हेंच होय.

कांही वेळीं संपादकाला तातडीने कांहीं विषयांवर लिहिण्याची पाळी येते. हे असे विषय म्हणजे प्रामुख्याने मृत्युलेख होत. जगांतील श्रेष्ठ पुरुषांचा

मृत्यु घडून आला असेल तर त्यांचें जीवनचरित्र व त्यांचें कार्य यांची विस्तृत माहिती वृत्तसंस्थांकडून येते किंवा चरित्रकोषांतूनहि ती काढतां येते; आणि मग त्याआधारें संपादकाला मृत्युलेख लिहिणें फारसें कठीण पडत नाही. पण कांही पुरुष असे असतात, की ज्यांचें नांव देशांत तेवढें विख्यात नसतें. पण आपल्या प्रांतांत किंवा आपल्या क्षेत्रांत त्यांची कामगिरी फार मोठी असते; वृत्तपत्राला जशी स्थानिक घडामोडींची विशेष बातमी द्यावी लागते त्याचप्रमाणे स्थानिक महत्त्व प्राप्त झालेल्या लोकांनाहि त्यांना श्रद्धांजलि अर्पण करावी लागते. त्या वेळीं मात्र संपादकाला त्या व्यक्तीची माहिती मिळविण्यासाठी बरीच आटापीट करावी लागते. वृत्तपत्राचा संपादक हा नुसताच बहुश्रुत असून चालत नाही, तर सार्वजानिक जीवनांत भाग घेणाऱ्या लहानमोठ्या असंख्य व्यक्तींची त्याला माहितीहि असावी लागते हें या वेळीं पटून येतें. कारण, विशेष प्रख्यात नसलेल्या पण कांही ना कांही भरीव कामगिरी केलेल्या व्यक्तीवर मृत्युलेख लिहिण्याची पाळी आली तर आपल्या स्मरणशक्तीवरच बहुश: संपादकाला विसंबून राहावें लागतें.

थोर पुरुषांच्या बाबतींत कित्येक वृत्तपत्रांजवळ आधीच माहिती जमविलेली असते व निधनाची बातमी आल्यानंतर त्या माहितीच्या आधारें लेख लिहून पुरा करणें एवढेंच त्याचें काम राहतें. कांही वृत्तपत्रांत तर जगप्रसिद्ध व्यक्तींचे मृत्युलेख आधीसुद्धा तयार करून ठेवलेले असतात. ब्रिटनचे राजे सहावे जॉर्ज यांचा मृत्यु होण्यापूर्वी कांही महिने आधी त्यांच्यावर एक शस्त्रक्रिया करण्यांत आली होती. त्या वेळींच त्यांची परिस्थिति चिंताजनक होती; त्यामुळे अमेरिका व ब्रिटनमधील कित्येक वृत्तपत्रांनी त्यांचे मृत्युलेख व जीवनचरित्र अगदी छायाचित्रांसह तयार करून ठेवलें होतें. राजे जॉर्ज त्या शस्त्रक्रियेंतून सुखरूप बाहेर पडले. पण त्यानंतर कांही महिन्यांनी जेव्हा त्यांचा मृत्यु झाला तेव्हा सर्व वृत्तपत्रांनी लगेच या तयार करून ठेवलेल्या मृत्युलेखांचा उपयोग करून घेतला. यांत कोणाला

औचित्यभंग झाल्यासारखें वाटण्याचें कारण नाही. हा फक्त सोयीचा प्रश्न आहे. वर्तमानपत्रें दूरदृष्टि ठेवून पुढे घडून येणाऱ्या गोष्टींची जर आधीच माहिती जमवून ठेवूं शकतात तर मृत्युलेखाचीहि त्यांनी आधी तयारी करून ठेवली तर त्यांत काय वावगें आहे ?

या ठिकाणीं दैनिक वृत्तपत्राच्या एकंदर साधनसामुग्रीचा विचार करणें अप्रस्तुत होणार नाही. दैनिक वृत्तपत्रांचा संसार हल्ली इतका वाढत चाललेला आहे आणि सामाजिक जीवनांत त्यांना इतकें महत्त्व प्राप्त होत चाललेलें आहे, की आपली साधनसामुग्री शक्य तेवढी परिपूर्ण असणें हें दैनिकाच्या हिताच्याच दृष्टीने आवश्यक झालेलें आहे. खुद्द संपादकीय मजकुरासाठीसुद्धा दैनिकाजवळ स्वतःचें असें लहानमोठें पुस्तकालय असणें अत्यंत जरूरीचें आहे. या पुस्तकालयांत निदान कांही कोश– उदाहरणार्थ ज्ञानकोश, शब्दकोश, चरित्रकोश, इतिहास, भूगोल, अर्थशास्त्र, राजकारण, राज्यघटना वगैरे महत्त्वाच्या विषयांवरील निवडक पण नामांकित ग्रंथ, कांही संदर्भ-ग्रंथ, प्रमुख देशांचीं क्षेत्रफळें, लोकसंख्या, उद्योगधंदे, हवामान यांची त्रोटक का होईना माहिती देणारीं पुस्तकें आणि वर्तमानपत्रांचा ज्या कायद्यांशीं संबंध येतो त्यांची माहिती देणारीं कांही पुस्तकें एवढी तरी ग्रंथ-संपत्ति पाहिजेच. आपल्या कित्येक वृत्तपत्रांजवळ तेवढीहि सामुग्री नसते आणि मग संपादकीय मजकूर तयार करतांनाच नव्हे तर बातम्या देतांनाहि कित्येक वेळां पंचाईत पडते.

त्याचप्रमाणे या पुस्तकालयांत निदान कांही प्रमुख वृत्तपत्रांच्या अंकांच्या तरी फायली व्यवस्थितपणें ठेवलेल्या असल्या पाहिजेत. म्हणजे कोणताहि संदर्भ लागला तरी संपादकाचें काम अगदीच अडून राहणार नाही. मराठी वृत्तपत्रांच्या संपादकांचा बौद्धिक व वाङ्मयीन दर्जा श्रेष्ठ असूनहि इतर भाषांतील पत्रकार त्यांच्यावर आघाडी मारतांना दिसतात याचें एक मुख्य कारण म्हणजे साधनसामुग्रीचा अभाव हें होय. आग लागल्या-

नंतर विहीर खणूं लागावें तसें संपादकीय मजकूर लिहितांना कांहीं संपादकांना एखाद्या संदर्भग्रंथासाठी एखाद्या पुस्तकालयाची कास धरावी लागते. कांहीं-येळां आपल्या स्वतःच्या वर्तमानपत्राचीहि फाइल व्यवस्थितपणें त्यांना पाहावयाला मिळत नाही ! अशा परिस्थितींत केवळ स्वतःच्या ज्ञानावर– व तेंहि स्मरणांत साठवून ठेवलेल्या ज्ञानावर संपादकीय मजकूर लिहिणें त्यांना किती कठीण जात असेल याची कल्पनाच केलेली बरी ! अर्थात् हासुद्धा एक आर्थिक स्वरूपाचा प्रश्न आहे व संपादकाच्या बहुशः ती कक्षेबाहेरचीच गोष्ट असते. पण आपल्यावरील जबाबदारी योग्य रीतीने पार पाडण्यासाठी निदान किमान स्वरूपाच्या साधनसामुग्रीची तरी संपादकाने व्यवस्था केली पाहिजे किंवा त्यासाठी आग्रह तरी धरला पाहिजे.

कांहीं संपादक आपली स्वतःची अशीहि साधनसामुग्री जमा करीत असतात. आपल्या आवडीच्या विषयांवरील ग्रंथ जमा करणें, प्रसिद्ध पुरुषांच्या फायली करून त्यांत त्यांच्या जीवनचरित्राची त्रोटक माहिती लिहून काढणें व वेळोवेळीं त्यांत भर टाकणें, निरानिराळे अहवाल एकत्र करणें, नवीननवीन विषयांचा व प्रश्नांचा अभ्यास करतांना जमविलेल्या माहितीची वर्गवारी करून त्यांच्या फायली तयार करणें, हेंहि काम ते पद्धतशीरपणें करीत असतात. संपादकीय कार्याचाच हाहि एक महत्त्वाचा भाग होय. संपादकाचें यश त्याने पद्धतशीरपणें घेतलेल्या या श्रमांवरहि अवलंबून असतें.

संपादकीय मजकूर हा अशा रीतीने दीर्घ परिश्रमांतून तयार झालेला असतो हेंच यावरून सिद्ध होतें. चार वर्तमानपत्रें वाचलीं आणि लेखणी हाताशीं धरली एवढेंच संपादकीय मजकुराचें स्वरूप नव्हे. त्याच्या पाठीमागे अभ्यास असतो. विचारमंथनांतून निर्माण झालेला दृष्टिकोण त्यांतून प्रतीत होत असतो; आणि आपलीं मतें दुसऱ्याला पटवून देण्यासाठी जो आवेश असणें अपरिहार्य असतें, तो आवेश प्रतिबिंबित करणारें प्रभावी

वाङ्मयहि त्यांतून प्रकट होत असतें. खरा संपादक हा हाडाचा साहित्यिकच असतो. निरानिराळ्या संपादकांचे साहित्यगुण निरानिराळे असतील एवढेंच. 'लोकमान्या'चे संपादक श्रीयुत पां. वा. गाडगीळ यांच्या अग्रलेखाची ढब तुम्हीं पाहिलीत तर तुम्हांला त्यांत सुबोध, स्वच्छ आणि निर्मळ भाषेचा मासला पाहावयाला मिळेल. एखाद्या शिक्षकाने कठीणांतील कठीण विषय सोप्या शब्दांत समजावून द्यावा असें त्यांचें विवेचन असतें. पण केवढा आवेश त्यांत प्रकट झालेला असतो. केवढी कळकळ त्यांतील शब्दाशब्दांतून व्यक्त होत असते. त्यांचीं मतें कोणाला पटोत वा न पटोत; पण गाडगीळांचा अग्रलेख वाचून कोणी साशंक राहील असें मात्र कधी होणार नाही. ऐन वेळीं पाहुणा घरीं आला म्हणजे सुगृहिणी थोडक्या काळांत पिठलें आणि भात तयार करते आणि भुकेलेला पाहुणा त्या चवदार अन्नाने संतुष्ट होतो, तसा गाडगीळांचा अग्रलेख चवदार असतो.

'प्रभात'चे संपादक श्री. नवरे यांची कामाची तऱ्हा जशी वेगळी तशी त्यांच्या अग्रलेखाची ढबहि वेगळी. संपादकाने कसें असावें याचा आदर्श कोणाला हवा असेल तर त्याने श्री. नवरे यांच्याकडे पाहावें. त्यांच्या थैलींत अनेक संस्थांचें भवितव्य साठविलेलें असतें आणि त्यामुळे ते जेथे जातील तेथे लोकांचें जसें मोहोळ उठतें. पण संपादकीय खुर्चीवर बसून एकापाठीमागून एक येणाऱ्या लोकांना सौजन्याने तोंड देत असतांनाच त्यांचें वाचनहि चाललेलें असतें व विचारहि चाललेले असतात. त्या विचारांतूनच अग्रलेखाच्या विषयाचीहि त्यांची निवड होते आणि "या हो महाशय" अशी हाक देऊन त्यांनी एखाद्या सहसंपादकाला अग्रलेख लिहून घेण्यासाठी बोलाविलें म्हणजे त्यांच्या स्वभावांतील संथपणाप्रमाणे त्यांच्या विचारांचा प्रवाहहि संथपणें वाहूं लागतो. श्री. नवरे यांची विषयांची मांडणी कशी बांधीव, मुद्देसूद असते आणि भाषा कशी सुडौल, अर्थवाही आणि प्रसादपूर्ण असते. श्री. नवरे यांचा अग्रलेख वाचतांना म्हणूनच

मन गंभीर पण प्रसन्न होतें. एखादा थिऑसफिस्ट, स्वच्छ परीटघडीचे कपडे घालून आणि लाल पगडी डोक्यावर ठेवून वैदिक विवाहपद्धतीने लग्न लावीत आहे, त्याच्या गोऱ्यापान मुखावर साऱ्यांच्या मुद्रा कशा खिळून राहिलेल्या आहेत आणि त्याच वेळीं त्याच्या गंभीर मुखांतून आवाज निघतो— " वसुदेवसुतं देवं. " तो आवाज ऐकतांच सारें वातावरण जसें शांत होतें व मन जसें उदात्त होतें तशी नवरे यांचे कांही अग्रलेख वाचतांना मनःस्थिति होते.

'लोकसत्ते'चे संपादक श्री. महाजनी यांचा ढंगच निराळा. तर्ककर्कश अशी त्यांची विचारपद्धति. विषय मांडतील तर कसा ईर्ष्येने आणि अभिमानाने. त्या आत्मविश्वासाला साजेशीच धारदार आणि तेजस्वी अशी त्यांची भाषा. प्रतिपक्षी तर त्या तेजाने दिपून जावयाचाच; पण आपल्या मेंदूच्या कप्प्यांत जणू ते विचार घुसत आहेत असें वाचकाला वाटावयाचें. आणि उपरोध एकदा सुरू झाला म्हणजे मुष्टियुद्धांत एखाद्या योद्धयाने नुसते तडाखे मारीत राहावें आणि दुसऱ्याने असाहाय्यपणें खाली मान घालून ते सोसण्याचा प्रयत्न करावा अशी विरोधकाची परिस्थिति होते. श्री. महाजनी यांची भाषाहि त्यांच्या परिपक्व मतांप्रमाणेच कमावलेली आहे. आणि प्रौढ, सुसंस्कृत आणि मनोहारी अशा भाषाशैलीने नटलेलें त्यांचें लिखाण वाचूं लागलें म्हणजे महाबळेश्वरच्या आर्थर पॉइंटवर उभें राहिल्यानंतर समोरील सह्याद्रीचें उग्र पण नितांतरमणीय स्वरूप पाहून क्षणभर मन जसें स्तिमित होतें तसें आपलें मनहि दिपून जातें.

'नवाकाळ'चे संपादक श्री. खाडिलकर यांचें मन जितकें मृदु व सरळ तितकेंच त्यांचें लिखाण कित्येक वेळां भेदक व तीव्र उपरोधाने भरलेलें असतें. त्यांच्या लेखणीलाहि विलक्षण धार आहे. आणि स्वतःच्या मतांचा आवेश तर त्यांतून प्रकट होतोच; पण बुद्धीची प्रगल्भता, विचारांचा निश्चितपणा आणि सुसंस्कृत मनाचा सारा डौल त्यांतील वाक्यावाक्यांतून प्रतीत होतो.

अप्पासाहेब खाडिलकर हे सर्वच दृष्टींनी आपल्या थोर वडिलांची परंपरा चालवीत आहेत. तेव्हा वडिलांची निष्ठा जशी त्यांनी आत्मसात् केली आहे तसाच त्यांच्या साहित्यगुणांचा वारसाहि त्यांनी घेतला आहे. म्हणूनच संस्कृत वचनांनी नटलेलें, त्या वाङ्मयाचें अवगाहन केल्यामुळे सुसंपन्न झालेल्या डौलदार भाषेने शृंगारिलेलें आणि त्यांतील कल्पनाविलासाने मन मोहून टाकणारें त्यांचें लिखाण वाचतांना जणू गंधर्व नाटक मंडळीच्या वैभवाच्या काळांतील मखमली पडदे एकामागून एक वर जात आहेत आणि धुपाच्या सुगंधाने आणि ऑर्गनच्या सुरावटीने भारून गेलेलें आपलें मन त्या भव्य दृश्याकडे आचंब्याने पाहात आहे असाच वेळोवेळीं भास होतो.

'नवशक्ती'चे संपादक श्री. प्रभाकर पाध्ये यांचा तर पिंड साहित्यिकाचाच. आणि एखाद्या गारुड्याने बासरी वाजवून सर्पाला डोलवयाला लावावें व त्यांतील नादमाधुर्याने स्वतःहि डोलूं लागावें तशा प्रकारचें त्यांचें लिखाण असतें. भावविवशता ही त्यांच्या लिखाणांतच नव्हे तर त्यांच्या वागणुकींतहि प्रतीत होत असते. त्यांच्या रोमरोमांत भरलेली उत्कटता म्हणूनच त्यांच्या लेखनांतहि प्रकट होते. त्याच्या जोडीला त्यांचा मताभिनिवेश इतका कडवा असतो, की ज्वालामुखींतून बाहेर पडणाऱ्या तप्त रसाप्रमाणे त्यांचे विचार उसळून बाहेर पडतात, इतकेंच नव्हे, तर मेंदूला अक्षरशः धग लावतात. आणि या कधी दाहक तर कधी उन्मादक अशा विचारांना ज्या भाषेच्या कोंदणांत ते बसवीत असतात ती भाषा जितकी तेजस्वी तितकीच ओघवती, लालित्यपूर्ण आणि नादमधुर असते. प्रभाकर पाध्ये यांचा अग्रलेख एकट्याने, मनांतल्या मनांत वाचण्यांत अर्थ नाहीं. तो चारचौघांच्या मेळाव्यांत मोठ्याने वाचला गेला तर खरोखरच केवळ त्यांचें भाषासौष्ठव पाहून, शब्दप्रयोगांतील नादमाधुर्य ऐकून सारेजण डोलूं लागल्यावांचून राहणार नाहीत. हिवाळा संपण्याच्या वेळीं वृक्षवेलींवर हिरव्या पानांचा आणि तांबूस फुलांचा मोहर फुललेला पाहून जसें मन पुलकित

होतें तसें प्रभाकर पाध्ये यांचें संपादकीय लिखाण वाचतांना होतें. फक्त राजकीय पूर्वग्रह मात्र आपल्यामध्ये असतां कामा नये. इतकेंच नव्हे तर एखादी कलाकृति पाहतांना जसें आपण आपलें मन आलिप्त ठेवतों आणि तिचें गुणग्रहण करतों त्या वृत्तीनें आपण या लेखनाकडे पाहिलें पाहिजे.

'तरुण भारत'चे संपादक श्री. माडखोलकर हे तर असे एक पत्रकार आहेत, की ज्यांचें वृत्तपत्र केवळ त्यांतील अग्रलेखासाठी पुष्कळ वेळां वाचलें जातें. कोणत्याहि संपादकाला अभिमान वाटावा अशीच ही गोष्ट आहे. माडखोलकरांनी साहित्याचीं अनेक दालनें आपल्या लेखनानें भूषविलीं आहेत. आज दैनिक वृत्तपत्रांत उच्च दर्जाचें साहित्य देऊन ते वृत्तपत्रांना वाङ्मयीन जगांत मानाचें स्थान मिळवून देत आहेत. बगीच्यांत फुलांचे ताटवे फुललेले आहेत, कारंजीं थुईथुई नाचत आहेत, नुकत्याच शिंपडलेल्या पाण्याचे थेंब संध्यासमयींच्या सूर्यप्रकाशांत हिरवळीवर चमकत आहेत, हें जसें विलोभनीय दृश्य असतें तसाच माडखोलकरांचा भाषाविलासहि विलोभनीय असतो. पण कार्यकर्त्यांच्या अभिनिवेशानें ते आपलीं अशीं जीं मतें व्यक्त करीत असतात व कांही जुन्या पिढींतील संपादकांप्रमाणे आपल्या भूमिकेला आधार देण्यासाठी परिश्रमपूर्वक अभ्यास करून जे ऐतिहासिक वगैरे पुरावे ते सादर करीत असतात त्यांच्याकडे मात्र केवळ त्यांच्या साहित्यगुणांमुळे कित्येक वेळां वाचकांचें दुर्लक्ष होतें हें मात्र नमूद केलेंच पाहिजे. नितांतमधुर गाण्याचे आलाप कानीं पडत असतांना त्या गाण्यांतील अर्थाकडे जसें आपलें लक्ष जात नाही तसेंच माडखोलकरांच्या भाषावैभवानें दिपून गेलेल्या मनाला त्या भाषेआड दडलेल्या विचारांची दखल घ्यावयाचीहि शुद्ध राहात नाही.

मराठी वृत्तपत्रसृष्टींत याहीपेक्षा श्रेष्ठ असे संपादक होऊन गेले, आजहि आहेत. कांही प्रातिनिधिक अशा संपादकांचें वैशिष्ट्य काय आहे एवढें समजावें म्हणूनच मीं ठळक अशा कांही संपादकांची त्रोटक माहिती

तेवढी दिली. त्यावरून तीन गोष्टी कळून येतील. एक-- संपादकाला वैचारिक भूमिका हवी. दुसरी– भाषाप्रभुत्व हवें. आणि तिसरी– आपली अशी एक वैशिष्ट्यपूर्ण शैली हवी. या तीन गोष्टी असल्याशिवाय संपादकीय मजकूर सजविणें खरोखरच कठीण आहे.

एवढी सामुग्री असल्यानंतर कल्पक संपादक केव्हाहि वेळ मारून नेऊं शकतो. मग व्यक्ति आणि प्रसंग यांच्याकडे नीट लक्ष देऊन त्याला वाचकांचें प्रत्येक बाबतींत समाधान करतां येईल. वाचकवर्ग हा अतिशय चोखंदळ असतो. एखादी घटना घडली की त्याला त्या घटनेबद्दल माहिती हवी असते. जो संपादक वेळच्या वेळीं ती माहिती पुरवील तो संपादक वाचकांच्या दृष्टीने साहजिकच श्रेष्ठ ठरतो. ही माहिती अग्रलेखांतूनच दिली पाहिजे असें नव्हे. कित्येक वर्तमानपत्रांत एक मोठा व एक लहान असे दोन अग्रलेख असतात. किंवा 'पत्रकर्त्यांच्या स्फुट सूचना' म्हणूनहि तीं संपादकीय मजकूर देत असतात. अग्रलेखाची लांबी-रुंदी जशी संपादक आपल्या पद्धतीप्रमाणे ठरवितो तसेंच या स्फुट सूचनांचें स्वरूपहि तो ठरावितो. अग्रलेख म्हणजे नेहमीच गंभीर असा कांहीतरी मजकूर असतो किंवा असावयाला पाहिजे असें समजण्याचें कारण नाही. संपादक कांही वेळीं विनोद-बुद्धीनेहि एखादा अग्रलेख लिहितो. विशेषतः कांही इंग्रजी वर्तमान-पत्रांत दुसरा अग्रलेख तर याच हेतूने लिहिण्यांत येतो. त्यांत नर्म विनोद असतो व एखादा मुद्दा सांगण्यापेक्षा एखाद्या मुद्द्याचा उपहास करण्याचीच त्यांत वृत्ति असते. मुंबईच्या 'टाइम्स ऑफ इंडिया'चे सध्याचे संपादक मि. मोरायस यांचा अशा तऱ्हेचा दुसरा अग्रलेख लिहिण्यांत अगदी हातखंडा आहे. अर्थात् तरल कल्पकतेची त्यांत छटा असावयाला पाहिजे व ज्याला रेशमी विनोद म्हणतात अशा नाजुक पण खुबीदार विनोदाचीहि त्याला जोड मिळाली पाहिजे. अशा तऱ्हेचे छोटे अग्रलेख हे त्या दृष्टीने वाङ्मयांतहि चांगलें स्थान मिळवूं शकतील.

पत्रकर्त्यांच्या स्फुट सूचना हाहि तितकाच महत्त्वाचा संपादकीय मजकूर असतो. त्याला निरनिराळीं सूचक नांवेंहि देण्यांत येतात. किरणें, व्यक्ति आणि प्रसंग, कालप्रवाह वगैरे नांवें आज प्रचलित आहेत. स्फुट सूचनांचें उद्दिष्ट व्यक्ति आणि प्रसंगांचा थोडक्यांत परामर्श घेणें हेंच असतें. अग्रलेख व स्फुट सूचना यांत महत्त्वाचा फरक कोणता असेल तर अग्रलेखांत सबंध भूमिकेचें स्पष्टीकरण केलेलें असतें व साहजिकच अनेक मुद्द्यांचा त्यांत उल्लेख झालेला असतो. तर स्फुट सूचनांत एखाद्याच मुद्द्याचा परामर्श घेण्यांत आलेला असतो. उपमाच द्यावयाची झाली तर असें म्हणतां येईल, की अग्रलेख म्हणजे एखाद्या विषयावरील वक्त्याचें भाषण होय. तर स्फुट सूचना म्हणजे प्रश्नमालेंतील एखाद्या प्रश्नाला मिळालेलें उत्तर होय. वक्ता सर्व मुद्द्यांचा सांगोपांग विचार करतो, अनुकूल आणि प्रतिकूल अशा दोन्ही बाजू पुढे मांडतो व अखेरीस आपला निष्कर्ष सांगतो. प्रश्नमालिकेंत एखाद्या प्रश्नाला मिळालेलें उत्तर हेंहि तोच निष्कर्ष सांगत असतें; पण तें सरळ आणि सडेतोडपणें. हा निष्कर्ष कसा निघतो याचीं कारणें द्यावयाला येथे अवसरहि नसतो. स्फुट सूचनांच्या बाबतींतहि संपादकाला चर्वित-चर्वण करावयाला वेळ नसतो. तो फक्त गाभ्याला हात घालतो आणि तेवढा गाभा वाचकांपुढे ठेवून तो मोकळा होतो.

स्फुट सूचनांच्या मार्फत संपादकाला निरनिराळ्या विषयांवरील आपली भूमिका स्पष्ट करतां येते व वाचकांना आवश्यक ती माहितीहि देतां येते. आदल्या दिवशीं ज्या अनेक महत्त्वाच्या घडामोडी घडलेल्या असतात त्या सर्वांवर अग्रलेख लिहिणें कांही शक्य नसतें आणि वाचकांची उत्सुकता तर संपादकाला भागवावीच लागते. उदाहरणार्थ, जपानमध्ये भूकंप झाला तर ज्या ठिकाणीं तो झाला असेल त्याची माहिती वाचकांना हवी असते. चित्रपटमहोत्सव होतो, कोलंबो-प्रदर्शन उघडलें जातें, पाकिस्तान कांही हिंदी चित्रपटांना बंदी घालतें, झँडनॉव्ह मरण पावतात, अश्लीलतेच्या आरोपा-

वरून झालेल्या खटल्यांत मर्ढेकर निर्दोषी ठरतात, वगैरे वगैरे अनेक घडामोडींचा संपादकाला समाचार घ्यावा लागतो. एखादा परिच्छेद म्हणजे दहाबारा ओळीच फक्त या मजकुराला मिळतात. तेवढ्यांत त्रोटक माहिती व आपलें मत वाचकांपुढे संपादकाला ठेवावें लागतें. साहजिकच प्रत्येक शब्द मोजूनमापून घेऊन थोडक्या शब्दांत मोठा आशय आणणें त्याला भागच पडतें. 'स्फुट सूचना' या वाचकाला कित्येक वेळां अग्रलेखापेक्षाहि रुचकर वाटतात याचें कारण म्हणजे त्यांचा मोजकेपणा व मुद्देसूदपणा होय.

दैनिक वृत्तपत्रांतील संपादकीय मजकुराबद्दल कांही ठिकाणीं उपेक्षेची भावना दिसून येते. कांही लोक तर अभिमानाने म्हणतात, की आपण दैनिकांतील बातम्यांखेरीज दुसऱ्या कोणत्याहि मजकुराकडे पाहात नाही. कांही दिवसांपूर्वी तर वाचकांचा म्हणा किंवा वृत्तपत्रव्यवसायी लोकांचा म्हणा असा एक गट होता, की जो संपादकीय मजकुराला वृत्तपत्रांतील सर्वांत खालचें स्थान देत असे. मला आठवतें, एके दिवशीं खुद्द 'लोकमान्यां'तच याविषयी एक अग्रलेख आला होता; व अग्रलेख लिहावे किंवा नाही या विषयावर त्यांत वाचकांचीं मतें मागविण्यांत आलीं होतीं. आज अर्थात् तशी परिस्थिति राहिलेली नाही. संपादकीय मजकुराला आज दैनिकांतहि त्याचें मानाचें स्थान प्राप्त झालेलें आहे.

या बाबतींतील वस्तुस्थिति पाहिली तर असें दिसून येतें, की स्वतःला सुशिक्षित म्हणविणारे लोकच संपादकीय मजकुराची उपेक्षा करतांना दिसून येतात, नव्हे हेटाळणी करीत असतात. पण मराठी वृत्तपत्रें आता सुशिक्षित वर्गापुरतीं मर्यादित राहिलेलीं नाहीत. त्यांचा खप खालच्या वर्गांत— शेतकरी व कामकरी वर्गांत वाढत चाललेला आहे. त्या बाबतींतहि आणखी एक लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे ती ही, की गेल्या तीस वर्षांत या देशांत ज्या राजकीय व कामकरी चळवळी झाल्या त्या चळवळींत भाग घेऊन कामकरी व शेतकरी वर्गांतील बरीच तरुण मंडळी राजकीय दृष्ट्या

जागृत झालेली आहेत. त्या जागृत कार्यकर्त्यांची ज्ञानलालसा एकसारखी वाढत असून पुस्तकें व वर्तमानपत्रें वाचणें हा त्यांचा एक आवडीचा व्यवसाय झाला आहे. हे कार्यकर्ते मराठी वृत्तपत्रांचे खरे आधारस्तंभ झाले असून संपादकीय मजकुराचें काळजीपूर्वक परिशीलन करून ते आपल्या ज्ञानांत भर घालीत आहेत व आपली राजकीय भूमिकाहि पक्की करूं पाहात आहेत. कॉँग्रेस, समाजवादी, शे. का. पक्ष, कम्युनिस्ट वगैरे निरनिराळ्या पक्षांत हे लोक आज विभागले गेलेले आहेत. पण बातम्या आणणारीं दैनिकें जी भूमिका मांडीत आहेत त्यांचें त्यांना वावडें नाही. उलट, संपादकीय मजकुराची छाननी करून ते आपापसांत त्यावर चर्चा करतात, विशिष्ट भूमिकेचें खंडण वा मंडण करतात आणि आपल्या मताप्रमाणे बहुजनसमाजापुढेहि ती भूमिका मांडतात. हा वाचकवर्ग हाच संपादकीय मजकुराचा खरा चाहता होय. त्यांच्यामुळे अर्थातच हें लोण सर्वसाधारण कामकरी शेतकरी वर्गापर्यंत पोचतें व त्यामुळे दैनिक वर्तमानपत्रांचे अग्रलेख हे लोकमत तयार करण्याचें एक महत्त्वाचें साधन झालेलें आहे.

संपादकीय मजकूर आस्थेने वाचणारा दुसरा एक वर्ग म्हणजे स्त्री-वाचकवर्ग होय. मराठी वृत्तपत्रांचा खरा उपयोग आज मध्यमवर्गांतील पुरुषांपेक्षा स्त्रियाच जास्त करून घेत आहेत. इंग्रजीचें ज्ञान असलेल्या सुशिक्षित स्त्रियांनाहि अद्याप इंग्रजी वर्तमानपत्रांची गोडी लागलेली नाही; मग अगदीच तुटपुंजें इंग्रजी ज्ञान असलेल्या बहुसंख्य मध्यमवर्गीय स्त्रियांची गोष्टच कशाला ! राजकीय, सामाजिक व शैक्षणिक चळवळींमुळे स्त्रीवर्गांत जिज्ञासाहि भरपूर वाढलेली आहे. म्हणून जगांत काय चाललेलें आहे, कोणते विचारप्रवाह वाहत आहेत, कोणत्या मार्गानें समाजाची उन्नति करतां येईल, याबद्दलचें ज्ञान करून घेण्याची त्यांच्यामध्ये उत्सुकता दिसून येते. आपल्या दैनंदिन जीवनांतील प्रश्नांबद्दल तर त्यांना जास्तच आस्था असते आणि म्हणून रेशनिंगचे भाव काय आहेत, इतर धान्याचे भाव उतरतात

किंवा नाही, कापडाची वांटणी अधिक सोयीची होते किंवा काय, याकडे त्या अत्यंत काळजीपूर्वक पाहात असतात. पण बाजारभाव पाहून वर्तमानपत्र खाली ठेवणाऱ्या सट्टेबाल्यांची वृत्ति त्यांच्यामध्ये नसते. त्यांना हेंहि जाणून घ्यावेंसें वाटतें, की महागाई वाढत कां चालली आहे ? सरकार मध्यमवर्गाच्या गरजा भागवूं कां शकत नाही ? संपादकीय मजकुरांत त्यांना हा अंदाज लागतो. म्हणून घरकाम आटोपल्यानंतर मध्यमवर्गातील स्त्रिया नुसते 'धक्के आणि बुक्के'च नव्हेत तर बहुतेक सारा संपादकीय मजकूर मोठ्या कुतूहलाने डोळयांखालून घालीत असतात. त्यांत त्यांना ज्ञान मिळतें, त्यांच्या आवडीच्या कांही प्रश्नांवर– उदाहरणार्थ, संततिनियमन वा कुटुंबनियोजन– त्यांना माहिती मिळते, चर्चा करावयाला अनेक प्रश्न मिळतात आणि त्यांवर आपलीं मतें बनविण्याच्या दृष्टीने त्यांना आधारभूत भूमिका मिळते. स्त्रीवर्गातर्फे संपादक समाजांतील आणखी एका मोठ्या घटकाचें मत तयार करीत असतो.

वाचकाच्या आशा-आकांक्षांना जो संपादक वाचा फोडतो त्याचे अग्रलेख साहजिकच जनमनाची अधिक पकड घेतात. सर्वसाधारण वाचकवर्गाला तत्त्वचर्चेपेक्षा आपल्या दैनंदिन जीवनांतील प्रश्नांचा सांगोपांग विचार ज्यांत झालेला असतो असे लेख अधिक आवडतात. म्हणून संपादकाने कांही वेळीं आपली प्रचारकाची भूमिका सोडून कांही अंशीं संघटकाची भूमिका घेणें आवश्यक असतें. बहुतेक संपादकीय लिखाण या ना त्या प्रकारें प्रचाराच्या स्वरूपाचें असतें, त्यांतून कांहीतरी संदेश वाचकाला मिळावा असाच संपादकाचा मनोमनींचा हेतु असतो. पण ती भूमिका सोडून संपादकाने जिज्ञासूची भूमिका घेतली आणि जिव्हाळ्याच्या अशा कांही प्रश्नांबद्दलची माहिती करून घेऊन एखादें गाऱ्हाणें मिटविण्याच्या दृष्टीने, एखादी विधायक चळवळ सुरू करण्याच्या दृष्टीने समाजापुढे विचार ठेवले तर संपादक एक प्रकारच्या संघटनेला चालना देऊं शकेल. उदाहरणार्थ,

राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय प्रश्नांचा आणि त्यांमागील तात्त्विक भूमिकेचा आपण नेहमी ऊहापोह करतों; तो क्षणभर सोडून देऊन संपादकाने कुलाबा जिल्ह्यांतील खाऱ्या जमिनीच्या प्रश्नाकडे लक्ष पुरविलें व त्या प्रश्नाचा अभ्यास करून सरकारचें व लोकांचेंहि मार्गदर्शन केलें तर कदाचित् लोकांच्या जीवनांत प्रत्यक्षपणें इष्ट तो बदल घडवून आणण्यालाहि संपादक साहाय्यभूत होईल. अलीकडील काळांत विशेषतः हा विधायक दृष्टिकोन ठेवणें अत्यंत आवश्यक आहे. स्वातंत्र्यपूर्व काळांत वर्तमानपत्रें हीं प्रचाराचीं साधनें होतीं, चळवळींची प्रेरक शक्ति होण्याइतकेंहि त्यांना राजकीय जीवनांत महत्त्वाचें स्थान प्राप्त झालें होतें. "परकीयांनी या देशावर राज्य करावें हें आम्हांस पसंत नाही," अशा सरळ, स्पष्ट, सडेतोड शब्दांत लोकमान्यांनी 'केसरी'त लिहिलें की देशभर त्याचे पडसाद उठत असत. त्या काळीं वर्तमानपत्रांनी असंतोषाला वाचा फोडली, चळवळींना धार चढविली. आज ज्या पक्षनिष्ठ वृत्तपत्रांना तेंच कार्य करावयाचें असेल त्यांची गोष्ट वेगळी. त्यांनीसुद्धा विधायक दृष्टिकोन ठेवून जनतेच्या राजकीय शिक्षणावर भर दिला आणि समाजहिताच्या चळवळींना प्रेरणा देऊन जनतेची शक्ति संघटित होण्याला मदत केली तर पक्षाच्या दृष्टीनेंहि त्यांचें कार्य अधिक यशस्वी होईल. सर्वसाधारण वृत्तपत्रांनी तर आपल्यावरील जबाबदारीची अधिकच जाणीव ठेवून, लोकांच्या भावना चेतवून नव्हे तर त्या भावनांना योग्य वळण देऊन समाजाची कर्तृत्वशक्ति वाढविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. अर्थातच तें कार्य संपादकाचेंच आहे. त्याच्या दृष्टिकोनाप्रमाणेच वर्तमानपत्राचें अखेरीस धोरण ठरतें.

दैनिक वृत्तपत्राचा संपादक हा समाजांतील केवढी शक्ति झाला आहे याची कल्पना जनतेच्या जीवनाशीं ज्यांचा संबंध आहे त्यांनाच करतां येईल. या शक्तीचा बरा आणि वाईट दोन्ही प्रकारचा उपयोग होऊं शकेल. हजारो वाचकांचीं मनें जसा तो तयार करूं शकेल त्याप्रमाणे बिघडवूंहि शकेल. दररोज सकाळीं त्याने ज्ञानामृत पाजलें तर ठीक आहे; पण तो

जर गरळ ओकीत राहिला तर साऱ्या समाजांत कांही प्रमाणांत तरी विषारी वातावरण निर्माण केल्याशिवाय तो राहणार नाही. अतिपरिचयामुळे म्हणा किंवा अहंमन्यतेमुळे म्हणा– शहरांतील लोकांना विशेषतः सुशिक्षित लोकांना संपादकाचें तेवढें महत्त्व वाटत नसेल, पण छापील अक्षर हें ज्यांना वेदवाक्या-इतकें पवित्र वाटतें त्या खेड्यापाड्यांतील भाबड्या लोकांना वर्तमानपत्राचा संपादक हा प्रतिसृष्टि निर्माण करणाऱ्या विश्वामित्राइतका प्रबळ वाटतो. संपादकाची ही प्रतिसृष्टि समाजजीवनाशीं संवादी असेल तर जनतेपुढे एक उच्च आदर्श संपादक उभा करील; पण समाजजीवनाशीं ती जर विसंवादी असेल तर देवदूतांनाहि या दुनियेंत वास्तव्य करणें अशक्यप्राय होईल. वर्तमानपत्राच्या कर्तुमकर्तुम् शक्तीचा कसा उपयोग करावयाचा हें अर्थातच संपादकाच्या आवडीनिवडीवर व मनःप्रवृत्तींवर अवलंबून राहील.

* * *

प्रकरण १० वें

# संपादकाची बिदागी

☆

वर्तमानपत्रांतील संपादक व उपसंपादकांच्या जीवनाची खरोखरच एक उलटी तऱ्हा असते. या जगांत सर्वच व्यवसायांतील लोक काम करतात हें खरें आहे. पण वर्तमानपत्रांचा दिवस सकाळीं सुरू होतो पण संध्याकाळीं तो संपत नाही. सूर्यास्तानंतर दिवसाचें खरें काम सुरू होतें आणि मध्यरात्रीला त्या कामाला बहर येतो. बिचारा पत्रकार अगदी पहाटेला काय अंग टाकीत असेल तोच. बाकी सृष्टीचा क्रम जसा अखंड चालू असतो तसेंच पत्रकाराचें कामहि अव्याहतपणें चालू असतें. आश्चर्य म्हणजे ज्या वेळीं इतरांना सुट्टया असतात त्या वेळींच पत्रकाराचें काम वाढत असतें. कारण कोणत्याहि सणानिमित्त इतरांना सुट्टी असली तर लोकांच्या आनंदाचें वर्णन करण्यासाठीच पत्रकाराला तो सण कचेरींत काम करूनच साजरा करावा लागतो. जी आनंदाची तीच दुःखाची गोष्ट. गांधीजींच्या निधनामुळे सारें राष्ट्र शोकमग्न झालें ना ? पण म्हणूनच पत्रकाराला रात्रीचा दिवस करून राष्ट्राच्या शोकमग्नतेच्या हृदयद्रावक बातम्या दिल्या पाहिजेत. हा शोकदिन असो की स्वातंत्र्यदिनाचा सोहळा असो. राजाबाई टॉवर रोषणाईने उजळून निघाला आहे, सारी मुंबई कोटांत लोटली आहे; पण दुसऱ्या दिवशीं या रोषणाईचें, साऱ्या देशांतील तुफान उत्सवाचें शब्दचित्र वाच-

कांना पाहावयाला मिळावें म्हणून पत्रकार कचेरींत बसून कॉप्या खरडीत असतो, हेडिंगें देत असतो, दैनिक वृत्तपत्राचा अंक सजवीत असतो.

कचेरींत गेल्यानंतर त्याच्या डोक्यांत एकच विचार असतो आणि तो म्हणजे आपल्या पत्राचा अंक परिपूर्ण रीतीने कसा बाहेर काढावयाचा ? तो परिपूर्ण करण्यासाठी मजकूर कसा व कोणता भरतात, त्याची सजावट कशी करतात हें आपण आतापर्यंत पाहिलें. पण आता जरा तो अंक आपल्या हातीं धरा, त्याच्यावरून सहज नजर फिरवा म्हणजे संपादकाला आणखी किती व्यवधानें सांभाळावीं लागतात याची तुम्हांला कल्पना येईल.

या अंकांत लहानमोठे अनेक मथळे आहेत. त्यांचे टाइपहि वेगवेगळे आहेत. बातम्यांचें जसें कमीजास्त महत्त्व असतें त्याप्रमाणे हे मथळे देण्यांत येतात. संपादकाला टाइपांच्या निरनिराळ्या तऱ्हांची माहिती असल्याशिवाय हे मथळे देतां येणार नाहीत. ते टाइप माहीत असले पाहिजेत. आणि एका कॉलमांत विशिष्ट टाइपाचीं किती अक्षरें बसतात हेंहि त्याने लक्षांत ठेवलें पाहिजे. कारण मथळ्याच्या एका ओळींत अपूर्ण शब्द येणें हें अर्थहानि करणारें असतें. उदाहरणार्थ, " मेनन यांचा बेबंद कारभार " हा एक मथळा आपण घेऊं. त्यासाठी आपण विशिष्ट टाइप निवडला व त्या टाइपांत एका ओळींत सहाच अक्षरें बसलीं तर पहिल्या ओळींत " मेनन यांचा बे " आणि खालच्या ओळींत " बंद कारभार " अशीं अक्षरें बसतील. हें अर्थातच दिसावयाला जितकें वाईट तितकेंच अर्थाच्या दृष्टीने हास्यास्पद होईल.

मथळ्यांचीं अक्षरें आणखी एका कारणासाठी मोजणें आवश्यक असतें. एकापेक्षा अधिक कॉलमांचा आपण मथळा दिला तर फारशी जागा रिकामी पडणार नाही हें आपण पाहिलें पाहिजे. समजा, आपण मथळा दिला आहे– " जपानच्या उत्तर किनाऱ्यावर भूकंपाने हाहाःकार !" यांपैकी " जपानच्या उत्तर किनाऱ्यावर भूकंपाने " एवढीं अक्षरें पहिल्या ओळींत

बसलीं व " हाहा:कार ! " एवढीं चार अक्षरेंच दुसऱ्या ओळींत आलीं तर साहजिकच तो मथळा चांगला दिसणार नाही. कारण बरीचशी जागा त्यामुळे कोरी राहील. अशा परिस्थितींत आपण शब्द तरी बदलले पाहिजेत, किंवा कॉलम तरी कमी केले पाहिजेत, किंवा टाइप तरी बदलला पाहिजे. हा प्रश्न निखालस सौंदर्यदृष्टीचा आहे. आपली सजावट बेडौल दिसूं नये असें सौंदर्यदृष्टि असलेल्या कोणत्या संपादकाला वाटणार नाही ?

कुशल संपादक ही सौंदर्यदृष्टि तर ठेवतोच; पण मथळ्यामध्ये चुरचुरीतपणा आणून बातमीवर वाचकांचें लक्ष केंद्रित करतो. मथळा हा जितका लहान तितकाच सूचक असला पाहिजे. मथळ्यामध्येच सबंध बातमी समाविष्ट झाली तर मग वाचकांनी बातमी वाचण्याचे श्रम तरी कां घ्यावयाचे ? चुरचुरीत मथळे देणें ही एक कला आहे आणि ज्याच्यामध्ये भाषाप्रभुत्व व कल्पकता आहे तोच संपादक उत्कृष्ट मथळे देऊं शकतो. दैनिक वृत्तपत्रांत काम करणाऱ्या प्रत्येक संपादकाने ही कला हस्तगत करण्याचा प्रयत्न केलाच पाहिजे. मथळे देतांना अर्थातच बातम्यांची निवडहि करणें अवश्य असतें. संपादकवर्गाला बातम्या व मथळे हे इतक्या परिचयाचे झालेले असतात, की अमुक बातमी म्हणजे अमक्या टाइपांतील बातमी असें खुशाल डोळे मिटून ते सांगूं शकतात. ज्या दैनिकांत न्यूज एडिटर हा स्वतंत्र असतो त्याचें महत्त्वाचें काम म्हणजे मथळ्यांचे टाइप लिहून देणें हेंच असतें. शहरांत भयंकर विमान-अपघात झाल्याची बातमी आहे. मग संपादक क्षणाचाहि विचार न करतां मथळ्यापुढे लिहितो, " ६ला. ग्रेट, ७ कॉलम. " जो विशिष्ट टाइप वापरावयाचा असतो त्याचें हें नांव व किती कॉलमांत हा मथळा बसवायचा असतो त्याचेंहि दिग्दर्शन त्यापुढेच स्पष्टपणें संपादक करतो. कांही वेळां न्यूज एडिटर तारांची वांटणी करतांनाच त्या तारांवर आपल्या सूचना लिहितो. म्हणजे उपसंपादकाला मजकूर किती कॉलमांत कंपोज करावा, इंट्रो द्यावा किंवा नाही, मथळा किती कॉलमी

द्यावा, मथळयांचा टाइप कोणता असावा, याबद्दल विचार करण्याचेंहि कारण पडत नाही. मोरारजी देसाई यांचा पराभव झाल्याची बातमी आली आहे. अर्थात् सर्वांत मोठा मथळा देण्याजोगी ही बातमी. न्यूज एडिटर लगेच लिहितो, " ६ ला. चा मथळा. "

सहसंपादक विचारतो, " बाकीची सजावट ? "

न्यूज एडिटर लगेच सूचना देतो, " मजकूर २ ला. पायक्यामध्ये चालवा, चार कॉलमी इंट्रो द्या आणि दोनतीन मथळेहि द्या. "

सर्वसाधारण माणसाला वाटेल, ही कांही सांकेतिक भाषा तर नव्हे ? पण छापखाना, त्यांतील टाइप व यंत्रें यांच्याशीं हरघडी संबंध येणाऱ्या संपादकाला त्या सूचना आपल्या हातांतील बातमीइतक्या परिचयाच्या वाटतील. संपादकाला टाइपांची माहिती करून घेणें किती अपरिहार्य आहे हें मात्र यावरून समजून येईल.

मथळे देतांना जशी काळजी संपादकाला घ्यावी लागते तशीच पानें भरतांना मथळे व त्यांचा मजकूर एका जागीं येतो किंवा नाही याकडेहि फार काळजीपूर्वक पाहावें लागतें. दैनिकाचा अंक तुम्हीं हातीं घेतलांत म्हणजे तो कसा सुबक असलेला तुम्हांला दिसून येतो. पण त्याचें प्रत्येक पान भरतांना संपादकाला किती डोळेफोड करावी लागते, किती प्रसंगावधान राखावें लागतें व संपादकाच्या नेतृत्वाखाली फोरमनला किती कलाकुसर करावी लागते याची तुम्हांला कल्पना करतां येणार नाही. पानें भरणें हा संपादकाच्या दैनंदिन कामांतील एक महत्त्वाचा पण किचकट कार्यक्रम असतो. संपादकाच्या हातीं नुसतीं गॅली प्रुफें असतात व त्या प्रुफांतहि मजकुराचीं प्रुफें वेगळीं आणि मथळयाचीं प्रुफें वेगळीं असतात. पानामध्ये बातमी भरावयाच्या वेळीं संपादक मथळा सांगतो व नंतर मजकूर दाखवून देतो. लगेच फोरमन एकत्र ठेवलेल्या मथळयांच्या गॅलींतून तेवढा मथळा उचलतो व नंतर दाखवून देण्यांत आलेला मजकूरहि भरतो. या

वेळीं संपादकाने नीट काळजी घेतली नाही तर मथळा एक व मजकूर दुसरा अशी गल्लत होण्याचा संभव असतो. आणि त्याचा परिणाम असा होईल, की मथळा जीवदया मंडळाने पशुहत्या बंद करण्यासाठी केलेल्या विनंतीचा असेल आणि खाली मजकूर सावरकरांनी मांसाहाराचा पुरस्कार करणारें जें भाषण केलें त्याचा असेल. पुष्कळ वेळां एकाच शहरांतील दोन बातम्या असतात व त्या शहराचें नांव वाचून संपादकाने मजकूर उचलावयाला सांगितला तरी वरीलप्रमाणे गल्लत होणें शक्य असतें. उदाहरणार्थ, दिल्लीमध्ये कॉंग्रेस व हिंदुमहासभा या दोन्ही संघटनांच्या कार्यकारिणीची सभा एकाच वेळीं होणें शक्य असतें आणि त्या वेळीं मथळे व मजकूर यांची गल्लत झाली तर केवढा बरें विनोद निर्माण होईल ! म्हणून पुष्कळ वेळां मजकूर प्रत्यक्षपणें वाचून घेऊन नंतरच तो पानांत भरण्याची खबरदारी संपादकाला घ्यावी लागते.

पानें भरतांना आणखीहि अनेक गोष्टींकडे संपादकाला लक्ष द्यावें लागतें. अंकावरील तारीख बदलली आहे किंवा नाही, प्रकाशक व मुद्रक यांचें नांव घातलेलें आहे किंवा नाही, सदरांचे व जाहिरातींचे ब्लॉक उलटेसुलटे झालेले आहेत किंवा काय, हें तर त्याला पाहावें लागतेंच; पण निदान मथळयांत तरी कांहीतरी भयंकर चूक होऊं नये म्हणूनहि त्याला अत्यंत जपावें लागतें. छपाईतील चुका या सर्वांच्या इतक्या सरावाच्या झाल्या आहेत, कीं बहुतेकांना त्यांचें कांही वाटतहि नाही ! पण कांही वेळीं अनवधानाने म्हणा किंवा दुर्दैवाने म्हणा, अशा कांही घोडचुका होतात, की ज्यामुळे संपादकाला अगदी खाली मान घालावयाची पाळी येते. मागे एकदा ‘लोकमान्यां’त मी स्वतः रात्रपाळी करीत असतांना अशीच एक घोडचूक झाल्याचें मला आठवतें. एका नटीवर कोणातरी इसमाने सात हजारांची फिर्याद दाखल केली होती. ती बातमी देतांना आम्हीं “ × × × सात हजारांची फिर्याद ” असा मथळा दिला होता.

पण दुसऱ्या दिवशीं छापील अंक आम्हीं पाहिला तेव्हा हजारांतील ‘ह’ उडून गेलेला आम्हांला आढळून आला! मथळयांतील एकच अक्षर उडालें, पण त्याने केवढा अर्थाचा अनर्थ घडवून आणला! अर्थात् त्यानंतर संपादकाने रीतसर खुलासा केला व आपली दिलगिरीहि व्यक्त केली ही गोष्ट वेगळी. पण सांगावयाचें तात्पर्य असें, की प्रुफें वाचतांना निदान मथळयांत तरी संपादकाने चूक राहूं देऊं नये आणि पानें भरतांना त्याने त्याची खातरजमा करून घ्यावी. याउप्पर, सुटलेला बाण जसा परत येत नाही तशी झालेली चूक निदान त्या अंकांत तरी सुधारतां येत नाही. आपल्याकडून शक्य तेवढी काळजी घेणें मात्र संपादकाचें काम आहे.

या चुकांचा वाचकांनी किंवा टीकाकारांनी फारसा बाऊ करण्याचें कारण नाही. ज्या परिस्थितींत मराठी वर्तमानपत्रें आज निघत आहेत व सर्व प्रकारच्या गैरसोयी आणि कामाचा जो ताण संपादकाला सहन करणें भाग पडत आहे त्यांचा विचार केला तर या चुका अक्षम्य खास ठरणार नाहीत. इंग्रजी वर्तमानपत्रांना छापखान्याच्या ज्या सवलती मिळूं शकतात त्या आपल्याकडील एखाद्याच वर्तमानपत्राला मिळत असतील. आपल्या पत्रांची साधारणपणें आर्थिक परिस्थिति अशी असते, की आवश्यक तेवढे संपादक किंवा प्रुफें वाचणारे लोक तर आपण ठेवूं शकतच नाही; पण मजकूर कंपोज करण्यासाठी भरपूर कामगारहि वर्तमानपत्रांना ठेवतां येत नाहीत. छापखान्यांची ज्यांना कल्पना आहे त्यांना हें कळून येईल, की पुरेसे कामगार नसले तर वेळेवर कंपोज तयार करणें शक्य होत नाही; आणि अशा वेळीं निरनिराळया मार्गांनी अंकांतील मजकूर भरून काढावा लागतो. कामगारांच्या अभावीं प्रुफांत केलेल्या दुरुस्त्यासुद्धा सुधारतां येत नाहीत. कांही वर्तमान-पत्रांचे अंक तर एका प्रुफावरसुद्धा बाहेर पडतात! अशा परिस्थितींत चुका न राहिल्या तरच नवल! शिवाय संपादकावर कामाचा ताण असा पडतो, की एकीकडे त्याला बातम्या द्याव्या लागतात, दुसरीकडे सजावट

ठरवावी लागते आणि इतर अनेक कामांबरोबर प्रुफेंहि तपासावीं लागतात. इतकीं सर्व व्यवधानें सांभाळतांना साहाजिकच त्याच्या हातून एखादी चूक होणें अपरिहार्य आहे. तेव्हा वर्तमानपत्रांतील चुकांचा प्रश्न एकंदरीने पत्रांच्या आर्थिक परिस्थितीशीं निगडित आहे. आणि जोंपर्यंत ही परिस्थिति सुधारत नाही तोंपर्यंत वाचकांनी व टीकाकारांनी वर्तमानपत्रांना व संपादकांना संभाळून घेणेंच आवश्यक आहे.

दैनिक वृत्तपत्रांत वेळोवेळीं चुकीच्या दुरुस्त्या व खुलासे येतात ते मात्र वेगळयाच कारणांमुळे द्यावे लागतात. छपाईतील चुकांसाठी दुरुस्त्या देऊं लागलें तर कांही वर्तमानपत्रांना दुसरा मजकूर देण्यालाहि जागा राहणार नाही हें प्रांजलपणें कबूल करणें भाग आहे! या दुरुस्त्या व खुलासे, मजकुरांत कांही असंबद्धता असली, किंवा एखाद्या बातमीदाराने पाठविलेली बातमी निराधार आहे असें मागाहून आढळून आलें, किंवा संपादकीय मजकुरांत केलेलें विधान ऐतिहासिक दृष्ट्या चुकीचें आहे असें संपादकाला वाटलें, किंवा अशाच तऱ्हेच्या कांही ठळक चुका घडून आल्य तर करण्यांत येतात. या दुरुस्त्या वरचेवर झाल्या तर वर्तमानपत्राचा आब कमी होतो हें खरें आहे; आणि म्हणून त्या करण्याची शक्यतोंवर वेळ येऊं नये याचीच संपादकाने काळजी घ्यावी हें बरें. पण हटवादीपणाने आपल्या चुका कबूलच न करणें हा मात्र आब राखण्याचा खरा मार्ग नव्हे. चुका दुरुस्त करण्यांत कमीपणा असेल; पण योग्य वेळीं व योग्य रीतीने त्या दुरुस्त न करणें हें कांही वेळीं कोणाला अन्यायाचें होईल व कांही वेळीं त्याचें प्रायश्चित्त वर्तमानपत्रालाच भोगावें लागण्याचा धोका असतो. विशेषतः ज्यामुळे एखाद्या व्यक्तीची बदनामी होत आहे असें विचारांतीं संपादकाला कळून येईल त्या व्यक्तीचें चारित्र्य साफ करण्यासाठी त्या मजकुराबद्दल प्रांजलपणें खुलासा करणें हा शिष्टाचाराचाच नव्हे तर नीतीचा मार्ग आहे. कोणी यावर म्हणेल, की आधी लाथ मारावयाची आणि नंतर क्षमा

मागावयाची अशाचपैकी हा प्रकार आहे. वृत्तपत्रांच्या चुकीच्या दुरुस्त्या व खुलासे हा कित्येकांच्या विनोदाचाहि विषय झाला आहे. वर्तमानपत्राच्या संपादकांना निरनिराळ्या प्रकारचे जे खुलासे द्यावे लागतात त्यासाठी छापील फॉर्म कां ठेवूं नये, अशीहि कांहीजण विनोदाने पृच्छा करतात. उदाहरणार्थ, बदनामीबद्दल केलेला खुलासा हा नाही म्हटलें तरी सर्वच वर्तमानपत्रांच्या दृष्टीने एकाच स्वरूपाचा असणार! सरकारी धोरणावर वा कारभारावर चुकीची टीका केली व त्याचा खुलासा करावयाची वेळ आली तर दुसरा नमुना उपयोगांत आणतां येईल. कांही वेळां एखाद्या बातमीबद्दल पोलिसां-कडून विचारणा येते. कधी वृत्तपत्र-सल्लागार-समिति विशिष्ट लिखाणाबद्दल खुलासा मागविते. कधी परदेशी वकिलाती आपल्या सरकारच्या धोरणाबद्दल स्पष्टीकरण पाठवून देतात व एखाद्या लिखाणाने आपल्या देशाला कमीपणा येतो म्हणून संपादकाला चुकीची दुरुस्ती करावयाला सांगतात. असे अनेक प्रकारचे खुलासे संपादकाला करणें भाग पडतें. या बाबतींत सावधगिरीचें धोरण प्रथमपासूनच ठेवून असे प्रसंग आपल्यावर ओढवून न घेणें हाच सर्वांत श्रेष्ठ मार्ग खरा. पण चूक झाल्याचें कळल्यानंतर स्वस्थ बसणें किंवा त्या चुकीचें परिमार्जन न करणें हा मात्र वृत्तपत्रीय रिवाज खास नव्हे. हा रिवाज जे संपादक पाळतात त्यांना म्हणूनच दोष देणें इष्ट नाही आणि त्यांची हेटाळणी करणें हें तर त्यांना अन्याय करण्यासारखें आहे.

दैनिक वृत्तपत्रांत सर्वसाधारण वाचकाला खटकण्यासारख्या आणखीहि कित्येक गोष्टी असतील. व्यक्ति तितक्या प्रकृति या नात्याने निरनिराळ्या वाचकांची वृत्तपत्रांकडे पाहण्याची दृष्टीहि भिन्न असते. त्यामुळे एखाद्याला जो मजकूर आवडेल तोच दुसऱ्याला त्याज्य वाटेल. पण अखेरीस आपण कोणत्या प्रकारचा मजकूर पुरवावयाचा; कोणतें राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक वगैरे धोरण ठेवावयाचें; कोणत्या तऱ्हेने अंकाची सजावट करावयाची, कोणत्या पद्धतीने संपादकीय मजकूर द्यावयाचा, हें सर्वस्वीं संपादकच ठरवीत

असतो. त्याचा निर्णय हाच वर्तमानपत्राच्या भवितव्याचा नियंता असतो. आपला वाचकवर्ग कोणता ? हें एकदा संपादकाने निश्चित ठरविलें, की मग ध्येय, धोरण, दर्जा या बाबतींतलि सर्व प्रश्न मिटले जातात. मग आपल्या ठराविक वाचकवर्गासाठी आणि त्या वाचकवर्गाच्या आवडीनिवडीप्रमाणे संपादक आपला अंक सजवितो; आणि त्या वेळीं इतर वाचकवर्गाची इतराजी झाली तरी संपादकाला त्याचें वैषम्य वाटत नाही. एखाद्या वृत्त-पत्राच्या संपादकाचें विशिष्ट ध्येय-धोरण कोणाला पटणार नाही. प्रत्येकाच्या मतामतांचा हा प्रश्न आहे. पण संपादकाच्या लिखाणाचा वा वृत्तपत्राच्या बरे-वाईटपणाचा विचार करतांना आपण एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे, की प्रत्येक संपादकाला आपली अशी एक निष्ठा असते; आणि त्या निष्ठेप्रमाणे तो स्वतःचा वाचकवर्गहि तयार करीत असतो. त्या वाचकवर्गाशींच संपादक प्रामाणिक राहतो; आणि तोच त्याच्या यशाचा निकष मानला पाहिजे.

एवढें खरें, की सदभिरुचीच्या व नीतीच्या मर्यादा, शिष्टाचाराचे नियम व वृत्तपत्रीय रिवाज पाळणें हें प्रत्येक संपादकाचें कर्तव्य आहे. पण त्या मर्यादा त्याने पाळल्यानंतर मात्र त्याला मतांचें व तीं मांडण्याच्या पद्धतीचें स्वातंत्र्य मिळालें पाहिजे. कोणतेंहि वर्तमानपत्र वाचतांना आपल्या मनांतील विचार व कल्पना त्यांत प्रतिबिंबित झाल्या आहेत किंवा काय हें न पाहतां, संपादकाचा दृष्टिकोन इतकेंच नव्हे, तर त्याचें अंतरंग त्यांत प्रतिबिंबित झालें आहे किंवा नाही हें पाहणें आवश्यक होय. आणि हें अंतरंग नुसत्या संपादकीय मजकुरांतच दिसून येत नाही,तर प्रत्येक सदरांतून, प्रत्येक बातमींतून, प्रत्येक मथळयांतून त्याचें प्रतिबिंब पडलेलें दिसून येतें. संपादकाची जबाब-दारी नुसती अग्रलेखापुरतीच मर्यादित नसते. पहिल्या पानावरील मथळया-पासून “ हें पत्र... छापून प्रसिद्ध केलें ” या अखेरच्या घोषणेपर्यंत प्रत्येक शब्दाबद्दलची जबाबदारी संपादकाची असते– नुसती कायद्याच्या व नीतीच्या दृष्टीनेच नव्हे, तर प्रत्यक्ष व्यवहाराच्या दृष्टीने. प्रत्येक सहसंपादक हा

संपादकाचा प्रतिनिधि म्हणून काम करतो. साहजिकच संपादकाचें धोरण व इभ्रत राखणें हें त्याचें कर्तव्य असतें. म्हणून कोठलाहि मजकूर देतांना आपल्या पत्राच्या धोरणाशीं तो विसंगत होणार नाही, संपादकाच्या नीतीच्या व विचारप्रदर्शनाच्या कल्पनांना तो हरताळ फासणार नाही, संपादकाच्या भूमिकेची पातळी तो खाली आणणार नाही, याची तो काळजी घेत असतो. संपादक व सहसंपादक यांच्या सहकार्यांतूनच एक परिपूर्ण असा अंक बाहेर पडत असतो. संपादकाचें एक जीवनस्वप्नच त्या अंका-मार्फत प्रत्यक्षांत उतरत असतें. दैनिक वर्तमानपत्राचा प्रत्येक अंक हा संपादकाला म्हणूनच आपल्या जिवापेक्षाहि प्यार वाटतो. कारण आपलें रक्त आटवून, आपलें बुद्धिसर्वस्व त्यासाठी खर्च करून, आपला सारा ध्येयवाद त्यांत ओतून संपादक या अंकाची आखणी करीत असतो. तो अंक जेव्हा छापून बाहेर पडतो तेव्हा जिवंत, चैतन्यपूर्ण अशी एक कला-कृति निर्माण केल्याचा आनंद त्याला होतो. त्या आनंदाची कल्पना काय करून देणार! प्रत्यक्ष अनुभवानेच तो आनंद लुटतां येईल. पण तें जरी शक्य झालें नाही तरी त्या आनंदांत सहभागी होणें हें तर वाचकांच्या हातीं आहे. बागबगीचा व मळे फुलविण्याचें भाग्य सर्वांच्याच वांट्याला येत नाही; पण माळ्याने पेरलेलें बी जेव्हा जमीन फोडून बाहेर पडतें तेव्हा कोवळ्या लुसलुशीत अशा त्या रोपट्याचा फुलोरा पाहून त्याचें कौतुक करणें हें तर इतरांच्या हातीं आहे! वाचकांच्या कौतुकाचीच संपा-दक अपेक्षा करीत असतो. त्याची खरी बिदागी तीच होय.

★ ★ ★

# आमचें वैशिष्टयपूर्ण प्रकाशन

| | | | |
|---|---|---|---|
| दाजी– (भाग १ ला व २ रा) | ना. धों. ताम्हनकर | (प्रत्येकीं) | रु. ५–११ |
| रेखाचित्रें– | श्री. ना. कुलकर्णी | ... | ,, ५–११ |
| संपादकाचें जीवनस्वप्न– | द्वा. भ. कर्णिक | ... | ,, ३– ८ |
| लेख कसे लिहावे ?– | मो. प्र. फडके | ... | ,, ३– ० |
| पाळण्यापासून शाळेपर्यंत– | ( १३ लेखांचा संग्रह ) | ... | ,, ३– ८ |
| मुद्रणकला– | ग. पां. विजापुरे ... | ... | ,, ३– ८ |
| टाकांच्या फेकी– | प्रो. फडके व शं. वा. कि. | ... | ,, ५–११ |
| लघुकथा कशा लिहाव्या ?– | वा. कृ. गलगली | ... | ,, २– ८ |
| सावरकर-साहित्य– (भाग ३, ४ व ५) | बॅ. सावरकर | (प्रत्येकीं) | ,, १– ४ |
| ज्योति– ( कथासंग्रह ) | कै. सौ. आनंदीबाई किर्लोस्कर | | ,, ४– ८ |
| नव्या वाटा– ( पुरुषपात्रविरहित नाटिका ) | ,, ,, | ... | ,, २– ० |
| तडफ– ( कवितासंग्रह ) | ... ... ... | ... | ,, ०–१४ |
| अस्पृश्यता रुक्कुठार– | कै. डॉ. वा. का. किर्लोस्कर ... | | ,, ०–१४ |
| स्त्रीसंहारक बकासुर– | ... ... | ... | ,, ०–११ |

सर्व किंमती टपालखर्चासह आहेत.

किर्लोस्कर प्रेस, किर्लोस्करवाडी, द. सातारा.

REFBK-0007767